नाताळच्या
हार्दिक
शुभेच्छा!

डिसेंबर २०१४
किंमत १५ रुपये

# मेहता मराठी ग्रंथजगत

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक

आमची
नवीन
पुस्तके












## प्रकाशन विश्वात प्रथमच...

# 'राष्ट्रीय पुस्तक सप्ताह'

















मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने १४ ते २१ नोव्हेंबर २०१४. या कालावधीत आयोजित **'राष्ट्रीय पुस्तक सप्ताह'** कार्यक्रमाची क्षणचित्रे...

# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर २०१४ वर्ष चौदावे अंक बारावा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संवाद | ४ |
| संपादकीय | ६ |
| साहित्यवार्ता | १० |
| राष्ट्रीय पुस्तक सप्ताह | ४० |
| पुरस्कार | ४२ |
| पुस्तक परिचय | ५८ |
| वॉरन बफे | |
| नावीन्याच्या शोधात | |
| फ्रँकफर्ट बुकफेअर | ८५ |
| इंग्रजी पुस्तक परिचय | ९० |
| श्रद्धांजली | ९२ |
| बालनगरी | ९६ |


मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु. पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संवाद.....



*अस्ताला चाललेल्या सूर्याची पावले काही काळ येथे रेंगाळावी*
*येणाऱ्या काळाची अनामिक ओढ, तर दाटून याव्यात सरत्या आठवणी*
*होऊन उत्सवाची सुरुवात उजळाव्या दाही दिशा*
*निनादून झिंगलबेलची धून, सांताक्लॉज यावा पाहुणा घरा.*

२५ डिसेंबर, येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस. ईश्वराने मानवाच्या उद्धारासाठी मानवरूप धारण केले; याचा आनंद व्यक्त करण्याचा हा दिवस. ज्यानं जन्म दिला, जगवलं, वाढवलं, ओठांवर हास्याची लकेर सदैव झळकत राहावी यासाठी जो सदैव त्याच्या संदेशाद्वारे आपल्या सोबत असतो, अशा परमेश्वराच्या लेकराप्रति आपल्या भावना व्यक्त करण्याचा हा दिवस. इंग्रजीमध्ये 'नेटिव्हिटी' ही संज्ञा ख्रिस्ताचा जन्म या अर्थी वापरली जाते. तिचा अपभ्रंश होत 'नाताळ' हा शब्द रूढझाला असे म्हणतात आणि 'ख्रिस्ताचा मास' म्हणजे सामुदायिक ईशोपासना यावरून सोळाव्या शतकात 'ख्रिसमस' हा शब्द वापरला जाऊ लागला. तर असा हा ख्रिसमस साजरा करण्याची सुरुवात ख्रिस्तानंतर ४०० वर्षांनी झाली. रोमचा पोप ज्युलीयसने पहिल्यांदा २५ डिसेंबरला ख्रिस्ताचा जन्मदिवस साजरा केला व तीच ख्रिसमसची तारीख ठरली. गुलाबी थंडीत उबदारपणाची हळुवार पावले टाकत ख्रिसमस अवतरतो; जिथं उजळतं आकाश दिव्यांच्या रोषणाईने; नवीन कपडे, नटणं-थटणं यात विसरून जातात सर्वजण स्वत:ची दु:खं; मिष्टान्ने भरून काढतात गरीब-श्रीमंत हा भेद; भेटवस्तू-शुभेच्छापत्रे जवळ आणतात लोकांना; फटाक्यांची आतषबाजी जणू एकमेकांचा आनंद एकमेकांपर्यंत पोहोचवतात. तर अशा प्रकारे प्रार्थना, ख्रिसमस गीत, कॅरोल्सचे गायन, शुभेच्छापत्रांचे आदान-प्रदान, विविध खाद्यपदार्थ याद्वारे येशूचा जन्मोत्सव आनंदाने, उत्साहाने साजरा करतात. खरं तर २४ डिसेंबरच्या संध्याकाळपासूनच या सणाला सुरुवात होते, या संध्याकाळला 'ख्रिसमस ईव्ह' म्हणतात. डिसेंबर २४च्या रात्री घरात व चर्चमध्येही 'ख्रिसमस ट्री' रोषणाई करून सजवतात. सातव्या शतकात एका भिक्षूने पहिल्यांदा त्रिकोणी

फर(सूचिपर्णी) वृक्षाचा उपयोग सजवण्यासाठी केला होता. त्रिकोणाने त्याने ईश्वराच्या 'पिता-पुत्र-आत्मा' यांना जोडले तेव्हापासून त्रिकोणी ख्रिसमस ट्रीचे महत्त्व वाढत गेले. सोळाव्या शतकात मार्टिन ल्यूथरने जर्मनीतील स्वत:च्या घरात मेणबत्त्यांनी सजवलेला फर वृक्ष उभा केला, तेव्हापासून ही प्रथा सर्वत्र रूढझाली. नाताळमध्ये आणखी एक विशेष आकर्षणाचा भाग म्हणजे 'सांताक्लॉज'! चौथ्या शतकात आशिया मायनरमध्ये 'सेंट निकोलस' नावाचे बिशप होते. पांढरीशुभ्र दाढी आणि सदैव हसतमुख असलेले हे बिशप सत्कृत्ये आणि मुलांबद्दलचे अपार प्रेम यासाठी प्रसिद्ध होते. सांताक्लॉजच्या रूपात नाताळ सणामध्ये त्यांचीच आठवण काढली जाते. असा हा 'सांताक्लॉज' 'ख्रिसमस ईव्ह'च्या संध्याकाळी लहान मुलांना गिफ्ट देतो असा समज आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी आपण एकमेकांना शुभेच्छा देतो. येणाऱ्या वर्षात सगळे काही चांगले घडावे, अशी कामना व्यक्त करतो. तरी मनाच्या एका कोपऱ्यात काळजी, चिंता आणि भीती असते, मात्र असा हा ख्रिसमस वर्षाच्या शेवटी जणू नवीन वर्षाची सकारात्मक आशाच घेऊन येतो.

भारतीय धर्म-संस्कृतीशी ऋणानुबंध जोडून दाखवणारे आणखी एक वैशिष्ट या २५ डिसेंबरशी निगडित आहे. प्राचीन काळात रोम राज्यात २५ डिसेंबर हा दिवस सूर्याची जयंती म्हणून मानला जात होता. २५ डिसेंबर या दिवशी प्राचीन रोम संस्कृतीने सूर्याशी जसे नाते जोडून ठेवले त्याचप्रमाणे अशा या मोठ्यात मोठ्या दिवसाशी आपल्या मोठ्यात मोठ्या सणाचे नाते जोडून ख्रिस्तानुयायांनी एक सांधा जोडून घेतला, असे म्हटले पाहिजे.

असो, धर्म आणि धर्मदैवते वेगळी असली तरी सर्व जगावर सोनेरी किरणांची पखरण करणारा आणि अखिल विश्वाचा जणू आत्माच असलेला सूर्य मात्र अनादी अनंत आभाळात सर्व धर्मीयांसाठी एकच. म्हणूनच आपणही थोडे विसावूया, विरून जाऊया आजूबाजूच्या आनंदात, धरूया फेर, थिरकूदे पावले आणि भरुदे हे आकाश 'मेरी ख्रिसमस'च्या धुंदीनं.

आपणही आपले ख्रिसमसचे रंग आमच्या सोबत उधळू शकता,
आपले लेखन इ-मेलने खालील पत्त्यावर पाठवा.
mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखांचा अंकात समावेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका पुस्तक खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत,
मेहता मराठी ग्रंथजगत




# ई-बुक्सचे भविष्य

जागतिक ई-बुक मार्केटचे पुढील पाच वर्षातील संभाव्य भवितव्य या विषयावरील एका ताज्या अहवालात इ.स. २०१३ मध्ये एकूण ग्रंथव्यवहारात ११.९ टक्के ई - बुक्स वाटा होता असे नमूद करून, इ.स. २०१८ मध्ये हे प्रमाण २६.३ टक्के झालेले असेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. लंडनमध्ये ऑक्टोबर २०१४ मध्ये भरलेल्या फ्यूचरबुक परिषदेच्या पूर्वतयारीच्या निमित्ताने करण्यात आलेल्या डिजिटल सेन्सस सर्वेक्षणात ई - बुक्स संदर्भातील दहा मुख्य मुद्द्यांचा परामर्श घेण्यात आला, आणि ई-बुक्सच्या मागणीत थोडेफार चढउतार दिसत असले तरी एकूण वातावरण आशावादी, उत्साही असून डिजिटल पुस्तकांबद्दलची जागरुकता वाढत आहे.

किंडल, नूक वगैरे ‘डेडिकेटेड ई बुक रीडर’ बरोबरच, टॅब्लेट, स्मार्टफोन, आयपॅड वगैरे साधनांद्वारेही ईबुक्स वाचण्याची सवय वाचकांना होत आहे. छापील पुस्तकांबद्दलचे आकर्षण फारसे ओसरलेले नाही, परंतु तरुणांना मात्र नव्या तंत्रज्ञानाच्या परिचयामुळे स्मार्टफोन, टॅब्लेट, किंडल यावर वाचन करणे जास्त सोयीस्कर वाटू लागले आहे. ई - बुक्सच्या किंमतीही कमी असल्याने (९९ सेंट ते पाच दहा डॉलर्स) छापील पुस्तकांच्या (पाच ते पंचवीस डॉलर्स) तुलनेत पूर्वीपेक्षा अधिक पुस्तके वाचण्याची प्रवृत्ती रुजत आहे असे आढळून येत आहे. शिवाय अनेक पुस्तके मोफत मिळत असल्याने आणि हवी ती पुस्तके एका क्लिकवर उपलब्ध होत असल्याने छापील पुस्तकासाठी दुकानात जाण्याचा व्याप आणि वेळही वाचत आहे -



त्यामुळे ई - बुक्सबाबत आरंभी असणारा विरोध हळूहळू कमी होऊ लागला आहे असा या सर्वेक्षणाचा एक निष्कर्ष आहे.

ई-बुक्सचा आणखी एक फायदाही महत्वाचा ठरत आहे. पूर्वी पुस्तक छापून बाजारात आणायचे म्हणजे प्रकाशनसंस्थेची मदत घेणे आवश्यक असे. पुस्तक विकण्यासाठी विक्रेत्यांची गरज असे. आता सेल्फपब्लिशिंगची सोय झाल्याने लेखक आपले नवे पुस्तक इबुकच्या रूपात इंटरनेटवर विक्रीला टाकू शकतो. ॲमेझॉनसारख्या संस्थाही सेल्फपब्लिश्ड पुस्तकांच्या विक्री व जाहिरातीसाठी सिद्ध झाल्या. त्यामुळे प्रकाशकावर विसंबून राहण्याची गरज उरली नाही. प्रकाशनसंस्था अर्थातच आपले व्यावसायिक निर्मिती नैपुण्य आणि वितरण कौशल्य वापरून व्यवहार करत राहतीलच. ई - बुक्स क्षेत्रातही आपले स्थान निर्माण करत राहतील. नुकतीच 'सोसायटी ऑफ यंग पब्लिशर्स कॉन्फरन्स' झाली. या परिषदेत लिटल ब्राउन या प्रकाशन संस्थेच्या प्रमुख उर्सुला मॅकेंझी यांनी प्रकाशन व्यवसायाचे पूर्वीचे स्वरूप, ॲमेझॉनचा या क्षेत्रातील प्रवेश आणि व्यावसायिक यश मिळवण्याची संधी सर्वांना मिळणे शक्य झाले आहे असे स्पष्ट केले.

पूर्वी प्रकाशक सेल्फ पब्लिशिंगकडे थोडेफार तुच्छतेने पाहत; त्यांच्या दृष्टिकोनात आता फरक पडू लागला आहे. फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे सारख्या





स्वयंप्रकाशित पुस्तकाचे यश नजरेआड करायचे कारण नाही. प्रकाशन व्यवसायाचे स्वरूप आता बदलत आहे. पूर्वी प्रकाशकाची भूमिका अदृश्य असे. आता आपल्या पुस्तकात वाचकांना वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण, नावीन्यपूर्ण काय मिळेल हे सांगणे क्रमप्राप्त ठरते. ई - बुक्समुळे आज जगभर आपल्या पुस्तकाची प्रसिध्दी होऊ शकते. पूर्वी पुस्तकाची जाहिरात करावी लागे, ते मोठे खर्चीक काम असे. फेसबुक, ट्विटर वगैरे सोशल मिडियाद्वारे आता लाखो लाइक्स मिळू शकतात, आणि त्याचा फायदा पुस्तकाच्या विक्रीसाठी होऊ शकतो.

आगामी

# सफारी आफ्रिकेतली

लेखक
पीटर ऑलिसन

अनुवाद
मंदार गोडबोले




जंगल हे ठिकाण असे असते जिथे तुम्ही जरा चुकीचे वागल्यास कोणाच्यातरी तोंडचा घास होऊ शकता! कारण या जंगलात असतात, घातक शिकारी प्राणी, चिडलेले हत्ती आणि जगातले सर्वांत बेभरवशाचे प्राणी – म्हणजे, बेलगाम पर्यटक आणि अविचाराने धाडस करणारे सफारी गाइड! या सगळ्याचे चित्रण लेखकाने या पुस्तकात केले आहे.

अंगावर धावून येणाऱ्या सिंहांचा लेखकाने दोन वेळा कसा सामना केला, ब्रिटिश राजघराण्यातून आलेल्या झिंगलेल्या अर्धनग्न पर्यटकाचा रात्रीच्या अंधारात कसा शोध घेतला, पर्यटकांनी भरलेली लँडरोव्हर गाडी पाणघोडे असलेल्या जलप्रवाहात घेऊन गेल्यावर कशी तारांबळ उडाली, आणि आफ्रिकेतल्या सर्वांत धोकादायक प्राण्याला त्याने आपला पाळीव प्राणी कसे बनवले, असे विविध अनुभव लेखक गोष्टीरूपांत सांगतो. नर्मविनोदी शैलीतले हे अनुभव कधी भीतीने अंगावर काटा उभा राहतो, तर कधी हसून-हसून वाट लागते, तर कधी डोळ्यांत पाणी उभे राहते.

चला तर, आफ्रिकेतल्या जंगलातली शब्दसफारी अनुभवायला!




## कर्णबधिरांशी संवाद साधणारे टॅब्लेट: 'युनी'

जगातील सुमारे ७० लाख नागरिक केवळ सांकेतिक भाषेचा उपयोग करतात, मात्र प्रत्येकालाच ती भाषा येत नसल्यामुळे त्यांच्याशी संवाद साधताना अडचण निर्माण होते. ही अडचण दूर करण्यासाठी सॅनफ्रान्सिस्कोमधील काही कर्णबधिर उद्योजकांनी एकत्र येऊन सांकेतिक भाषा व ओठांच्या हालचाली मजकुरामध्ये परावर्तित करणारे टॅब्लेट तयार करून त्याला 'युनी' असे नाव दिले आहे. यामध्ये कॅमेरा आणि लीप मोशन टेक्नॉलॉजी वापरण्यात आली आहे. हे उपकरण सांकेतिक भाषा शब्दांत रूपांतरित करून टॅब्लेटच्या स्क्रीनवर दाखवते. ही प्रक्रिया काही क्षणांत होत असल्यामुळे कर्णबधिर आणि सामान्य लोकांमधील संवाद व्यवस्थित होऊ शकतो. निर्मात्यांनी त्याचे वर्णन 'कर्णबधिर आणि ऐकू येणाऱ्यांमधील दुतर्फी संवादाचे क्रांतिकारी साधन,' असे केले आहे. सध्या हे उपकरण 'डेल व्हेन्यू प्रो ८' या टॅब्लेटसाठी बनवण्यात आले असून, लवकरच इतर अँड्रॉइड आणि आयओएस सिस्टीमसाठी विकसित केले जाईल.

## शैक्षणिक अक्षमता

नोव्हेंबर महिना 'शैक्षणिक अक्षमता जनजागृती महिना' म्हणून पाळला जातो. या निमित्ताने 'डॉ. अंजली मॉरिस एज्युकेशन अँड हेल्थ फाउंडेशन' तर्फे घोले रस्त्यावरील पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र येथे 'ओव्हरकमिंग लर्निंग डिसॲबिलिटीज्' या माहितीपर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने संस्थेच्या प्रमुख डॉ. उमा कुलकर्णी आणि प्रशिक्षण व्यवस्थापक शीतल कापरे यांनी शैक्षणिक अक्षमतेविषयाच्या काही मुद्द्यांवर प्रकाश टाकला.

कापरे म्हणाल्या, "शिक्षणातील अक्षमतेची तक्रार घेऊन आलेल्या

सर्वाधिक मुलांमध्ये वाचन आणि लेखनातील अडचणीच बघायला मिळतात. त्याखालोखाल गणितातील आकडेमोड करण्यात अडचणी येणे, एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करता न येणे, चंचलता अशा तक्रारी दिसतात. साधारणपणे पहिली ते पाचवीच्या वर्गातील मुलांमध्ये हे दिसून येते. या मुलांच्या बाबतीत शैक्षणिक अक्षमतेचे निदान करताना भाषेचा अडसर लक्षात घेणे खूप महत्त्वाचे ठरते. भाषा पक्की नसली, तर वाचन, लिखाण आणि एकूणच भावना व्यक्त करण्यात मुलांना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे मुलाला केवळ भाषेची अडचण आहे, की त्याला शैक्षणिक अक्षमता आहे हे निश्चित करावे लागते.''

मातृभाषा पक्की होण्याच्या आधीच दुसऱ्या भाषा शिकणे हे देखील भाषेच्या अडचणीचे एक कारण असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, ''घरातल्या मंडळींबरोबर मूल एका भाषेत बोलत असते, तर शाळेतली भाषा वेगळी असते. हल्ली कामाच्या निमित्ताने अनेक कुटुंबांना एका ठिकाणाहून दुसरीकडे स्थलांतरित व्हावे लागते. यात पालकांची चूक आहे असे म्हणता येणार नाही. तरीही आधी बालकाची मातृभाषा पक्की झाल्यास भाषेच्या अडचणी कमी होऊ शकतील.''

## 'झीरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोजल'चे प्रकाशन

जग बदलतंय तसा भारतही बदलतोय. नव्या भारतासाठी गुणवत्ता आणि विश्वास महत्त्वाचा आहे. लाल गालिचा केवळ परदेशी उद्योजकांसाठी नसून सरकारी कार्यालयांमध्ये काम घेऊन येणाऱ्या सर्वसामान्यांसाठी देखील ते असले पाहिजे. सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून त्या दृष्टीने काम झाले पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केली.

राज्याचे जमाबंदी आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी लिहिलेल्या 'झीरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोजल' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. राज्याच्या महसूल आणि वन विभागाचे प्रधान सचिव एस.एस. संधू, माजी मुख्य अपर सचिव उमेशचंद्र सरंगी, विभागीय आयुक्त विकास देशमुख, जिल्हाधिकारी सौरभ राव, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त राजीव जाधव, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य मुनाफ हकीम या वेळी उपस्थित होते.

पंतप्रधानांनी स्वच्छतेचा नारा दिलेला असतानाच सरकारी

कार्यालयातील प्रलंबित कामे पूर्ण कशी व्हावीत हे सांगणारे पुस्तक यावे, ही अचूक वेळ असल्याचे सांगून माशेलकर म्हणाले, देश बदलण्यासाठी लोक पुढे आले पाहिजेत. पण, लोकांची मानसिकता कशी बदलायची हा खरा प्रश्न आहे. नव्या युगातील भारतासाठी नवी दिशा हवी. सरकार देखील बदललेले हवे आहे. काय केले पाहिजे हे सगळेच सांगतात. पण, कसे केले पाहिजे हे कोणीच सांगत नाही. 'आधी केले मग सांगितले' असे चंद्रकांत दळवी यांचे हे पुस्तक त्याला अपवाद आहे.

हेलपाटे, ससेहोलपट हे शब्द मी महाराष्ट्रात येऊनच शिकलो. सरकारी कार्यालयांमध्ये उदासीनता आहे. प्रशिक्षण, उत्साह आणि ज्ञानाचा अभाव असल्याने प्रशासनाने लोकांचा विश्वास गमावला आहे, अशा शब्दांत एस. एस. संधू यांनी शासकीय कार्यसंस्कृतीवर बोट ठेवले. सातबारा लगेच मिळेल, त्याचप्रमाणे जगाच्या कानाकोपऱ्यात कोठेही असताना जन्मदाखला ऑनलाइन मिळेल, अशी नवी व्यवस्था येत असल्याचे त्यांनी सांगितले.

चंद्रकांत दळवी म्हणाले, की कागद पुढे सरकत नाही म्हणून कामे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. दररोज कागद पुढे पाठविले तर झीरो पेंडन्सी होऊ शकेल. शंभर टक्के उद्दिष्ट साध्य करण्याच्या संस्कृतीतून झीरो पेंडन्सी करता येईल. पाठपुराव्याशिवाय काम झाले पाहिजे.

## बालगोपाळांसाठी बालदिनानिमित्त पाच ॲप्स

चौदा नोव्हेंबरला खास बाल दिनानिमित्त बालमित्रांना भेट म्हणून पांडवलेणी येथील अरेट टेक्नॉलॉजीज्‌चे संचालक आनंद शिरसाठ यांनी पाच अँड्रॉईड ॲप्स विकसित केली आहेत. दोन दिवसांत हजारो युजर्सनी ही ॲप्स डाउनलोड केली आहेत.

नॉलेज हबमध्ये संगणक शाखेत अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच मुलांना खेळण्यासाठी काही आनंददायी ॲप तयार करण्याचा शिरसाठ यांनी संकल्प केला होता. तीन महिन्यांपासून यावर काम सुरू होते. चेतन बराटे आणि गौरव पाटील यांच्या मदतीने सखोल माहिती घेत अँड्रॉईड बालवाडी, मराठी बालगीते, माझा कट्टा, आय एम पॉसिबल आणि मस्ट हॅव ही पाच ॲप्स विकसित केली आहेत. यात बालवाडी ॲप्समध्ये लहानग्यांसाठी उपयुक्त असणारे मराठी आणि इंग्रजी बाराखडी, अंकओळख, प्राणी आणि पक्ष्यांची चित्रे, त्यांचे आवाज याचे मोठे कलेक्शन आहे. बालगीतांमध्ये 'नाच

रे मोरा’पासून तर ‘असावा सुंदर चॉकलेटचा बंगला’ आदी गीतांचा समावेश आहे.

‘माझा कट्टा’ या ॲप्समध्ये महाराष्ट्रातील ५४ किल्ल्यांची माहिती छायाचित्रांसह देण्यात आली आहे. समाजसुधारक, स्वातंत्र्यवीर, सर्वोत्कृष्ट खेळाडूंची माहितीही या ॲप्समध्ये समाविष्ट आहे. आय एम पॉसिबल ॲप्समध्ये विविध क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या व्यक्तिंचे विचार आदी बाबी आहेत.

## नव्या पिढीशी हितगुज

‘ज्या भारतीय लेखकांनी उत्तम गोष्टी लिहिल्या आहेत त्यांनी विज्ञानकथा लिहिण्याकडे वळावे, म्हणजे आपल्या विज्ञानकथांचा दर्जा उंचावेल’, असे मत ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले.

‘अक्षरधारा’तर्फे आयोजित ‘माय मराठी शब्दोत्सवा’त डॉ. जयंत नारळीकर व गणितज्ञ मंगला नारळीकर यांच्याशी लहान मुले व पालक यांच्या गप्पांचे आयोजन करण्यात आले होते. ‘पुस्तकांच्या जगात’ असा या कार्यक्रमाचा विषय होता.

जयंत नारळीकर म्हणाले, ‘‘विज्ञान लोकांपर्यंत पोहोचवता यावे या इच्छेतून मी गोष्टी लिहू लागलो. उत्तम कथा लिहिणाऱ्या भारतीय लेखकांनी विज्ञानकथांचे लेखन करायला हवे. असे झाल्यास आपल्याकडील विज्ञानकथांचा दर्जा सुधारेल. लहान मुलांना विनोदी वाङ्मय दुय्यम नसून जीवनातील काही प्रसंग हसण्यावारी नेणे कसे गरजेचे असते हे त्यातून शिकायला मिळते.’’

मराठी भाषेस कमी समजून मुलांनी इंग्रजीच वाचले पाहिजे असा आग्रह पालकांनी धरू नये. त्यांनी कुठल्या एखाद्याच विषयावरील पुस्तके वाचावीत अशी सक्तीही नको. विविध विषयांवरील पुस्तके वाचण्याची संधी मुलांना द्यावी काय वाचले, त्यातून काय समजले यावर पालकांनी त्यांच्याशी संवादही साधायला हवा,’ असे मंगला नारळीकर यांनी सांगितले.

## तिसरी विज्ञान गॅलरी

बेंगळुरु येथे आशियातील पहिली व जगातील तिसरी सायन्स गॅलरी

(विज्ञान सज्जा) तयार होत आहे, तिथे कला व विज्ञान यांचा मिलाफ आपल्याला पाहायला मिळणार आहे. ‘इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्सेस’ ही संस्था सायन्स गॅलरी तयार करीत असून ती २०१८ पर्यंत पूर्ण होणार आहे.

कर्नाटक सरकारने ‘सायन्स गॅलरी इंटरनॅशनल’ या आयर्लंडमधील संस्थेशी सामंजस्य करार केला आहे. पहिली सायन्स गॅलरी २००८ मध्ये डब्लिन येथे तयार होत आहे. बंगळुरू, न्यूयॉर्क, शिकागो व व्हेनिस येथेही त्या उभारण्यात येतील. तिच्यात विविध विषयांवर नेहमी प्रदर्शने भरवली जातात; त्यातून विज्ञान व कला यांचा संगम साधला जातो. ख्रिस हॉर्न हे सायन्स गॅलरी इंटरनॅशनलचे अध्यक्ष आहेत. त्यांनी विज्ञान संग्रहालय व गॅलरी यातील फरक स्पष्ट केला.

दरवर्षी तिथे पाच विषयांवर विज्ञान प्रदर्शने होतील, त्यात देशी-परदेशी वैज्ञानिक भाग घेतील. १५ ते २५ वयोगटातील मुलांसाठी प्रयोग व प्रारूपांचे प्रदर्शन यांचा वापर केला जातो.

## डॉ. रावसाहेब कसबे नाबाद - ७०

‘दलित साहित्य, मुस्लिम साहित्य असे काही नसते. साहित्य हे साहित्य असते. साहित्याला ठराविक चाकोरीत बांधता येत नाही. साहित्य हा निसर्ग, समाजाशी साधलेला संवाद असतो,’ असे मत डॉ. रावसाहेब कसबे यांनी मांडले.

डॉ. कसबे यांनी सत्तरीत पदार्पण केल्याचे औचित्य साधून महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. कसबे म्हणाले, ‘जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील सांस्कृतिक आक्रमणात अनेक भाषा मरणार आहेत. पूर्वी उच्चवर्गापुरत्या मर्यादित असलेल्या इंग्रजी माध्यमातील शिक्षणाचा विचार सर्वसामान्यांकडूनही केला जाऊ लागला आहे. जागतिकीकरणामुळे स्पर्धा निर्माण झाली, हे त्यामागील मुख्य कारण आहे. जागतिकीकरणाने राष्ट्रांच्या सीमा विस्तारल्या. शिक्षणासाठी पालक गुंतवणूक करू लागले, ही आनंददायी बाब आहे. जगातील अनेक भाषा मेल्या आहेत. बोलीभाषाही विस्मृतीत जाऊ लागल्या आहेत. मात्र ज्ञान-विज्ञानाची वाहक नाडी असणारी भाषा टिकते.’’

## टॅबद्वारा पालकांना साक्षरतेचे धडे

निरक्षक पालकांना संगणकाद्वारा मुले साक्षरतेचे धडे देणार आहेत. इनरव्हील क्लब ऑफ डॅफोडीलने यासाठी पुढाकार घेतला आहे. विष्णूजी शेकूजी सातव विद्यालयातील २० मुलांना क्लबच्या वतीने टॅबचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रीय साक्षरता अभियानाच्या निमित्ताने हा उपक्रम राबविला आहे. या टॅबमध्ये अत्याधुनिक अक्षरधारा हे सॉफ्टवेअर आहे. दोन महिन्यांत एक मुलगा दहा पालकांना साक्षरतेचे धडे देणार आहे. आणखी ५० मुलांना टॅब दिले जाणार असल्याची माहिती क्लबच्या अध्यक्ष लीना खंडेलवाल यांनी दिली. पहिल्या टप्प्यात २०० निरक्षर पालकांची निवड करण्यात आली असून ५०० निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्राचार्य एन. के. निंबाळकर यांनी सांगितले.

## ऑटिझमग्रस्तांच्या पालकांना दिलासा

आत्ममग्न (ऑटिझमग्रस्त) मुले असलेल्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना बदल्यांच्या त्रासातून मुक्तता मिळाली आहे. अशा पालकांची बदली करू नये, तसेच त्यांनी पदोन्नतीवरील बदली नाकारल्यास त्यांना स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) घेण्यासही सांगू नये, असा आदेश केंद्रीय कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाने काढला आहे.

विशेष मुलांच्या पालकांना ही सवलत सध्या लागू आहे. त्या यादीत आता ऑटिझमग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे. ऑटिझम हा मेंदूच्या विकासातील दोषांचा आजार आहे. 'ऑटिझमग्रस्त मुलांना सातत्याने देखभालीची गरज असते हे लक्षात घेता ऑटिझमचा समावेश अपंगांच्या यादीत करण्यात आला आहे,' असे या परिपत्रकात म्हटले आहे.

एखादा कर्मचारी आपल्या अपत्याचा मुख्य काळजीवाहक असेल, त्याची बदली झाल्यास नव्या वातावरणाशी जुळवून घेणे त्यांच्या अपत्यांच्या पुनर्वसनामध्ये अडथळा ठरू शकते. त्यामुळे प्रशासकीय मर्यादांच्या अधीन राहून अशा कर्मचाऱ्यांना नियमित बदली व आवर्ती बदल्यांमधून सवलत देण्यात येईल.

अंथरुणाला खिळून असलेले सेरेब्रल पाल्सीग्रस्त, अंध किंवा कमी दृष्टी असलेले कर्णबधीर, कुष्ठरोगी, मतिमंद, मानसिक आजारग्रस्त, बहुविकलांग

आदी आजार असलेल्या मुलांच्या पालकांना ही सवलत मिळेल.

संबंधित व्यक्तीला किमान शारीरिक, संवेदनात्मक, बौद्धिक, मानसिक आणि सामाजिक सक्रियता पातळी गाठता येण्यासाठी केली जाणारी प्रक्रिया म्हणजे पुनर्वसनासाठी भाषिक भाग, शाळा किंवा प्रशिक्षण केंद्र, प्रशासन, शेजारी, शिक्षक किंवा विशेष प्रशिक्षक, मित्र, वैद्यकीय सेवा उदा. डॉक्टर, थेरपिस्ट हॉस्पिटल वगैरेचा समावेश यात होतो.

## गुगलचाही ऑनलाइन शॉपिंग फेस्टिव्हल

फ्लिपकार्ट, स्नॅपडील यासारख्या ई-कॉमर्स वेबसाइटच्या शॉपिंग फेस्टिव्हलला मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर गुगलनेही १०-१२ डिसेंबर दरम्यान फेस्टिव्हल घेऊन घसघशीत सवलतीसह नवीन उत्पादने लाँच करण्याचे जाहीर केले आहे.

गेली दोन वर्षे गुगलतर्फे या फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. गेल्या वर्षी फेस्टिवल दरम्यान वेबसाइटला सुमारे दीड कोटी व्यक्तींनी भेट दिली होती. त्यापैकी ४० टक्के टायर २, टायर ३ शहरांमधील होते. या फेस्टिव्हलच्या आधी दोन आठवडे गुगल आणि ई-कॉमर्स कंपन्या यासाठी मोठ्या प्रमाणात ऑनलाइन जाहिराती करणार आहेत. फेस्टिव्हल दरम्यान विविध ऑफर्स तसेच सहभागी होणाऱ्या ग्राहकांसाठी स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत.

फेस्टिव्हलपूर्वी २७ नोव्हेंबरपासून स्पर्धा घेऊन त्यातील विजेत्यांना बक्षिसे दिली जाणार आहेत. बड्या ऑनलाईन सेलच्या या जमान्यात ग्रेट ऑनलाइन शॉपिंग फेस्टिव्हलमध्ये ग्राहकोपयोगी वस्तू, कपडे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कलात्मक वस्तू, टूर पॅकेज यासह अगदी टू-व्हीलरही विक्रीसाठी उपलब्ध असतील. यंदा आयोजक विविध शहरांमध्ये 'डिजिटल वॉल्स' उभारणार आहेत. यावर दिसणाऱ्या प्रॉडक्टसोबतचा क्यूआर कोड स्कॅन करून ग्राहक त्यासाठी ऑर्डर नोंदवू शकणार आहेत.

## वारकरी संगीत संमेलन

वारकरी संगीत ही पिढ्यानपिढ्या चालत आलेली परंपरा आणि संस्कृती आहे. वारकऱ्यांच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे संगीत पोहोचवले जात आहे, असे मत वारकरी संप्रदायाचे नेते आणि ज्येष्ठ

कीर्तनकार बंडातात्या कराडकर यांनी व्यक्त केले.

संगीतोन्मेष संस्थेतर्फे शनिवारवाड्याच्या प्रांगणात नवव्या अखिल भारतीय वारकरी संगीत संमेलनाचे ९ नोव्हेंबर रोजी कराडकर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. संमेलनाध्यक्ष राजुबाबा शेख, पराग मते, बापूराव कर्णेगुरुजी आदी यावेळी व्यासपीठावर होते.

या उपक्रमातून वारकरी संगीताचे महत्त्व समाजाला कळेल, असे शेख म्हणाले. याप्रसंगी तिसरा 'गीत- नृत्य-वाद्य पुरस्कार' पांडुरंग महाराज हिंगे यांना प्रदान करण्यात आला. निरंजन भाकरे आणि सहकाऱ्यांनी भारुड सादर केले.

वारकरी संगीताचे महत्त्व समाजाला समजावे आणि वारकऱ्यांमधील कलागुणांना समाजासमोर आणावे, या दोन प्रमुख हेतूंनी हे संमेलन आयोजित केले आहे, अशी माहिती संयोजक पं. यादवराज फड यांनी दिली.

## अंजनी माशेलकर इनॉव्हेशन पुरस्कार

मज्जासंस्थेविषयी तयार केलेल्या उपकरणाच्या संशोधनासाठी डॉ. जयराज चिंतामणी यांना यंदाचा अंजनी माशेलकर इन्क्लुझिव्ह इनोव्हेशन पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवकल्पना केवळ जन्मास येणे पुरेसे नाही, तर त्यांचा समाजाला उपयोग झाला पाहिजे, त्यामुळे नवकल्पना समाजाशी जोडणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अहमदाबाद आयआयएम मधील प्राध्यापक व हनी बी नेटवर्कचे संचालक प्रा. अनिल गुप्ता यांनी केले.

पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या (पीआयसी) वतीने सोशल इनोव्हेशन या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. सेबीचे माजी अध्यक्ष डी. आर. मेहता, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे यावेळी व्यासपीठावर होते.

कल्पक नागरिकांकडून पुढे येणाऱ्या कल्पना प्रत्यक्षात येण्याची गरज असते. त्यासाठी कल्पक मंडळींचे नेटवर्क पाहिजे, असे मत गुप्ता यांनी व्यक्त केले. सामाजिक क्षेत्राने विज्ञानाशी नाते प्रस्थापित केले पाहिजे, असे मत मेहता यांनी यावेळी मांडले. जगप्रसिद्ध जयपूर फूटचा शोध आणि ते बसविण्याच्या उपक्रमाची माहिती त्यांनी यावेळी दिली.

आज सर्व क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानामुळे मोठे बदल होत असून, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक उपक्रम यांची सांगड घातली गेली तर मोठे बदल

घडू शकतील, असे मत डॉ. माशेलकर यांनी व्यक्त केले. कोणालाही वापरता येणारा युनिव्हर्सल चष्मा, सौरशक्तीवरील प्रोजेक्टर आणि कम्प्युटर, पिण्याचे पाणी तयार करणे, अशा कल्पना पुण्यातील 'सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क'चे संचालक डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी सादर केल्या.

## कथायात्रा महोत्सवाचे आयोजन

प्रादेशिक भाषांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या 'भाषा' संस्थेतर्फे २१ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत कथायात्रा महोत्सवाचे आयोजन बालगंधर्व रंगमंदिर येथे करण्यात आले. केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. महोत्सवात नृत्य, नाट्य, कथन, सांगीतिका, पारंपरिक लोककला, बाहुली नाट्य या माध्यमातून मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी 'कथा' साजरी केली गेली.

मुलांसाठी विविध कार्यशाळा, आजी-आजोबांसाठी 'गोष्ट सांगा' स्पर्धा आणि राज्यस्तरीय आंतरशालेय प्रश्न मंजूषा स्पर्धा घेण्यात आल्या. 'भाषांतर व स्थलांतर' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद साहित्य अकादमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या सहकार्याने २१ आणि २२ नोव्हेंबरलाच हॉटेल ल मेरिडियन येथे भरविण्यात आली.

## 'कॅप्टन लक्ष्मी'चे प्रकाशन

'नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल पंतप्रधान होऊ शकले नाहीत. त्यांच्या अफाट कार्यकर्तृत्वापुढे हे पद छोटेच होते. मात्र, त्यांचे नाव इतिहासात अमर आहे. कारण, इतिहासाला अमरत्वाचे पंख असतात,' असे मत ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांनी १७ नोव्हेंबरला मांडले.

डॉ. रोहिणी गवाणकर यांनी लिहिलेल्या 'कॅप्टन लक्ष्मी आणि राणी झांशी रेजिमेंट' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन पाटील यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी लीला चितळे, 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ आदी या वेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, 'सुभाषचंद्र बोस यांनी महिलांची पहिली रेजिमेंट उभारली ही अभिमानाने सांगण्याची गोष्ट आहे. कॅप्टन लक्ष्मी यांच्यासारख्या रणरागिणीची कहाणी रणरागिणीनेच या पुस्तकातून सांगितली आहे. कॅप्टन

लक्ष्मी आणि रेजिमेंटवर अशा प्रकारे कोणत्याही भारतीय भाषेत लेखन झालेले नाही. आताचा काळ झपाट्याने बदलत असताना अशा पुस्तकाची गरज आहे.’

‘स्वातंत्र्य संग्रामाच्या काळाची साक्षीदार असल्याने या पुस्तकाचे महत्त्व शब्दात सांगता येणार नाही. मागील पिढीने नि:स्वार्थी वृत्तीने स्वातंत्र्य पुढील पिढीकडे सोपवले. हे पुस्तक त्याच कृतज्ञतेतून आलेले आहे. आताच्या जगाला गांधी तत्त्वाशिवाय पर्याय नाही. राणी झांशी पलटण हा स्वातंत्र्यासाठीचा नैतिक प्रयोगच होता, असे चितळे यांनी सांगितले.

## एकांकिका स्पर्धा

स्वत:विषयी न्यूनगंड असलेल्या मुलाचा लग्नापर्यंतचा प्रवास मांडणारी ‘चिऊताई चिऊताई दार उघड’ ही अनुभव संस्थेची एकांकिका ‘रंगसंगीत  विभागात अंतिम फेरीसाठी निवडली गेली. ब्रॉडवे थिएटरच्या पद्धतीने सादर झालेली ही एकांकिका परीक्षकांप्रमाणेच उपस्थितांचीही दाद मिळवणारी ठरली. नाट्यमंडळ, पुणेच्या ‘बंगला न. ४७ या एकांकिकेचा द्वितीय क्रमांकासाठी निवड झाली,

थिएटर ॲकॅडमी आयोजित ‘रंगसंगीत संगीत एकांकिका २०१४ ही स्पर्धा नाशिक, गोवा, कणकवली, औरंगाबाद आणि पुणे अशा पाच ठिकाणी झाली. १० ते १४ नोव्हेंबर या पाच दिवसांत पुण्यातील एकूण २० संघांनी स्पर्धेत भाग घेतला. ‘चिऊताई चिऊताई दार उघड’ आणि संक्रमणची ‘झिम पोरी झिम’ या दोन  संगीत एकांकिका आणि बीएमसीसीची ‘बर्फ पिघलाए’ ही गद्य एकांकिका... या तीन एकांकिकांच्या सादरीकरणाने स्पर्धेच्या पुण्यातील प्राथमिक फेरीची सांगता झाली. गद्य विभागात आयएलएस विधी महाविद्यालयाची ‘चिठ्ठी’, गरवारे  वाणिज्य महाविद्यालयाची ‘रूह हमारी’ आणि महाराष्ट्रीय कलोपासकच्या ‘नातं’ या एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली.

## शालेय ग्रंथालयात पुस्तकांचे व्यवस्थापन जुन्याच पद्धतीने

सध्याच्या तंत्रज्ञानाच्या जमान्यात ग्रंथालयांचा प्रवास ई-लायब्ररीच्या दिशेने होत असताना शालेय ग्रंथालयांचा कारभार कम्प्युटरविनाच सुरू आहे. शिक्षण हक्क कायद्यातील स्वच्छतागृहे, शाळेला

भिंत या निकषांप्रमाणेच त्यात ग्रंथालय असण्याची मागणीही जोर धरत आहे.

वाचनसंस्कृती जोपासण्याची गरज, लहान वयातच न होणारे वाचनाचे संस्कार या विषयांवर साहित्य संमेलनांतून चर्चा केली जाते. मात्र, शाळा तेथे ग्रंथालय आणि ग्रंथपाल ही संकल्पना अजूनही अपूर्णच आहे.

शाळांतील ग्रंथालयांची स्थिती समाधानकारक नाही. बहुतांश शाळांमध्ये ग्रंथपाल अर्धवेळ काम करत आहेत. ग्रंथपालांची सुधारित वेतनाची मागणीही दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. अनेक शाळांमध्ये ग्रंथालयासाठी पुरेशी जागा नाही, वाचनकक्ष नाही. मदतनीस नाही अनेक शाळा वर्षानुवर्षे नव्या पुस्तकांची खरेदी करत नसल्याने विद्यार्थ्यांना सकस साहित्यापासून वंचित राहावे लागते. परिणामी, योग्य वयात वाचनाचा संस्कारच होत नाही.

'सरकारने शालेय ग्रंथालयांकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. बालवयातच वाचनाचा संस्कार मुलांवर करणे आवश्यक असते. त्यासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा सरकारने ग्रंथालयांसाठी करून दिल्या पाहिजेत. ग्रंथालयाचा व्यवहार व्यवस्थित होण्यासाठी आता कम्प्युटर आवश्यक झाला आहे.

आता राज्यात आलेले नवे सरकार या मागण्यांकडे लक्ष देऊन शालेय ग्रंथालयांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समृद्ध करणार का हा प्रश्न आहे.

## पसायदान एकवीस भाषांमध्ये

कार्तिकी एकादशीनिमित्ताने संपादक डॉ. सुरेश गरसोळे व प्रा. मुक्ता गरसोळे यांनी बहुभाषिक पसायदानाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. मराठीसह कोंकणी, संस्कृत, कन्नड आदी पंधरा भारतीय भाषा आणि सहा परदेशी भाषा यांचा त्यात समावेश आहे. तसेच पसायदानावर ज्येष्ठांचे संक्षिप्त भाष्यही देण्यात आले आहे.

## ग्रंथ पुरस्कारांसाठी ग्रंथ पाठवण्याचे आवाहन

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या ग्रंथ पुरस्कारांसाठी ग्रंथ पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पुरस्कारांसाठी गेल्या दोन वर्षांमध्ये प्रकाशित झालेल्या वैचारिक, संशोधनपर ग्रंथांचाच विचार केला जातो. संस्थेतर्फे गेल्या अनेक वर्षांपासून हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२०-२४४७२२८०

## चोवीस तासांच्या मैफलीतून रोहिणी भाटे यांना आदरांजली

एक-दोन नव्हे, तर तब्बल चोवीस तासांच्या नृत्य मैफलीद्वारे नृत्यगुरू पं. रोहिणी भाटे यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. रोहिणी भाटे यांच्या नव्वदाव्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्नुषा शमा भाटे यांच्या 'नादरूप' संस्थेने पुढाकार घेऊन 'अखंड घुंगरू नाद' ही मैफल घेतली.

या मैफलीत वेगवेगळ्या संस्थांमधील नृत्यांगनांनी भाग घेतला. नृत्याबरोबरच गायन-वादनाची मैफलही रसिकांना या वेळी अनुभवता आली.

## पेपरलेस ग्रंथालयाला सोशल मीडियाची जोड

ग्रंथालये आता पेपरलेस होत असून, वेब लायब्ररी व ऑनलाइन बुक्स यांचा प्रसार होत आहे. या पेपरलेस ग्रंथालयांना आता सोशल मीडियाचीही जोड मिळते आहे. हा बदल स्वीकारून अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे ग्रंथपालांना अनिवार्य आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील असोसिएशा ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे ग्रंथपाल डॉ. यदुवीर सिंग यांनी केले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या अभिजित कदम व्यवस्थापन व समाजकार्य कॉलेजमध्ये 'ग्रंथालय व माहितीशास्त्र' या विषयावर परिषद संपन्न झाली. डॉ. सिंग म्हणाले, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप या सोशल मीडियाचा वापर लोक ग्रंथ वाचनासाठी खूप चांगल्या प्रकारे करू लागले आहेत.

## 'देश का अपना चॅनेल'

देशातील सर्वांत मोठी वृत्तवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दूरदर्शनचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार सरकारने केला आहे.

ताज्या मजकुराबरोबरच मनोरंजनाचा खजिना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सादर केला जाईल. 'देश का अपना चॅनेल' या नव्या पंचलाईनसह या वाहिनीचे प्रमोशन केले जाणार आहे. कार्यक्रमांचे स्वरूप बदलण्याबरोबरच रंगसंगतीमध्येही आकर्षक फेरबदल घडवून आणण्यात आला आहे. त्यामुळे प्रेक्षकांना अधिक सुखद अनुभव येईल. खासगी वृत्तवाहिन्यांना टक्कर देण्यासाठी दूरदर्शनचे स्वरूप बदलण्यात आल्याचे बोलले जाते.

दूरदर्शनवरील प्राईमटाईममध्ये आठ नवे शो दाखविले जातील. नव्याने

जारी करण्यात आलेली मार्गदर्शक तत्त्वे स्पर्धात्मक वातावरणाला पोषक ठरणारी आहेत. कौटुंबिक मूल्ये, विश्वासार्हता, राष्ट्रउभारणीस प्राधान्य देण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

## मराठी कलाकारांचा 'जंपस्टार्ट'

संगीताला भाषेची मर्यादा नसते; कारण त्यातून व्यक्त होतात भावना... भाषा कोणतीही असली, तरी संगीत त्या भावना थेट खोलवर पोहचवतं... जगण्यातली आव्हानं, यशापयश, प्रेम, तिरस्कार, आनंद, दु:ख, कुणीतरी दुखावलं जाणं... प्रत्येकाला या कडू-गोड अनुभवांसह जगावं लागतं. ते करताना सर्वव्यापी शक्तीची साथ मिळत असते. असं जगणं 'जंपस्टार्ट : एनर्जी रिलोडेड' या इंग्रजी अल्बमच्या माध्यमातून पोहोचवण्यासाठी पुण्यातले शीतलचंद्र कुलकर्णी, धनंजय भोगले आणि अभिजित रानडे हे मराठी कलाकार सज्ज झाले आहेत.

या अल्बममधल्या गाण्यांची भाषा इंग्रजी असली तरी या गाण्यांना खास भारतीय संगीताचा स्पर्श आहे. 'राइज,' 'फास्ट ट्रेन टू नोव्हेअर,' 'डिसपेअर अनडन,' 'डोण्ट वॉक अवे,' 'ग्रोइंग अप,' 'द रिलक्टंट रिबेल,' 'अलाइव्ह अगेन,' 'अलोन,' 'टँटलायजर,' आणि 'जंपस्टार्ट' अशी दहा गाणी या त्रयीनं अल्बममध्ये दिली आहेत. अभिजित यांनी गाण्यांच्या लिखाणासह लीड व्होकल्स आणि बास केलं आहे. धनंजय यांनी ड्रम्स, पर्कशन्स,व्होकल्स तर शीतल यांनी गिटार, प्रोग्रॅमिंग आणि व्होकल्स केलं आहे.

## इन्स्टाग्रामवर कॅप्शन एडिट करता येणार

सोशल मीडियावर युजर्सच्या सोयीसाठी सातत्याने नव्या सुविधा दिल्या जात आहेत. 'इन्स्टाग्राम' या लोकप्रिय फोटो शेअरिंग ॲपवर छायाचित्राखालील ओळ (कॅप्शन) बदलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. इन्स्टाग्राम २०१० मध्ये लाँच झाल्यापासून छायाचित्राखालील मजकूर प्रकाशित झाल्यावर त्यात बदल करता येत नव्हता. मात्र, आता या नव्या टूलमुळे ही समस्या दूर झाली आहे. आयओएस आणि अँड्रॉईडसाठी हे टूल वापरता येईल.

छायाचित्र प्रकाशित झाल्यानंतरही त्याखालील ओळ दुरुस्त करता

येईल. खाली असलेल्या एडिट बटनावर टॅप करून युजर्सला कॅप्शनमध्ये बदल करता येईल. मात्र, इतर युजर्सच्या छायाचित्रात आणि प्रोफाईलमध्ये बदल करता येणार नाही. इन्टाग्रामने या सुविधेबरोबर डिझाईनमध्येही बदल केले आहेत. एक्सप्लोरर पेजवरील 'फोटोज' आणि 'पीपल' टॅबद्वारे नवीन अकाउंटचा शोध सोपा होईल, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. दिवसभरात एकूण युजर्सपैकी ४० टक्के युजर्स या पेजला भेट देतात. फेसबुकने २०१२ मध्ये इन्स्टाग्रामची एक अब्ज डॉलरला खरेदी केली. सध्या इन्स्टाग्रामचे २० कोटींहून अधिक युजर्स आहेत.

## निर्माते, कलाकारांसाठी कार्यशाळा

मराठी सिनेमाला चांगले दिवस आलेले असूनही चांगल्या कलाकृती प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नाहीत. निर्मात्यांची अडवणूक होते, त्यांना मार्गदर्शन मिळत नाही. या समस्या सोडविण्यासाठी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळातर्फे लवकरच निर्माते, कलाकार आणि तंत्रज्ञांच्या कार्यशाळा घेतल्या जातील, अशी माहिती महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष अभिनेते विजय पाटकर यांनी दिली. निवृत्त ज्येष्ठ कलाकारांना काही रक्कम मानधन स्वरूपात दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

'सलाम पुणे'चे अध्यक्ष शरद लोणकर, दिग्दर्शक शिव कदम, संजीव नाईक तसेच निर्माता-दिग्दर्शक आदी या वेळी उपस्थित होते. 'अध्यक्ष म्हणून माझ्या हातात वर्षाचा कालावधी आहे. आश्वासनांची खैरात करण्याऐवजी जे शक्य आहे ते सगळे करण्याचा माझा प्रयत्न राहील. मराठी कलाकार, निर्माते-दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांची सांगड घालणे आवश्यक आहे. त्यासह नवनिर्मात्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा घेण्याचा विचार आहे असे पाटकर म्हणाले.

## 'गुंजारव' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

कवयित्री नीना फळणीकर यांच्या 'गुंजारव' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच डॉ. वीणा देव यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, सुमनताई किर्लोस्कर,संगीतकार रवी दाते, गायिका पद्मजा फेणाणी, आदी या वेळी उपस्थित होते.

संवेदनशील मनाचे आणि उत्कट रसिकतेचे क्षण सजवून यातल्या

कविता जन्माला आल्या आहेत, असे मत देव यांनी या वेळी व्यक्त केले. मनातील विषयांचे सोने करण्याची किमया या कवितांनी साधल्याचे कारेकर यांनी सांगितले. अरुण नूलकर यांनी निवेदन केले.

## 'खरा तो प्रेमा'ची प्रचिती

'आज मज सहज आला उल्हास', 'खरा तो प्रेमा', 'अंगणी पारिजात फुलला', 'करीन यदमुनी सदना', 'परब्रह्म निष्काम तो हा' यासारख्या एकाहून एक मधुर आणि अजरामर नाट्यपदांनी गायक अतुल खांडेकर आणि भक्ती खांडेकर यांना दाद मिळाली.

ज्येष्ठ गायिका- अभिनेत्री जयमाला शिलेदार यांचे छायाचित्र अतुल खांडेकर यांच्यातर्फे भारत गायन समाजास प्रदान करण्यात आले. सुहास दातार यांच्या हस्ते या छायाचित्राचे अनावरण झाले.

'माझी आई ही एक आनंदयात्री होती. तिने आयुष्यभर संगीताच्या आणि नाटकाच्या क्षेत्रात जे काही केले ते फक्त आणि फक्त आनंदाची देवाण-घेवाण करण्यासाठी केले. तिचे शिष्य घडविण्याचे कार्य हे विशेष उल्लेखनीय आहे. भारत गायन समाज ही देवगंधर्व भास्करबुवा बखले यांची वास्तू सर्व कलाकारांना तीर्थक्षेत्रासारखी आहे. या ठिकाणी आईचे छायाचित्र अर्पण करताना अतिशय आनंद होत आहे,' अशी भावना कीर्ती शिलेदार यांनी या वेळी व्यक्त केली. जयमालाबाईंची संगीतरचना असलेल्या 'अंबरी जोवरी शशी रवी' या भैरवीने त्यांनी कार्यक्रमाची सांगता केली. वर्षा जोगळेकर यांच्या निवेदनातून जयमालाबाईंची कारकीर्द उलगडली. संजय गोगटे (हार्मोनिअम), विद्यानंद देशपांडे (तबला) आणि नंदकुमार भांडवलकर (पखवाज) यांनी समर्पक साथसंगत केली.

## 'अथर्व' तर्फे 'शोभायात्रा' रंगमंचावर

'अथर्व थिएटर्स' तर्फे रंगभूमी दिनानिमित्त सगळ्या कलाकारांचा मेळावा भरवण्यात आला होता. या वेळी संस्थेतर्फे सादर होणाऱ्या नवीन नाटकाचा मुहूर्तही करण्यात आला.

प्रसिद्ध लेखक शफाअत खान यांचे 'शोभायात्रा' हे नाटक 'अथर्व'च्या वतीने पुन्हा रंगभूमीवर येणार आहे. त्याचे दिग्दर्शन डॉ. संजीवकुमार पाटील करणार आहेत. या नाटकाचा प्रयोग जानेवारी २०१५ मध्ये 'पिंपरी चिंचवड

डॉक्टर्स असोसिएशन'च्या स्नेहसंमेलनात सादर होणार आहे. नाटकाच्या नेपथ्याची आणि रंगभूमीची जबाबदारी कमलेश बिचे सांभाळतील.

## 'भांडारकर'ला विशेष दर्जा

प्राच्यविद्येच्या क्षेत्रात प्रतिष्ठि असलेल्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला 'राष्ट्रीय महत्त्वाची संस्था' (इन्स्टिटट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स) हा दर्जा प्राप्त करण्याबाबत प्रयत्न सुरू आहेत. २०१५-१६ हे संस्थेचे शताब्दी वर्ष असल्याने या वर्षात सरकारकडून या बाबतची घोषणा व्हावी, यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे.

केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी 'फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटट्यूट ऑफ इंडिया' (एफटीआयआय) संस्थेला हा दर्जा अलीकडेच जाहीर केला. त्यापासून प्रेरणा घेऊन भांडारकर इन्स्टिटट्यूटही हा दर्जा संपादन करण्यासाठी पुढे सरसावली आहे. 'भांडारकर'च्या शिष्टमंडळाने 'एफटीआयआय'चे संचालक डी. जे. नारायण यांची भेट घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली.

गेल्या ९७ वर्षातील संस्थेचे कार्य, संस्थेकडे असलेला अनमोल ठेवा, संस्थेची मालमत्ता आणि संस्थेच्या भावी योजना या सर्व गोष्टींचे दस्तावेजीकरण (डॉक्युमेंटेशन) करून ते केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार आहे.

'संस्थेच्या संग्रही मोठ्या प्रमाणात पुरातन हस्तलिखिते आहेत. राष्ट्रीय महत्त्वाची संस्था हा दर्जा मिळाल्यानंतर पाली, जैन आणि बौद्ध तत्त्वज्ञानासंदर्भातील आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम संस्थेमध्ये सुरू करता येतील. तसेच आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करणारे संग्रहालय उभारण्याची प्रक्रिया सुलभ होऊ शकेल. यांसाठी परदेशातील संग्रहालयांकडून मार्गदर्शन घेतले जात आहे.

## डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचे साहित्य संकेतस्थळावर

थोर विचारवंत, समाजशिक्षक आणि ग्रंथकार डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे यांची ग्रंथसंपदा गेल्या काही वर्षापासून उपलब्ध नव्हती. ही उणीव दूर करण्यासाठी या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. डॉ. सहस्त्रबुद्धे यांचे १९ ग्रंथ आणि असंग्रहीत लेख असे सुमारे तीन हजार पानांचे

विचारधन संकेतस्थळावर असून यात खंड १ 'व्यक्तिदर्शन', खंड २ 'साहित्यविवेचन' असे विभाग आहेत. डॉ. के.ना. वाटवे, प्रा. गं.म. साठं, प्रा. बाळ गाडगीळ, डॉ. म. अ. करंदीकर, दत्तप्रसन्न काटदरे, दत्तप्रसन्न काटदरे, डॉ. सरोजिनी बाबर, प्रा. विद्याधर पुंडलीक, प्रा. डॉ. सरोजिनी वैद्य, व. दि. कुलकर्णी आणि अन्य अनेक मान्यवरांनी लेखन केले आहे. 'माझे चिंतन', 'पराधीन सरस्वती', 'राजविद्या', 'वैयक्तिक आणि सामाजिक', 'सौंदर्यरस' हे त्यांनी लिहिलेले निबंधसंग्रह आहेत. तर त्यांचे 'भारतीय लोकसत्ता', महाराष्ट्र संस्कृती', 'विज्ञानप्रणित समाजरचना', 'लोकसत्तेला दंडसत्तेचे आवाहन', 'स्वभावलेखन', 'भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म, 'हिंदूसमाज-संघटना आणि विघटना', 'इहवादी शासन', 'केसरीची त्रिमूर्ती', 'साहित्यातील जीवनभाष्य' हे प्रबंधही येथे वाचायला मिळतात.

शिक्षक, प्राध्यापक, मराठीतील पहिले 'पीएचडी', निबंधकार, वक्ते अशी ओळख असलेल्या डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी आयुष्यभर केवळ विद्यार्थ्यांना नव्हे तर संपूर्ण समाजाला इतिहास, धर्मकारण, राजकारण, समाजकारण, अर्थसत्ता आदींबाबत विचारधन मुक्तहस्ताने वाटले. आजच्या तरुण पिढीला त्यांनी केलेल्या कामाची ओळख व्हावी' या उद्देशाने डॉ. सहस्त्रबुद्धे यांचे पुतणे सुहास सहस्त्रबुद्धे यांनी 'डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे विचारमंच' https://sites.google.com/site/drpgsahsrabudhevicharmanch या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे.

## व्हॉट्सअ‍ॅप आता शंभरचा ग्रुप

स्मार्टफोन युजर व्हॉट्सअ‍ॅप वापरण्यास अधिक पसंती देत असल्याने ग्रूप चॅटला चांगले दिवस आले आहेत. व्हॉट्सअ‍ॅपने नव्या अपडेटनुसार ग्रुपसाठीची कमाल मर्यादा वाढवली आहे. आतापर्यंत केवळ ५० जणांना ग्रुपमध्ये सहभाग घेता येत होता. आता तब्बल १०० जणांना ग्रुपमध्ये घेता येणे शक्य होणार आहे.

भारतात ७ कोटी नागरिक व्हॉट्सअ‍ॅप वापरतात. जगभरात ५० कोटी लोक व्हॉट्सअ‍ॅपवर आहेत. व्हॉट्सअ‍ॅपने नुकतेच वैयक्तिक आणि ग्रुपच्या वापरासाठी निळ्या मार्कचे फीचर लॉंच केले आहे. पाठवलेला मेसेज समोरच्या व्यक्तीने पाहिल्यानंतर निळा मार्क दिसू शकतो.

## ‘राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य’ अनुवादित ग्रंथाचे प्रकाशन

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक शैक्षणिक, कृषिक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बहुजनांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याचा इतिहास जाणून घेऊन जर्मनीमधील वाचकही प्रभावित होतील. जर्मनीमधील सर्व विद्यापीठांत हा ग्रंथ पोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीचे कौन्सिल जनरल मायकल सीबर्ट यांनी डॉ. जयसिंगराव पवारलिखित ‘राजर्षी शाहू छत्रपती : जीवन कार्य’ या जर्मन अनुवादित चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करताना केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार होते.

सीबर्ट म्हणाले, ‘‘शाहूंचे सामाजिक चळवळीतील कार्य आत्मसात केले पाहिजे. शाहूंच्या कार्याची जगभर ख्याती आहे. ब्रिटिश राजवटीतही त्यांनी सर्वसामान्य आणि बहुजनांच्या उद्धारासाठी लढा दिला. त्यांची जडणघडण जर्मन वाचकांपर्यंत पोचणार आहे. त्यांच्या या कार्यातून प्रेरणा घेतली पाहिजे. जर्मन चरित्र ग्रंथाचा पहिला वाचक होण्याचा मान मला मिळाला आहे.’’

## ‘धर्मशास्त्राचा इतिहास’ प्रकाशित होणार

महामहोपाध्याय पां. वा काणे यांनी लिहिलेला आणि भांडारकर प्राच्यविद्या संस्थेने प्रकाशित केलेला ‘धर्मशास्त्राचा इतिहास’ हा ग्रंथ सोप्या भाषेत उपलब्ध करून दिला जाणार आहे. काणे यांनी केलेल्या मूलभूत संशोधन कार्यासाठी त्यांना ‘भारतरत्न’ देऊन सन्मानित करण्यात आले होते. मूळ ग्रंथ इंग्रजी भाषेत आहे. त्यामुळे या ग्रंथातील ज्ञान सर्वसामान्यांना मिळण्यासाठी हा ग्रंथ मराठीत आणि सोप्या भाषेत उपलब्ध करून देण्याचे संस्थेने ठरविले आहे.

## थिंक महाराष्ट्र सोलापूर जिल्हा संस्कृतिवेध

(थिंक महाराष्ट्र डॉट, कॉम, ग्रंथाली, लोकसेवा ट्रस्ट आणि ‘मास कम्युनिकेशन डिपार्टमेन्ट, सोलापूर विद्यापीठ’ यांचा संयुक्त उपक्रम)

महाराष्ट्राचा इतिहास व संस्कृती यांचे जतन-संवर्धन करण्याच्या हेतूने ‘थिंक महाराष्ट्र डॉट कॉम’ हे वेबपोर्टल चार वर्षांपूर्वी सुरू झाले. महाराष्ट्रभरातील कर्तृत्ववान, सेवाभावी व्यक्तींची आणि सांस्कृतिक माहिती पोर्टलवरून दिली जाते. ही माहिती जिल्हावार जमा करावी व त्यासोबत

जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये जनजागरणाचे कार्यक्रम विविध माध्यमांमधून घडवावे अशी मोहीम हाती घेण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यांत १० डिसेंबर ते २१ डिसेंबर २०१४ या दरम्यान होणाऱ्या या उपक्रमास 'जैन इरिगेशन सिस्टिम्स'चे आर्थिक सहकार्य लाभले आहे.

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या आद्य दैवताचे, विठ्ठलाचे स्थान आहे, तसेच सोलापूर जिल्हा हा 'मिनी महाराष्ट्र' आहे. मुदलात महाराष्ट्र हा स्थलांतराने घडलेला देश आहे हे आपण जाणतो. त्यातील सोलापूरचे वर्णन 'सघन स्थलांतरा'चा प्रदेश असे करता येईल, तेथे कन्नड, तेलगू आणि मराठी या तिन्ही भाषा-संस्कृतींचे विलोभनीय दर्शन होते. गुजराती, मारवाडी, शीख भारतभर - जगभरदेखील सर्वत्र पसरले तसे सोलापुरी येऊनदेखील स्थिरावले. सोलापूरला दोन हजार वर्षांपासूनचा इतिहास आहे. सोलापूर-पैठण मार्गे भारताच्या पश्चिम किनाऱ्याला पोचून युरोपपर्यंत महाराष्ट्र - कर्नाटकाने व्यापार केल्याची नोंद पुरातन काळापासूनची आहे.

या नोंदी ढोबळ झाल्या. आजच्या सूक्ष्मतेच्या जगात आपल्याला सोलापूर जिल्ह्यात गावागावात काय घडले-काय टिपले-आज कोणत्या खुणा सापडतात-इतिहासाची थोरवी काय आणि वर्तमानातील श्रेष्ठता कोणती वगैरे माहिती जमा करायची आहे. त्यासाठी 'संस्कृतिवेध'चे हे आवाहन आहे. कारण अशा तऱ्हेचे माहितीचे संकलन केवळ सामूहिक प्रयत्नांमधून होऊ शकेल. सुशिक्षित-सुसंस्कृत लोक जागे झाले, त्यांनी त्यांचा परिसर या दृष्टीने तपासून पाहिला व ते संकलित माहितीच्या नोंदी केल्या तर त्यामधून सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासाचा व संस्कृतीचा पट आपल्यापुढे उलगडला जाऊ शकतो. जिल्ह्याजिल्ह्यांतून अशा मोहिमा झाल्या तर अवघ्या महाराष्ट्राचा चांद्यापासून बांद्यापर्यंतचा आणि जळगावपासून सोलापूरपर्यंतचा संस्कृतिसंपन्न इतिहास सर्व तपशिलांनिशी उभा करणे शक्य होईल. मात्र, प्रत्येक सुशिक्षिताचे, प्रत्येक विचारी व संवेदनशील माणसाचे सहकार्य मिळाले पाहिजे. इंटरनेट माध्यमाची गंमतच ही आहे, की सायबर स्पेसची संग्रहाची क्षमता अमर्याद आहे आणि तेथे अक्षरश: व्यक्तीव्यक्तीचे वैशिष्ट्ये नोंदले जाऊ शकते आणि त्या माहितीस ॲक्सेस घरबसल्या सहजसोपा आहे.

माहिती संकलनाच्या या मोहिमेचा दुसरा पदर आहे तो जनजागरणाचा. शाळा, कॉलेजेस, ग्रंथालये येथे तज्ज्ञांची आधुनिक विद्याशाखांमधील

व्याख्याने, स्लाईड शो, चित्रपट प्रदर्शन असे अनेकविध कार्यक्रम योजून लोकांना आधुनिक ज्ञानाची, त्यामध्ये निर्माण झालेल्या विविध विषय-शाखांची - त्यातील शक्यतांची जाणीव करून देणे हा या मोहिमेचा दुसरा मुख्य हेतू आहे. भारतातील तरुण वर्ग हा लोकसंख्यादृष्ट्या गर्वाचा विषय मानला जातो. परंतु या तरुण वर्गाचे देशाच्या संपत्तीत रूपांतर व्हायचे असेल तर आजच्या 'नॉलेज प्रभावित' जगामध्ये आपले तरुण बौद्धिकदृष्ट्या सक्षम असले पाहिजेत. त्यासंबंधी जाणीव निर्माण करणे हाही या मोहिमेचा हेतू आहे.

'संस्कृतिवेध'च्या दोन आठवड्यांच्या काळात विषयतज्ज्ञ शाळा-कॉलेज-ग्रंथालये येथे पूर्वनियोजित पद्धतीने व्याख्याने देतील/कार्यक्रम सादर करतील.

त्यांच्या सोबतीने 'सोलापूर विद्यापीठा'चे पत्रकारितेचे तरुण विद्यार्थी 'थिंक महाराष्ट्र'च्या माहितीसंकलनासाठी आमच्यासोबत गावोगाव फिरतील. त्यातून गावागावातील कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था, प्रथा-परंपरा, स्थानिक कलाकार, ग्रामदेवता, इतिहास आणि संस्कृतीच्या खुणा अशी विविधांगी माहिती नोंदवली जाईल.

याखेरीज प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक संस्कृती शिबिर होईल. त्या शिबिरामध्ये तालुक्यातील साहित्यिक, कलावंत, विचारवंत, छांदिष्ट असे तऱ्हतऱ्हेचे लोक एकत्र येऊन संस्कृतीसंबंधातील चर्चा करतील; आपापल्या क्षेत्रातील प्रश्नांचा, अडचणींचा ऊहापोह करतील. शिबिरास संस्कृती क्षेत्रातील नाणावलेला सूत्रसंचालक असेल.

या तिन्ही उपक्रमांत स्थानिक सहकार्य महत्त्वाचे आहे; किंबहुना, त्याविना हा एकूणच प्रयत्न फोल ठरेल. त्यामुळे स्थानिक मंडळीपैकी ज्यांना हे उपक्रम महत्त्वाचे वाटतात त्यांनी सत्वर धनश्री लुंगसे (मोबाईल ९७०२१७६२८१) यांच्याशी संपर्क साधावा.

दिनकर गांगल, व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन, २२ मनुबर मेन्शन, १९३ आंबेडकर रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४ फोन - ०२२ - २४१८३७१०

## 'हिंदू स्त्रियांचे सामाजिक स्थान'चे प्रकाशन

'कोणत्याही सामाजिक प्रश्नाची इतिहासाचा मागोवा घेत उकल

करताना त्या-त्या घटनेची कालमानपरिस्थिती विचारात घेणे गरजेचे आहे', असे मत डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ.गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

श्रीनिवास कुलकर्णी यांनी लिहिलेल्या व डॉ. गणेश कोल्हटकर यांनी अनुवादित केलेल्या 'हिंदू स्त्रियांचे सामाजिक स्थान' या पुस्तकाचे देगलूरकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉ. न.म. जोशी, इंदुमती जोंधळे, प्रकाशक अनिल कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

"संस्कृती सतत वाहत असते. भारतीय संस्कृती जगातील प्राचीन संस्कृतींमधील एक असूनही ती टिकून राहिली. समाजात प्रतिगामी व पुरोगामी असे दोन गट असतात असे म्हटले जाते. परंतु कालचे पुरोगामी आज प्रतिगामी ठरू शकतात, कारण माणूस शिक्षणाने आणि चालीरीतींनी कायम पुढेच जात असतो. मध्ययुगात स्त्रियांची कुचंबणा झाली हे खरे आहे, पण आक्रमकांमुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली याचाही विचार करायला हवा. आज पुरोगामी म्हणवणाऱ्या देशात आणि राज्यात स्त्रियांनाही मिळणारी वागणूक दारूण असल्याचे दिसते." असे ते म्हणाले.

## फुलपाखरेही मोबाइलमध्ये!

वन्यजीव छायाचित्रकार युवराज गुर्जर यांनी 'आय लव्ह बटरफ्लाय' या ॲपद्वारे मोबाइलवर १५३ प्रकारच्या फुलपाखरांची सचित्र माहिती उपलब्ध करून दिली आहे. अवघ्या १५ दिवसांत सहाशेहून अधिक लोकांनी हे ॲप्लिकेशन डाऊनलोड केले असून लवकरच दुसऱ्या भागात महाराष्ट्रात आढळणाऱ्या आणखी २५० जातींच्या फुलपाखरांची सचित्र माहितीही दिली जाईल, हल्ली शहरातील अनेक जण हौसेने निसर्ग निरीक्षणासाठी जातात. तेथील वनस्पती, पशू-पक्ष्यांचे निरीक्षण करतात. मात्र प्रत्येक समूहासोबत तज्ज्ञ व्यक्ती असतेच असे नाही. त्यामुळे आपल्याला दिसलेल्या पक्ष्याचे अथवा फुलपाखराचे नाव काय, ते कोणत्या जातीचे हे त्यांना समजत नाही. हे ॲप विकसित करण्यासाठी मुंबईतील एक्झोनंट या सॉफ्टवेअर कंपनीने मदत केली. नियमित निसर्गनिरीक्षण करणाऱ्यांना हे ॲप उपयोगी आहेच, शिवाय हौशी तसेच नवख्यांसाठीही मार्गदर्शक म्हणून त्याची मदत होऊ शकेल. त्यासाठी सात रंगांचे पर्याय ॲपमध्ये देण्यात आले आहेत. विशिष्ट रंगाचे फुलपाखरू दिसल्यास रंगाचा पर्याय निवडून निसर्गप्रेमींना आपण

पाहिलेल्या फुलपाखराचे नाव तसेच जात, माहिती करून घेणे सोपे होईल. गुगल प्ले स्टोअरमध्ये ‘आय लव्ह बटरफ्लाय’ या नावाने हे ॲप्लिकेशन उपलब्ध असून ते विनामूल्य डाऊनलोड करता येते.

## ‘गर्म हवा’चे पुन:प्रदर्शन

भारताची फाळणी आणि त्यामुळे झालेली मानसिक घुसळण टिपणाऱ्या ‘गर्म हवा’ (१९७३) या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या कलाकृतीचे पुनरुज्जीवन झाले असून ती पुन्हा प्रदर्शित होत आहे. ऑडीओ आणि व्हिडीओ दोन्ही पातळ्यांवरील हे रिस्टोरेशन ‘इंडिकिनो एज्युटेन्मेंट’ आणि पीव्हीआरतर्फे होत आहे. रिस्टोरेरेशनसाठी साधारणत: सहा ते आठ महिने लागतात. या सिनेमावर मात्र दोन वर्षे काम चालल्याचे ‘इंडिकिनो’चे संचालक आर. डी. देशपांडे यांनी सांगितले.

ज्येष्ठ अभिनेते बलराज साहनी, दीनानाथ झुत्शी यांच्या अभिनयाने आणि एम. एस.सत्थू यांच्या  दिग्दर्शनातून एका उंचीवर पोहोचलेल्या ‘गर्म हवा’ या सिनेमास अनेक पुरस्कार मिळाले होते. ऑस्करसाठी तो गेला होता. या सिनेमात तब्बल १ लाख ९२हजार फ्रेम्स असून कोणतीही फ्रेम्स काढून न टाकता किंवा न जोडता प्रत्येकीवर बारकाईनं काम केलं आहे. व्हिडिओच्या तुलनेत ऑडिओ रिस्टोरेशन खूप क्लिष्ट असते. मूळ कलाकृतीला धक्का न लावता हे करणं एक आव्हान होते.

‘गर्म हवा’चे दिग्दर्शक एम. एस. सत्थू आज ८४ वर्षांचे आहेत. कामात अचूकता येण्यासाठी त्यांचा सल्ला वेळोवेळी घेतला गेला. या प्रोजेक्टमध्ये या सिनेमाच्या लेखिका शमा झैदी याही सहभागी आहेत.

## दहावीपर्यंत शाळांमध्ये मराठी सक्तीची करा

इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड अशा सर्व माध्यमांच्या राज्यातील शाळांमधून दहावी परीक्षेपर्यंत मराठी भाषा सक्तीची करण्याची शिफारस मराठी भाषाविषयक समितीने केली आहे. मराठीच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी मराठी भाषा विद्यापीठ स्थापना करण्याचीही या समितीने राज्य सरकारला  शिफारस केली आहे.

डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली या समितीने सादर केलेला अहवाल सरकारने प्रसिद्ध केला आहे. त्यावर हरकती-सूचना

मागविण्यात आल्या आहेत.

राज्यात सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये प्राथमिक ते शालान्त परीक्षेपर्यंत मराठी भाषा अनिवार्य करावी, सीबीएसई, सीनियर केंब्रिज आणि तत्सम शाळांमधूनही मराठी भाषा अनिवार्य करण्याचे धोरण टप्प्याटप्प्याने राबवावे, बहुसंख्य विद्यापीठांमध्ये 'मराठी भाषाभ्यास आणि भाषाविज्ञान' असा स्वतंत्र विभाग स्थापन करावा, मराठीच्या संवर्धन-विकासासाठी मराठी भाषा प्रयोगशाळा स्थापन करण्याचाही मुद्दा या धोरणाच्या मसुद्यात समावेश करण्यात आला आहे.

अन्य सर्व माध्यमांच्या अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनाही मराठी भाषा ही प्रथम किंवा द्वितीय भाषा म्हणून अनिवार्य करावी.

येत्या पाच वर्षांमध्ये उच्च शिक्षणातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विधी, औषधनिर्माण, वास्तुरचनाशास्त्र अशा सर्व विषयांचे शिक्षण मराठीतून देण्याची व्यवस्था करावी, इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना आपले विषय समजण्यासाठी इंग्रजीसह मराठीतूनही पुस्तके उपलब्ध करून द्यावीत, अमराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी भाषा अभिवृद्धी उपक्रम अनिवार्य करण्यात यावेत. प्रत्येक विद्यापीठात 'मराठी भाषाभ्यास आणि भाषाविज्ञान' असा स्वतंत्र विभाग स्थापना करावा, संस्कृत विद्यापीठाच्या धर्तीवर स्वतंत्र मराठी भाषा विद्यापीठ स्थापन केले जावे.

## दहा राष्ट्रीय संग्रहालयांचे डिजिटलायजेशन

देशातील दहा राष्ट्रीय संग्रहालयांतील माहिती आता एका 'क्लिक'वर उपलब्ध झाली आहे. पुण्यातील प्रगत संगणन विकास केंद्राने (सी- डॅक) या सांस्कृतिक ठेव्याचे संवर्धन करण्यासाठी जतनप्रणाली विकसित केली असून, त्याद्वारे संग्रहालयाचे डिजिटलायझेशन केले आहे.

त्यासाठी असलेली 'कॉमन डिजिटल रिपॉझिटरी' पर्यटक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. संकेतस्थळावर ही माहिती उपलब्ध असून, केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते नुकतेच त्याचे उद्‌घाटन झाले.

याविषयी 'सी-डॅक'च्या ह्युमन सेंटर्ड डिझाईन अँड कंप्युटिंगचे प्रमुख डॉ. दिनेश कात्रे म्हणाले, ''इतिहासकार, विद्वान, प्राच्यविद्या पंडितांनी मेहनत घेत केलेले संशोधन या संग्रहालयांमध्ये असून, त्यांचे

डिजिटलायझेशन झाले आहे. भौगोलिकदृष्ट्या देशातील संग्रहालयांमध्ये खूप अंतर आहे, त्यामुळे माहिती संकलन करणे कठीण जाते. माहिती सुरक्षित राहण्यासाठी 'व्हॅर्च्युअल' दालन उभारले आहे, त्यामुळे संग्रहालयातील माहिती सहजपणे उपलब्ध होणार आहे. ''संग्रहालयातील पुरातन व मौल्यवान वस्तूंचे 'जतन' करण्याचे काम सुरू आहे.

## अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या तारखेत बदल

बेळगावीमध्ये होणाऱ्या आगामी अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या तारखेत काही अपरिहार्य कारणामुळे बदल करण्यात आला आहे. हे नाट्य संमेलन ६,७ आणि ८ फेब्रुवारीला होणार असल्याचे अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या बेळगाव शाखेतर्फे कळविण्यात आले आहे. पूर्वनियोजनानुसार नाट्य संमेलन ३०, ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी होणार होते. संमेलनासाठी सी. पी. एड. मैदानाची निवड करण्यात आली असून, संमेलनापूर्वी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिवाय महाराष्ट्रातून २५० हून अधिक कलावंत नाट्य संमेलनात सहभागी होणार आहेत.

## 'आनंदी'त सांस्कृतिक कार्यक्रमांची धमाल

कोथरूडमधील महात्मा सोसायटीतील आनंदी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कला साधना संगीत मंचच्या कलाकारांनी गीत-नृत्याचा सांस्कृतिक कार्यक्रम नुकताच सादर केला. या वेळी फेस्कॉमचे अध्यक्ष अण्णा कोडोलीकर, अभिनेत्री अनुराधा राजहंस, ॲस्कॉपचे मधुकर पवार व माधुरी पवार उपस्थित होते. 'दिवाळी येणार' या गीतावर श्रावणी उरंगे, संस्कृती भेगडे या बालकलाकारांनी नृत्य सादर केले. विलास सुपेकर यांनी 'वासुदेवाची हाक' या गीतावर नृत्य केले. श्रद्धा वैद्य, राजेश्वरी वैद्य-जोशी, अनुराधा देशपांडे, मीनाक्षी थत्ते, निशा चिपळूणकर, देवयानी भोकरे, अमोली गोखले, मधुकर मोकाशी यांनी मराठीतील प्रसिद्ध गाणी सादर केली. अनुजा भावेने सादर केलेल्या 'हे शाम सुंदरा' या गीताने 'वन्स मोअर' मिळवला.

## गुंजन संगीत रजनीला रसिकांचा प्रतिसाद

'मेरे सपनों की रानी कब आएगी तू' या राजेश खन्नावर चित्रित झालेल्या सदाबहार गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्यानंतर किशोरकुमार, आशा भोसले, हेमंतकुमार, लता मंगेशकर यांसारख्या गायक कलाकारांच्या एकापेक्षा एक सरस गाण्यांत संध्याकाळ रंगून गेली.

सूरश्री निर्मित 'भंवरे की गुंजन' हा कार्यक्रम निवारा सभागृहात नुकताच पार पडला. जुन्या हिंदी चित्रपट गीतांचा हा कार्यक्रम गायक विठ्ठल प्रभू, सतीश पळणीटकर, गायिका वासंती अवचट आणि रमा काजरेकर यांनी खुलवत नेला.

'हकीकत' सिनेमातील मदन मोहन यांनी संगीतबद्ध केलेल्या आणि लता मंगेशकर यांनी गायलेल्या 'जरा सी आहट' या गाण्याने कार्यक्रमाची सुरेल सांगता झाली. मैफिलीस उल्हास कुलकर्णी (तबला), अभय इंगळे (रिदम) आणि सुभाष देशपांडे (की-बोर्ड) यांनी वाद्य साथ केली.

## प्रत्येक जिल्ह्यात 'ब्रेल लायब्ररी' सुरू होणार

दृष्टिहीन विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयात असताना वाचण्यासाठी ब्रेल लिपीतील साहित्य उपलब्ध होते. मात्र, त्यानंतर जास्त वाचण्याची गरज असताना त्यांना ब्रेल लिपीतील पुस्तके उपलब्ध होत नाहीत.

लोकांनी दृष्टिहीन व्यक्तींसाठी वेळ, कौशल्य, निधी या स्वरूपात मदत करावी आणि यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात काही ठिकाणी अंधशाळा आहेत, काही महाविद्यालयांमध्येही ब्रेल वाचनालये आहेत. त्यातही फारशी पुस्तके नाहीत. मात्र, या शिक्षणानंतर बाहेरच्या जगात वावरण्यासाठी, व्यक्तिमत्त्व सुधारण्यासाठी जास्त ज्ञानाची आवश्यकता असते. प्रत्यक्षात या टप्प्यात दृष्टिहीन व्यक्तींना वाचण्यासाठी ब्रेल पुस्तके उपलब्ध होत नाहीत. ही उणीव भरून काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'ब्रेल लायब्ररी' सुरू करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यात मराठीतील स्पर्शज्ञान पाक्षिक आणि सावित्री फाउंडेशन यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांना इतर संस्थांची मदत लाभणार आहे.

या लायब्ररींची सुरुवात प्रत्येकी पंचवीस पुस्तकांपासून होईल. त्यात मोठ्यांबरोबरच लहानांच्या पुस्तकांचाही समावेश असेल. ही पुस्तके पोस्टामार्फत ब्रेल पुस्तके विनामूल्य पाठवता येतात.

## अतुल पेठे यांचे सहावे नाटक

'भारत रंग' महोत्सवामध्ये अतुल पेठे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आषाढातील एक दिवस' या नाटकाचा अमृतमहोत्सवी प्रयोग दिल्ली येथे सादर होणार आहे. १९९९ मध्ये हा महोत्सव सुरू झाला. त्या वर्षी 'सूर्य पाहिलेला माणूस' नाटक महोत्सवात सादर झाले होते. त्यानंतर 'आनंद ओवरी', चौक, आणि मी माझ्याशी या नाटकांचे प्रयोग झाले होते. दोन वर्षांपूर्वी महापालिका सफाई कामगारांना घेऊन 'सत्यशोधक' या नाटकाचा प्रयोग केला होता. यंदा 'आषाढातील एक दिवस'चा प्रयोग होणार आहे.

## पुस्तिकेतून उलगडणार जमनालाल बजाज

स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती जमनालाल बजाज यांच्या १२५व्या जयंतीच्या निमित्ताने ४ नोव्हेंबर रोजी बजाज इलेक्ट्रिकल्सने जमनालालजींचा जीवनपट उलगडणारी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे.

बजाज इलेक्ट्रिकल्सचे अध्यक्ष शेखर बजाज म्हणाले,''जमनालाल बजाज यांचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील कार्य खूप मोठे असून, त्यांची तत्त्वे आणि मूल्ये अधिकाधिक लोकांपर्यंत पोचविण्याचे काम करत आहोत.'' बजाज यांनी वयाच्या सतराव्या वर्षी आपल्या वडिलोपार्जित संपत्तीतला आपला वाटा नाकारून ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला व तुरुंगवास पत्करला. ब्रिटिश साम्राज्याच्या खुणा असणाऱ्या 'रायबहाद्दूर' आणि अन्य पदव्यांचाही त्यांनी त्याग केला. महात्मा गांधींच्या दक्षिण आफ्रिकेतील उपक्रमाकडे आकर्षित झालेल्या बजाज यांनी गांधीजी भारतात परतल्यानंतर वर्धा येथे आश्रम स्थापण्याबद्दल त्यांचे मन वळविले. गांधीजींच्या राष्ट्रीय स्तरावरील सामाजिक कार्यासाठी बजाज यांनी सेवाग्राम येथील आपली जमीनही त्यांना देऊ केली. जमनालाल बजाज यांच्या भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील तसेच औद्योगिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल केंद्र सरकारने १९७० मध्ये त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे छायाचित्र असलेले टपाल तिकिट प्रसिद्ध केले.

## 'पूछो' ॲप बोलवणार रिक्षा!

टेक्नॉलॉजीच्या वापराने आपल्याला अनेक सुविधा अगदी सहज

उपलब्ध होतात. राजधानी दिल्लीमध्ये परिवहन विभागाने विकसित केलेल्या ‘पूछो’ या ॲपमुळे पर्यटक, स्थानिकांना रिक्षा शोधण्यास मदत होणार आहे. स्मार्टफोन युजर्सनी त्यांच्या फोनमध्ये हे ॲप डाऊनलोड केल्यानंतर प्रवाशाला इच्छितस्थळी बोलावता येते. रिक्षामध्ये लावलेल्या जीपीएस यंत्रणेचा यासाठी वापर केला आहे. या ॲपच्या आयकॉनला एकदा स्पर्श केल्यानंतर संबंधित परिसरातील रिक्षाचालकाशी तुमचा थेट संपर्क होईल. तुम्हाला हिंदी भाषा समजत नसली तरी एसएमएसमुळे काही मिनिटांत रिक्षा तुमच्यासमोर येईल.‘‘या ॲपमुळे आम्हाला प्रवाशांची वाट पाहावी लागणार नाही. आम्ही शहराच्या कोणत्याही भागात असलो, तरी प्रवासी सहज संपर्क करू शकतील. प्रवासी भाड्यावरून होणारे वादही यामुळे टळतील व इंधनबचतही होईल,’’ असे रिक्षाचालक राजेश शीना यांनी सांगितले. या ॲपमुळे किती भाडे झाले,याची माहितीही मिळते. या ॲपमधील काही त्रुटी दूर करण्याचे काम चालू आहे.

## स्ट्रोक्स : दि लँग्वेज ऑफ कलर्स

बालचमूंनी रेखाटलेल्या चित्रांच्या माध्यमातून टॉम ॲड जेरी, मिकी माऊस, पोपॉय, ऑगी अँड कॉक्रेचेस हे घराघरांमध्ये लोकप्रिय असलेले कार्टून कॅरेक्टर पुणेकरांच्या भेटीला आले आहेत.

‘स्ट्रोक्स : द लँग्वेज ऑफ कलर्स’ या संस्थेतर्फे बालगंधर्व कलादालनात भरवलेल्या विविध शैलीच्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन चित्रकार चारुहास पंडित व दीपक मानकर यांच्या हस्ते झाले. तीन ते बारा वर्षांपर्यंतच्या लहानग्यांच्या ५०० चित्रांचा समावेश यात आहे. ‘स्ट्रोक्स’ या ई-लर्निंग वेबसाइटचे उद्घाटन विश्वास महाजन यांच्या हस्ते झाले. पंडित यांनी चित्रकलेमध्ये स्वत:ची शैली निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रदर्शनामध्ये ‘स्टेन्ड ग्लास’, म्युरल्स’ ‘सिपोरेक्स’ अशा प्रकारांचा समावेश होता. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, मनमोहनसिंग, अमिताभ बच्चन आदी दिग्गजांची अर्कचित्रेही होती.

## मोबाईल इंटरनेटचा वापर करताना काळजी घेण्याची गरज

भारतीय बाजारातील स्मार्टफोनच्या वाढत्या वापरकर्त्यांसोबत इंटरनेटच्या वापराचेही प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे मोबाइलवरील

खर्चात विशेषत: बिलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढझाल्याचेही दिसून येत आहे. अलीकडेच मोबाइल इंटरनेट वापराच्या दरात वाढकरण्यात आली आहे.

मोबाइल इंटरनेटचा वापर आणि त्यावर होणारा खर्च ही सध्या प्रत्येकासाठी चिंतेची बाब बनत चालली आहे. भारतात मोबाइल इंटरनेटचा प्रसार करण्यासाठी कंपन्यांकडून सुरुवातीला अनेक आकर्षक ऑफर दिल्या जातात. मात्र, एकदा ऑफर्सचा कालावधी संपला की मग होणार इंटरनेट डाटावापराचा खर्च अनेकांना बुचकळ्यात पाडतो. आपण इंटरनेटचा फारसा वापर करत नसतानाही एवढा खर्च कसा होतो, असा प्रश्नही अनेकांना सतावतो. परंतु, आपल्या कळत वा नकळत अनेक ॲप्स आपल्या मोबाइल इंटरनेटच्या माध्यमातून डाटा वापरात असतात. फेसबुक, ट्विटर, यूट्युब या ॲप्लिकेशन्सकडून होणाऱ्या डाटाचा अमर्याद वापर याचेच उदाहरण आहे.

स्मार्ट फोनमुळे प्रत्येकाला मोबाइलवरूनच आपला ईमेल पाहता, पाठवता येतो. अँड्रॉइड फोनमध्ये जी मेल आयडी वापरावाच लागत असल्याने तेथे आपला जी मेल सदैव 'ॲक्टिव्ह' असतो. तर, बऱ्याचदा आपण आपल्या सोयीसाठी ईमेल किंवा कॅलेण्डर 'सिन्क' करून घेतो. 'सिन्क' किंवा एकसूत्रीकरणामुळे ईमेलचा वापर अधिक उपयुक्त ठरतो. मात्र त्याचा परिणाम डाटाचा वापर वाढण्यातही होतो. त्यामुळे आपल्या मोबाईल किंवा टॅब्लेटच्या सेटिंगमध्ये जाऊन 'ऑटो सिन्क' चा पर्याय बंद करून 'मॅन्युअल सिन्क' सुरू ठेवा. त्यामुळे तुम्हाला हवे तेव्हाच तुमचा 'ई मेल' सिन्क करता येईल. तुम्ही तुमच्या ई मेलच्या सेटिंगमध्येही बदल करू शकता. जेणेकरून मोबाइलवर तुम्हाला केवळ नव्या ईमेलच्या 'सब्जेक्ट' आणि पाठवणाऱ्याचीच माहिती दिसेल. त्यामुळे तो ईमेल तातडीने पाहायचा असेल तरच तो तुम्हाला ओपन करता येईल.

नको असल्यास 'मोबाईल डाटा' बंद ठेवा:

सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे इंटरनेटचा वापर २४ तास होत असतो. मात्र, या २४तासांतही काही तास असे असतात, जेव्हा तुम्हाला इंटरनेटची गरज नसते. विशेषत: गाडी चालवत असताना, एखाद्या मिटिंगमध्ये असताना, झोपताना तुम्ही तुमचा 'मोबाइल डाटा' बंद ठेवू शकता. अगदी १५ मिनिटांसाठी 'मोबाइल डाटा' बंद ठेवला तरी तुमची बरीच बचत होऊ शकते.

पडद्यामागचा ‘डाटावापर’कमी करा

तुम्ही इंटरनेटवर आधारित कोणतेही अ‍ॅप वापरत नसता, तेव्हाही तुमचा मोबाइल डाटा खात असतो. याचे कारण तुमच्या अपरोक्ष अनेक अ‍ॅप्लिकेशन्स बंद असतानाही मोबाइल डाटाचा वापर करत असतात. तुमच्याकडे अँड्रॉइडची आइस्क्रीम, सँडविच किंवा त्यापेक्षा वरची आवृत्ती असेल तर कोणते अ‍ॅप्लिकेशन अधिक डाटा वापरते, हे तुम्हाला सहज कळू शकते. त्यानुसार तुम्हाला संबंधित अ‍ॅपवरील ‘बॅकग्राउंड डाटा’चा वापर रोखता येईल.

डाटा वापरावर लक्ष ठेवा

मोबाइल इंटरनेटच्या वापरावर नियंत्रण ठेवणारे अनेक अ‍ॅप्स सध्या प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत. शिवाय अँड्रॉइडच्या फोनमध्येही तशी सुविधा पुरवण्यात आली आहे. याचा वापर करून तुम्ही तुमच्या अपेक्षेप्रमाणे डाटा वापराची मर्यादा निश्चित करू शकता. ही मर्यादा वापरलेला डाटा किंवा त्याची किंमत या दोन्ही प्रकारांनी निश्चित करता येते. ‘डाटा वापरा’वर नियंत्रण ठेवणारे अनेक अ‍ॅप्स तुम्हाला वेळोवेळी ‘डाटाखाऊ’ अ‍ॅप्लिकेशन्सबद्दल सतर्कही करत असतात. शिवाय तुम्ही ठरवलेल्या मर्यादेच्या ८० टक्क्यांपर्यंतचा वापर झाला की तुम्हाला इशारा दिला जातो. याचा खूप फायदा होतो.

## अनोखी पर्यटनाभिमुख अ‍ॅप्स

प्रवासाला जाताना नित्याच्या सर्वच गोष्टी सोबत घेतल्या की नाही याची खात्री आपण वारंवार करत असतो. पण प्रवासात आपल्याला उपयोगी पडणाऱ्या अ‍ॅप्सबाबतही जर आपण काळजी घेतली तर आपल्याला आयत्या वेळी अडचणींवर आपण मात करू शकतो.

काळाची गरज ओळखून केंद्र पर्यटन विभागाने नुकतेच एक मोबाइल अ‍ॅप लाँच केले आहे. या अ‍ॅपमध्ये देशातील विविध शहरांची माहिती देण्यात आली असून तेथे सहलीचे नियोजन करण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. या अ‍ॅपमधील आपण आपल्याला आवडते ठिकाण आणि तेथे जाण्याचा कालावधी निवडल्यानंतर त्या कालावधीत तेथील हवामान, आपण निवडलेला कालावधी तेथे जाण्यास योग्य आहे की नाही आदी माहिती देण्यात येते. याशिवाय तेथे आपल्याला पाहण्यासारखे काय आहे, तेथे

आपण किती दिवस राहू शकतो आदी माहितीही देण्यात आली आहे.

**हॉलिडे आयक्यू** : विविध पर्यटन ठिकाणांची माहिती पुरविणारे विश्वासार्ह संकेतस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हॉलिडे आयक्यूने आपले ॲपही सुरू केले आहे. या ॲपमध्ये आपल्या देशातील दोन हजारांहून अधिक पर्यटनस्थळांची माहिती उपलब्ध आहे. तसेच ५० हजारांहून जास्त हॉटेल्स, रिसॉर्ट्स, घरगुती राहण्याची सोय, जंगल कॅम्प्स आदींची माहिती यामध्ये दिली आहे. ही सर्व ठिकाणे शोधण्यासाठी चांगल्या दर्जाचे सर्च पर्यायही देण्यात आले आहेत. हे सर्चेस हॉटेलचे दर, आधी राहून आलेल्यांनी दिलेला दर्जा यांनुसार उपलब्ध आहेत. याशिवाय यामध्ये एक प्रवासी दुसऱ्या प्रवाशाला विविध ठिकाणेही सुचवू शकतो. हे ॲप आपल्याला स्थानिक ट्रॅव्हल एजंटशी किंवा थेट हॉटेल्सशी संपर्क साधण्याचा पर्यायही उपलब्ध करून देते.

**आयआरसीटीसी कनेक्ट** : हे भारतीय रेल्वेचे अधिकृत ॲप असून यामध्ये आपल्याला एका गाडीच्या आरक्षणाची उपलब्धता तसेच एकाच वेळी अनेक गाड्यांची उपलब्धता पाहता येऊ शकते. आपण या ॲपमधून एकदा आरक्षण केले की आरक्षणात नमूद करण्यात आलेली नावे आणि त्यांचे वय ॲपमध्ये सेव्ह राहते. यामुळे भविष्यात आपण जेव्हा पुन्हा आरक्षण करतो त्या वेळेस आपल्याला पूर्वीची नावे प्रवासी यादी या पर्यायातून घेता येतात. याशिवाय या ॲपच्या माध्यमातून आपण आयआरसीटीसीचे तीन लॉगइन तयार करू शकतो. आपण एकदा तिकीट खरेदी केल्यावर आपल्या प्रवासाच्या आधी आपल्याला अलर्ट्सही या ॲपच्या माध्यमातून मिळतात.

**एनटीईएस** : तुम्ही प्रवास करत असलेली गाडी कुठल्या स्थानकापर्यंत पोहोचली आहे, किती मिनिटे उशिरा धावत आहे आदी माहितीसाठी सेंट्रल रेल्वेची माहिती प्रणालीतर्फे एनटीईएस ॲप बाजारात आणले आहे. या ॲपमध्ये ट्रेन सध्या कुठे आहे, लाइव्ह स्टेशन, गाड्यांचे वेळापत्रक, दोन स्थानकांदरम्यानच्या गाड्या, वेळा बदललेल्या गाड्या, मार्ग बदललेल्या गाड्या आदी पर्याय उपलब्ध आहेत. लाइव्ह स्टेशन या पर्यायामध्ये आपण निवडलेल्या स्थानकावर सध्या कोणत्या व किती गाड्या उपलब्ध आहेत याची माहिती उपलब्ध आहे.

# राष्ट्रीय पुस्तक सप्ताह

नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाने केलेल्या आवाहनानुसार मेहता पब्लिशिंग हाउसतर्फे पुणे येथे राष्ट्रीय पुस्तक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. वाचकांना आपल्या आवडत्या लेखकांशी थेट संपर्क साधता यावा तसेच साहित्यविश्वातील नव्या जुन्या प्रवाहांबाबत चर्चा व्हावी या दृष्टीने सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दि. १४ नोव्हेंबर रोजी पुस्तक सप्ताहाचा शुभारंभ हुजुरपागा विद्यालयात करण्यात आला. यावेळी पूर्वी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमास मंजूषा आमडेकर, हुजूरपागा शाळेच्या मुख्याध्यापिका अलका काकतकर आदी उपस्थित होत्या. यावेळी मेहता पब्लिशिंग हाउसच्यावतीने शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तकांची भेट देण्यात आली.

सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी लेखिका आणि पत्रकार सुधा मेनन यांच्याशी संवाद आयोजित केला होता. मेनन यांनी यावेळी लेखनविषयक छोटीशी कार्यशाळाही घेतली व मेहता पब्लिशिंग हाउसच्या उपक्रमाचे कौतुक केले. भविष्यात विस्तृत स्वरुपात अशी कार्यशाळा आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दि. १६ रोजी पॉला कॉन्स्टंट यांच्या सहारा आणि स्लो जर्नी साउथ या पुस्तकांच्या सार्क आवृत्तीचा प्रकाशन सोहळा गोबीचे वाळवंट सर करणाऱ्या प्रथम महिला सुचेता कडेटाणकर आणि गिर्यारोहक रुपेश खोपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

चौथ्या दिवशी अतुल कहाते लिखित वॉरन बफे या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला. या प्रसंगी गुंतवणूक मार्गदर्शक उल्हास जोशी, आर्थिक सल्लागार प्रा. अनिल परांजपे, पत्रकार मुकुंद लेले आदी उपस्थित होते. पाचव्या दिवशी इट स्प्रे लव आणि मी एरिक या दोन पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी वीणा देव, प्राणीमित्र सुयोग बनकर, तन्वी कुलकर्णी, अनुवादिका स्नेहल जोशी उपस्थित होत्या. बुधवार, दि. १९ रोजी अनुवादीत साहित्य या विषयावरील परिसंवादात प्रज्ञा ओक, अभिजीत पेंढारकर आणि रविंद्र गुर्जर यांनी आपापली मते मांडली.

## मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे राष्ट्रीय पुस्तक सप्ताहानिमित्त आयोजित विविध उपक्रमांची वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल



### प्रवासवर्णनातून निसर्गाशी एकरूपता

सुचेता कडेठाणकर : 'गोबीचे वाळवंट' उलगडला प्रवास

### लेखन कौशल्यासाठी वाचन वाढवण्याची गरज

### मनाला भिडते तेच खरे साहित्य : सुधा मेनन

भारतातील लेखक गरीबच

### प्राण्यांमध्ये समरस व्हा : वीणा देव

शुद्धिपत्रक

जाहीर नोटीस

### उत्तम अनुवादक होण्यासाठी विविध क्षेत्रांची जाण हवी : गुर्जर

पुणे, ता. २० : "उत्तम अनुवादक होण्यासाठी साहित्य, पत्रकारितेसोबतच विविध क्षेत्रांची जाण आवश्यक आहे. समृद्ध वाचन, [illegible] शिक्षण, प्रवास, लेखनाचा सतत ध्यास घेतल्यास; तसेच अनुवादकाचे मन संवेदनशील असल्यास चांगला अनुवाद करण्यासाठी उपयोग होतो," असे मत अनुवादक रवींद्र गुर्जर यांनी व्यक्त केले.

'नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया'ने १४ ते २१ नोव्हेंबरदरम्यान 'राष्ट्रीय पुस्तक सप्ताह' घोषित केला आहे. त्यानिमित्त मेहता पब्लिकेशन हाउसच्या वतीने 'अनुवादित साहित्य' या विषयावर चर्चा आयोजित केली होती. त्यात गुर्जर बोलत होते. अनुवादक प्रज्ञा ओक, पत्रकार अभिजित पेंढारकर यांनी त्यात भाग घेतला.

"अनुवाद हे केवळ रूपांतर नसून, ती एक भावना आहे. ती भावना उत्तम शब्दांत उतरविणे हेच अनुवादकाचे खरे कौशल्य आहे. शाब्दिक कोटींमुळे जसाच्या तसा अनुवाद करता येत नाही, त्यामुळे प्रकाशकाने अनुवादकाकडून सर्वच पुस्तकांच्या अनुवादाचा अट्टहास धरू नये," असे मत पेंढारकर यांनी व्यक्त केले. "अनुवादकाला प्रथम पुस्तक आवडले पाहिजे, तरच तो उत्तम अनुवाद करू शकतो," असे ओक म्हणाल्या.

सप्ताहाच्या सातव्या दिवशी विज्ञान साहित्य या विषयावर विज्ञान लेखक निरंजन घाटे यांच्याशी चर्चात्मक कार्यक्रम झाला. दि. २१ नोव्हेंबर रोजी सप्ताहाच्या अखेरच्या दिवशी दिमाख सहस्रबुद्ध यांनी मेहता पब्लिशिंग हाउसच्या वेबसाईटची पहिली झलक दाखवली. यावेळी पुस्तकांचे ऑनलाईन विश्व या विषयावरील चर्चात्मक संवादात विक्रम भागवत, अंजली देशमुख, चैतन्य भुरे, हर्षदा बावनकर यांना भाग घेतला होता.

मेहता पब्लिकेशन हाउसतर्फे सुनील मेहता यांच्या संकल्पनेतून साकार झालेला हा आंतरराष्ट्रीय पुस्तक सप्ताह भविष्यात दर वर्षी आयोजित करण्यात येणार आहे.




## डॉ. दाभोलकर स्मृती पुरस्कार

महाराष्ट्र अंधश्रद्धा निमूर्लन समितीच्या वतीने डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती युवा कार्यकर्ता पुरस्कार नाशिकचे कार्यकर्ते कृष्णा चांदगुडे यांना, तर ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कार नगर येथील नागेश कुसळे यांना औरंगाबाद येथे दिग्दर्शक नागराज मंजुळे, शैला दाभोलकर, गार्गी फुले, अविनाश पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कृष्णा चांदगुडे हे अंधश्रद्धा निर्मूलन व जात पंचायत विरोधी लढ्यात प्रभावीपणे काम करत आहेत.साथी निळू फुले सांस्कृतिक अभिव्यक्ती प्रेरणा पुरस्कार अजीम ऊर्फ राजू इनामदार (पुरंदर, पुणे) यांना देण्यात आला. मुंबई येथील सुधाकर उद्धवराव आठल्ये यांच्या देणगीतून हे पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत.

## सायरस पूनावाला यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार

"केंद्रात कोणाचेही सरकार असो, त्यांने उद्योगधंद्यांना चालना द्यायला हवी. करप्रणाली सुटसुटीत करून कररुपाने मिळणारा निधी आरोग्य, शिक्षण, निवारा यांसारख्या पायाभूत सुविधांवर आणि प्रशासकीय यंत्रणा उभारण्यावर भर दिला पाहिजे. उद्योगधंद्यांना प्रेरणा देणे हे सरकारचे कर्तव्य आहे," असे मत इन्फोसिसचे संस्थापक के. नारायण मूर्ती यांनी व्यक्त केले.

पुण्यभूषण फाऊंडेशनतर्फे सिरम इन्स्टिट्यूटचे डॉ. सायरस पूनावाला यांना नारायण मूर्ती आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते 'पुण्यभूषण' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महापौर दत्तात्रेय धनकवडे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, उपमहापौर आबा बागूल, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई आदी उपस्थित होते.

या वेळी पवार यांच्या हस्ते मधुकर फडणीस, शांता रानडे, राजाभाऊ

पिंगळे, देवीचंद राठोड आणि एकनाथ कोठावदे या स्वातंत्र्यसैनिकांचा सत्कार करण्यात आला.

मूर्ती म्हणाले, ‘‘उद्योग आणि व्यावसायिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाहीत. त्यातून संपत्ती आणि रोजगारांची निर्मिती होउन, सुटसुटीत करप्रणालीमुळे कोणत्याही नागरिकाला कर भरणे सोयीचे कसे जाईल. तसेच कररूपाने जमा होणारा निधी खर्च करणारे लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी निर्माण होतील, यावर भर दिला पाहिजे.

‘देशातीलच नव्हे, तर जगातील नवी पिढी वाढविण्याचे आणि जोपासण्याचे कर्तव्य करण्यात एका भारतीयाचा मोठा वाटा असून त्यांचा संपूर्ण देशाला अभिमान आहे.’ असे पूनावाला यांच्याबद्दल गौरवोद्‌गार काढून पवार म्हणाले, ‘‘जगामध्ये तीन बालके जन्माला आली, तर त्यापैकी दोन बालकांना सिरमचे व्हॅक्सिन दिले जाते. आज १४३ देशांत त्यांचे व्हॅक्सिन पुरविले जाते. त्यांना पुरस्कार देऊन कर्तृत्ववान पुणेकरांच्या यादीत आणखी एका नावाची भर संस्थेने घातली आहे.’’

जगात कोणत्याही औषधनिर्मिती कंपनीच्या तुलनेत निम्म्या दरात औषधे उपलब्ध करून देण्याचे आपल धोरण असल्याचे सांगून पूनावाला म्हणाले, ‘‘आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना आणि सर्वसामान्यांना परवडणारी औषधे असावीत, हा हेतू त्यामागे आहे. या धोरणामुळे आज जगात औषधनिर्मिती क्षेत्रात ‘सिरम’ हा मोठा उद्योग झाला आहे.’’

माशेलकर म्हणाले, ‘‘सर्वसामान्यांना परवडतील अशा दरात औषधे उपलब्ध करणारे पूनावाला हेच ‘रोल मॉडेल’ आहेत.’’

कार्यक्रमाचे प्रास्ताविक देसाई यांनी केले. महापौर धनकवडे यांचे भाषण झाले. राहुल सोलापूरकर यांनी आभार मानले.

## सासणे यांना ‘साहित्य भूषण पुरस्कार

काकासाहेब म्हस्के मेमोरिअल मेडिकल फाउंडेशनच्या वतीने साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात येणारा ‘काकासाहेब म्हस्के साहित्य भूषण’ पुरस्कार यंदा भारत सासणे यांना जाहीर झाला आहे. म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त ११ जानेवारी २०१५ रोजी हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यापूर्वी सासणे यांना साहित्य क्षेत्रातील कार्याबद्दल विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.

## न्या. नरेंद्र चपळगावकर यांना राष्ट्रीय बंधुता पुरस्कार

निवृत्त न्यायाधीश नरेंद्र चपळगावकर यांना राष्ट्रीय बंधुता पुरस्कार जाहीर झाला आहे. सत्यशोधक पगडी, लेखणी आणि रोख पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद आणि बंधुता प्रतिष्ठान यांच्या वतीने जानेवारी महिन्यात होणाऱ्या कार्यक्रमात सोळाव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाईल.

## सुनील देवधर यांना पुरस्कार

सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनावर आधारित दृक्-श्राव्य माहितीपटाला २०१३ या वर्षीचा 'आकाशवाणी पुरस्कार' मिळाला आहे. आकाशवाणीच्या पुणे केंद्राचे निर्मिती व्यवस्थापक सुनील देवधर यांनी हा २० मिनिटांचा माहितीपट तयार केला आहे.

## नागराज मंजुळे यांना 'कलागौरव पुरस्कार'

'वास्तववादी चित्रपटनिर्मिती करणे हे खरं तर मोठे आव्हान असते. परंतु, ते स्वीकारल्यामुळे लोकांना चित्रपट आवडले. चांगला प्रतिसादही मिळाला,'' असे प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी सांगितले.

देहू येथील प्रा. रामकृष्ण मोरे सोशल फाऊंडेशन आयोजित व्याख्यानमालेत या वर्षीचा 'कलागौरव पुरस्कार' मंजुळे यांना प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार लक्ष्मण जगताप होते. आमदार बाळा भेगडे, सुरेश गोरे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे सहकार्यवाह भाऊसाहेब भोईरे, संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष रामदास मोरे, फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय अत्रे, सुनील कंद उपस्थित होते. नाना शिवले, अप्पा रूपनर यांनी मंजुळे आणि कलाकारांची मुलाखत घेतली. संदीप शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

रूपेरी पडद्याच्या आकर्षणाविषयी मंजुळे म्हणाले, 'लहानपणापासून नाटकात काम करण्याची आवड होती. परंतु, संधी मिळत नव्हती. ती आपणच निर्माण करावी, अशी जिद्द बाळगली. त्यातून आत्मविश्वास निर्माण झाला. कष्ट घेतले. पिस्तुल्या, फॅन्ड्रीची निर्मिती झाली. त्याला प्रेक्षकांचा

प्रतिसाद मिळाला. पुरस्कारही मिळाले. ‘फॅन्ड्री’तून समाजातील अस्वस्थता, जातीयवादावर भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे.’

ते पुढे म्हणाले, ‘मराठीत चांगले प्रयोग होत आहेत. मी वास्तव चित्र दाखविण्याचा प्रयत्न केला. तो सर्वांना आवडला. मराठीतील वैविध्यपूर्ण विषयांचे कौतुक जगभर होऊ लागले आहे. ही बाब आनंदाची आहे.’

## डॉ. जब्बार पटेल यांचा गौरव

आयुष्याच्या वाटचालीमध्ये सगळे ‘देणारे’ भेटले म्हणून मी घडलो, अशी भावना दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांनी व्यक्त केली.

‘विष्णूदास भावे पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जब्बार पटेल यांचा ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सरहद, महाराष्ट्र साहित्य परिषद, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे शाखा आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ पुणे शाखा यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सरहद म्युझिकतर्फे गुरु ग्रंथ साहिबमधील संत नामदेवांच्या रचनांचा समावेश असलेल्या ‘नामदेव बानी’ या सीडींचे प्रकाशन डॉ. लागू यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसिद्ध गायक पं. संजीव अभ्यंकर, दीपा श्रीराम, डॉ. माधवी वैद्य, भारत देसडला, संजय नहार, सुनील महाजन, संतसिंग मोखा, सुरेश देशमुख, मेघराजराजे भोसले या वेळी उपस्थित होते.

‘‘पहिला विष्णूदास भावे पुरस्कार बालगंधर्व यांना प्रदान करण्यात आला होता. आचार्य अत्रे, केशवराव दाते, नानासाहेब फाटक, मामा पेंडसे, पु. ल. देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, सत्यदेव दुबे, निळूभाऊ फुले अशा दिग्गजांच्या साखळीची अखेरची कडी होता आले याचा आनंद आहे. नाटक हे शास्त्र आहे. सर्व शक्यता तर्कशास्त्राच्या आधारे पाडताळत आधुनिक दृष्टी ठेवून काम केले पाहिजे, असे विष्णूदास भावे यांनी सांगितले आहे. सोलापूरला श्रीराम पुजारी सरांकडे वास्तव्यास असताना अनेक दिग्गज गायक, साहित्यिक यांना जवळून पाहण्याची आणि ऐकण्याची संधी मिळाली. त्यामुळे संगीताचे शिक्षण न घेताही कान तयार झाला. समोर दिसते, लोकप्रिय असते ते खरे नव्हे. त्याच्या पलीकडे असते ते खरे नव्हे. त्याच्या पलीकडे अनवट काही असते असे पुजारीसर या क्रांतिकारी शिक्षकाने सांगितले. त्यातूनच विजय तेंडुलकरांचे ‘माणूस नावाचं बेट’ हे नाटक

केले.'' असे डॉ. जब्बार पटेल यांनी विशद केले.

डॉ. श्रीराम लागू म्हणाले की स्वत:बद्दल चांगले बोलण्याचा जब्बारला संकोच वाटत नाही. आमच्या क्षेत्रात हे दुर्मिळ आहे. बोलून दाखवू नये इतका मला जब्बारबद्दल आदर वाटतो.

## प्रेस कौन्सिलचे पुरस्कार

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने 'नॅशनल अॅवॉर्ड्स फॉर एक्सलन्स इन जर्नालिझम' पुरस्कार जाहीर केले असून त्यात उत्तम लेखन गटात 'द हिंदू'च्या राही गायकवाड आणि 'आउटलुक' च्या नेहा भट यांचा समावेश आहे.

छायाचित्र पत्रकारितेत वृत्तछायाचित्र गटात 'द इंडियन एक्स्प्रेस'चे नीरज प्रियदर्शी व पीटीआयचे कमल किशोर यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. स्त्रीशक्ती वर्गात 'आउटलुक'च्या प्रियदर्शनी सेन, विकास वार्तांकनात 'डाऊन टू अर्थ'चे संभव श्रीवास्तव, ग्रामीण पत्रकारितेत खबर मंत्राचे कॉर्निलिस मिन्झ, मल्लापुरमच्या देशाभिमानीचे आर. संबन यांना पुरस्कार जाहीर झाले. दुसऱ्या एका गटात मल्याळ मनोरमाचे एम. शाजी कुमार व आउटलुकचे उत्तम सेनगुप्ता यांची निवड झाली.

छायाचित्र पत्रकारितेत छायालेख गटात युरोपियन प्रेस फोटोचे पियाल अधिकारी, द इंडियन एक्स्प्रेसचे रवी कनोजिया यांना गौरवण्यात आले आहे. उर्दू पत्रकारितेत अखबारे ए मशिरिक या दिल्लीच्या वृत्तपत्राचे वसीम उल हक यांनाही पुरस्कार जाहीर झाला आहे.

## फिरोदिया पुरस्कार

विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय संशोधनकार्य केल्याबद्दल या वर्षी एच. के. भान आणि आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. देवांग खाखर यांना बालगंधर्व रंगमंच येथे पाच डिसेंबर रोजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एफ. सी. कोहली यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

फिरोदिया म्हणाले, ''माझे वडील एच. के. फिरोदिया यांनी तंत्रज्ञान विकासावर नेहमी भर दिला. विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला पुढे नेणाऱ्या शास्त्रज्ञांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम, भारतरत्न सीएनआर राव, प्रा. एम. एस. स्वामीनाथन यांनाही यापूर्वी

या पुरस्काराने गौरविले आहे.''

डॉ. भान यांनी अतिसारावर प्रभावी रोटा व्हायरस प्रतिबंधक लस विकसित करण्यात मोलाचे योगदान दिले. त्यांना दोन लाख रुपये व मानपत्र देण्यात आले. डॉ. खाखर यांनी पॉलिमर प्रक्रिया क्षेत्रातील संशोधनासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांना एक लाख रुपये व मानपत्र देऊन गौरव केला गेला. तसेच डॉ. कोहली यांनी भारतीय माहिती-तंत्रज्ञान उद्योगाला आकार दिला. अभियांत्रिकी आणि शिक्षण क्षेत्राच्या प्रगतीसाठी अमूल्य योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांना जीवनसाधना गौरव पुरस्कारने सन्मानित केले.

## उषाताई वाघ यांना श्रमसेवा पुरस्कार

''विद्यार्थ्यांना माहिती देण्याचे काम सध्याच्या शिक्षणपद्धतीतून केले जात आहे. जागतिक पातळीवर विचार केल्यास पाश्चिमात्य देशांमध्ये शिक्षणातून माहिती देण्याबरोबरच कौशल्य व संशोधनाला महत्त्व दिले जाते. आपल्याकडेही माहिती देण्यासह कौशल्य व संशोधनावर आधारित शिक्षणपद्धती असायला हवी. त्यासाठी कम्युनिटी कॉलेज ही संकल्पना उपयुक्त आहे.'' असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

गंगापूर रोडवरील मविप्र अभियांत्रिकी महाविद्यालय येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. सांळुखे यांच्या हस्ते पुण्यातील उषाताई वाघ यांना 'श्रमसेवा पुरस्कार २०१३'ने गौरविण्यात आले. या प्रसंगी मुक्त विद्यापीठाच्या नाशिक केंद्राचे संचालक प्रा. सुरेश पाटील, विलासराव वाघ आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, की देश महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत असताना त्यासाठी शिक्षणपद्धती आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. आगामी काळात त्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार आहेत.

सत्काराला उत्तर देताना वाघ म्हणाल्या, की आजच्या काळात श्रम आणि सेवा यांच्यात फारकत झाली आहे. पूर्वी श्रमाशिवाय सेवा नसायची, बदलत्या युगात श्रमाशिवाय सेवा करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे, परंतु श्रमातून केलेल्या सेवेचे महत्त्व कधीच कमी होऊ शकत नाही.

## सपकाळ, सत्यनारायण यांना तेजस्विनी जीवनगौरव पुरस्कार

''समाजातून स्त्रीला वजा केले तर समाज शून्य आहे. स्त्री नाही तर काहीच नाही. नवरा हा रानचा दिवा आहे, पण स्त्रीच घरातील सर्व कामे सांभाळते आणि पतीच्या बरोबरीने राबते म्हणून संसार सुरळीत चालतो,'' असे मत ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांनी व्यक्त केले.

सपकाळ यांनी आपला जीवनपट उलगडून समाजातील वंचितांसाठी अजून खूप काही करण्याची गरज आहे, असे सांगितले.

सिंधूताई सपकाळ आणि नीता सत्यनारायण यांना तेजस्विनी जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. राही भिडे यांना पत्रकारितेतील योगदानाबद्दल तेजस्विनी माध्यम सेवा गौरव या पुरस्काराने आणि विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनाही या वेळी सन्मानित करण्यात आले.

## वसंत साळवे यांना जीवनगौरव पुरस्कार

'पद, पैसा, प्रतिष्ठेपायी आंबेडकरी चळवळीतले काही नेते दारोदार झोळी घेऊन फिरत आहेत. विवेक हरवून ते प्रतिगामी विचारांच्या पक्षांकडे वळत आहेत. ही चिंतेची बाब असून, चळवळीच्या कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे,' असा सूर 'फुले, शाहू, आंबेडकर प्रतिष्ठान' तर्फे आयोजित परिसंवादात व्यक्त झाला.

फुले शाहू आंबेडकर प्रतिष्ठानच्या दशकपूर्ती निमित्त 'आंबेडकरी चळवळीच्या अस्मितेचा शोध आणि बोध' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. प्रतिमा परदेशी, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, प्रा. डॉ संग्राम मौर्य आणि बाळ आल्हाट यात सहभागी झाले होते. भारिप बहुजन महासंघाचे सचिव वसंत साळवे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले, तसेच प्रबोधन या स्मरणिकेचे प्रकाशनही या वेळी करण्यात आले, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण गायकवाड, उपाध्यक्ष गोरख निकाळजे, अशोक पगारे उपस्थित होते.

''एक एक नेता चळवळीपासून दूर जात असल्याने चळवळ क्षीण होत आहे. चळवळींची राजकीय दिशा अंधारात बुडाली असून, नेते रणभूमीवरून पळ काढत आहेत. अशा परिस्थितीत आंबेडकरी चळवळीची दिशा, भावी वाटचाल कशी असेल याचे चिंतन आवश्यक आहे,'' असे आल्हाट यांनी सांगितले. ''गुलामगिरी नको असेल तर फुले शाहू आंबेडकरवादी

चळवळींचा समन्वय ही काळाची गरज आहे,'' असे डॉ. मौर्य यांनी सांगितले.

विवेक हरवून जातीय अस्मिता टोकदार करत प्रतिगामींच्या कळपात सामील होणे, ही चिंतेची बाब आहे. सांस्कृतिक दहशतवाद माजविणाऱ्या संघटनांच्या पाठिंब्याखाली सत्तेत आलेल्या सरकारचे परिणाम आता दिसू लागले आहेत. मनुस्मृती आणि 'मनी'वाद एकत्र आले आहेत, असे परदेशी यांनी सांगितले

## सर्वोत्कृष्ट नाटक पुरस्कार

'सलाम पुणे' संस्थेच्या रंगभूमी दिन कार्यक्रमात 'मिस्टर अँड मिसेस', 'अलिबाबा आणि चाळीशीतले चोर' या दोन नाटकांना सर्वोत्कृष्ट नाटकाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. गायक चंद्रशेखर महामुनी, अमिताभ बच्चन यांसारखे दिसणारे शशिकांत पडेवाल आणि एकपात्री कलाकार संतोष चोरडिया यांनाही पुरस्कार देण्यात आले.

अभिनेत्री जयमाला शिलेदार, अभिनेते आनंद इंगळे, विद्याधर जोशी, चिन्मय मांडलेकर, मधुरा साटम, अभिजित साटम, अजित भुरे उपस्थित होते. मकरंद साळवे यांनी सूत्रसंचालन केले.

## रमणबागच्या 'जाणता राजा'ची लिम्का बुकमध्ये नोंद

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेने सादर केलेल्या, 'जाणता राजा' या महानाट्याची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये सर्वाधिक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी मिळून सादर केलेले शालेय नाट्य म्हणून करण्यात आली आहे.

शाळेच्या विद्यार्थी, शिक्षकांनी तसेच पालकांनी १७ डिसेंबर २०१३ रोजी बाबासाहेब पुरंदरे लिखित 'जाणता राजा' या महानाट्याचे सादरीकरण केले. मुख्याध्यापकांसह २५५० कलाकार या महानाट्यात सहभागी झाले. नाटकासाठी लागणारे साहित्य विद्यार्थ्यांनीच तयार केले. प्रयोगापासून ते सादरीकरणापर्यंतचे सर्व चित्रीकरण 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड कडे पाठविण्यात आले, त्यानंतर या महानाट्याची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये करण्यात आली.

## डॉ. कामत यांना हिंदी सेवा पुरस्कार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनाचे माजी विभागप्रमुख डॉ. अशोक कामत यांना लखनौ येथील राष्ट्रधर्म मासिकाचा हिंदी सेवा पुरस्कार २ नोव्हेंबरला लखनऊ येथे दिला गेला.

## टिळक जीवनगौरव पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या 'जयंतराव टिळक स्मृती जीवनगौरव' पुरस्कार ज्येष्ठ रंगकर्मी ज्योती चांदेकर यांना रंगभूमी दिनी ता. ५ नोव्हेंबरला टिळक स्मारक मंदिरात देण्यात आला.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ रंगकर्मी श्रीकांत मोघे, माजी आमदार उल्हास पवार, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात शकुंतला फुलपगार आणि कमलाबाई विश्वकर्मा यांना 'माता जानकी पुरस्कार', जयश्री कुलकर्णी यांना 'प्रपंच लक्ष्मी पुरस्कार', संपदा आणि भालचंद्र पारसे यांना 'लक्ष्मी नारायण पुरस्कार', सेवा चौहान यांना 'चित्तरंजन कोल्हटकर स्मृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

## पुष्पलता रानडे पुरस्कार

''प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर असल्या तरी त्या जनसंपर्कात कमी पडतात. त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला निवडून आल्या तरी त्यांचे पतीच कारभार करत असतात, हे चित्र बदलण्याची आवश्यकता आहे,'' असे मत राज्याच्या माजी निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांनी व्यक्त केले.

कीर्तन संजीवनी पुष्पलता रानडे महिला राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात साहस राष्ट्रीय पुरस्कार फ्लेविया अँग्रेस आणि संशोधन राष्ट्रीय पुरस्कार डॉ. सुमन सहाय यांना प्रदान करण्यात आला. गानवर्धनचे कृ. गो. धर्माधिकारी यांना विशेष पुरस्कार देण्यात आला.

आकांक्षा आणि आनंद देशपांडे यांना जिद्द पुरस्कार देण्यात आला तर भारूड सम्राज्ञी पद्मजा कुलकर्णी यांना विशेष कला गौरव पुरस्कार देण्यात आला. यावेळी ज्येष्ठ समाजसेविका विद्या बाळ, पद्मभूषण डॉ. आर. बी. लेले, सुरेश रानडे आदी उपस्थित होते.

सत्यनारायण म्हणाल्या, 'महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढहोत आहे. त्याला चंगळवाद आणि संस्काराचा अभाव ही कारणे आहेत. कीर्तनाच्या माध्यमातून पुष्पलता रानडे यांनी जे संस्कार दिले, त्यांची खऱ्या अर्थाने आज आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे आपल्या प्रश्नांबाबत एकत्र येणे आणि त्याचबरोबर जनसंपर्क वाढवणेवरही महिलांनी विशेष लक्ष द्यायला हवे.'

## डॉ. मनमोहनसिंग यांना जपानचा सर्वोच्च पुरस्कार

माजी पंत्रप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना 'ग्रँड कॉर्डन ऑफ द ऑर्डर ऑफ द पॉलबोनिया फ्लॉवर्स' हा जपानचा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंग यांचे अभिनंदन केले. हा पुरस्कार मिळविणारे डॉ.सिंग पहिले भारतीय ठरले आहेत.

## 'सलाम पुणे'तर्फे कलाकारांचा गौरव

'खोया खोया चाँद', 'दिल आज नगमा' आ अजरामर गाण्यांना मिळालेली वन्स मोअरची दाद, ज्युनिअर अमिताभ बच्चन यांची उपस्थिती, नाट्य कलावंतांना प्रदान करण्यात आलेले पुरस्कार...

निमित्त होते सलाम पुणे या संस्थेतर्फे मराठी रंगभूमी दिन कार्यक्रमाचे. 'ज्युनिअर अमिताभ बच्चन' शशिकांत पेडवाल, गायक चंद्रशेखर महामुनी, एकपात्री कलाकार संतोष चोरडिया यांना या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच 'मिस्टर अँड मिसेस' आणि 'अलीबाबा आणि चाळीशीतले चोर' या नाटकांना सर्वोत्कृष्ट नाटकाचा पुरस्कार देण्यात आला. चिन्मय मांडलेकर, मधुरा वेलणकर, अभिजित साटम, प्रियदर्शन जाधव, आनंद इंगळे, विद्याधर जोशी, सीमा देशमुख, मंजुषा गोडसे, अजित भुरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. संस्थेचे अध्यक्ष शरद लोणकर, सुवदन आंग्रे, दीपक सवाखेडे, शिव कदम, हर्षित अभिराज, निखिल महामुनी, मधूरा वेलणकर आदी या वेळी उपस्थित होते. महामुनी यांनी देव आनंद यांच्या चित्रपटांतील गायलेल्या गाण्यांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

## नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्योती चांदेकर यांना

'सरकार रंगभूमीच्या पाठीशी राहील की नाही, याचा विचार करण्यापेक्षा

प्रेक्षकांनीच नाट्यकलेच्या पाठीशी उभे राहण्याची आवश्यकता आहे. दक्षिणेत रजनीकांतसारख्या मराठी माणसाचे चित्रपट केवळ दक्षिणेतील भाषेवरील प्रेमापोटी तुफान चालतात. मात्र, आपल्याकडील नाटकांना प्रेक्षक मिळत नाही. मराठी नाटक, संस्कृती, भाषा मराठी माणसांनीच जोपासली पाहिजे,'' असे आवाहन उल्हास पवार यांनी केले.

अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पुणे शाखेतर्फे डॉ. जयंतराव टिळक स्मृती जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुणे शाखेचे अध्यक्ष सुरेश देशमुख, अविनाश देशमुख, दीपक रेगे, मकरंद टिल्लु, दादा पासलकर, निकिता मोघे आदी या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात चित्तरंजन कोल्हटकर स्मृती पुरस्कर सेवा चौहान यांना, शकुंतला फुलपगार, कमलबाई विश्वकर्मा यांना माता जानकी पुरस्कार, जयश्री कुलकर्णी यांना प्रपंच लक्ष्मी पुरस्कर, भालचंद्र व संपदा पानसे यांना लक्ष्मीनारायण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'राजकारणी नाटक, सिनेमा पहायला जात नाहीत. त्यामुळे त्यांना त्यातील खरा आनंद मिळत नाही. रंगभूमीवरील कामाचा अनुभव पुढील आयुष्यभर विविध टप्प्यांवर उपयुक्त ठरतो,' असेही पवार यांनी सांगितले.

## राजेशकुमार सांकला यांना उद्योग सम्राट पुरस्कार

श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ दत्तनगर, वारजे-माळवाडी, बालाजीनगर, वडगाव-धायरी यांच्यातर्फे आयोजित चातुर्मास सोहळ्याची सांगता झाली. त्यात सिद्धिविनायक ग्रुपचे राजेशकुमार सांकला यांना महापौर दत्तात्रय धनकवडे व उद्योजक रसिकलाल यांच्या हस्ते उद्योग सम्राट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दत्तनगर, वारजे-माळवाडी, बालाजीनगर, वडगाव-धायरी या ठिकाणी स्वतंत्रपणे साजरे होणारे चातुर्मास एकत्रपणे साजरे करण्याचा हा उपक्रम बाळासाहेब धोका यांच्या प्रयत्नाने झाला. चातुर्मासाचा अखेरचा महिना दत्तनगर श्रावक संघाने दत्तनगर येथे आयोजित केला होता. श्री हर्षनागरजी, अक्षयऋषिजी, पुण्यश्रीजी, ज्ञानप्रभाजी यांच्या उपस्थितीत सांकला यांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी उपमहापौर आबा बागुल, आमदार माधुरी मिसाळ, अशोक गोडसे, ओमप्रकाश रांका, हेमंत संचेती उपस्थित होते.

## विष्णुदास भावे पदकाचे सांगलीत वितरण

''रंगभूमीवर गेल्या २९ वर्षांत काहीही केलेल नसले तरी चिकित्सक सांगलीकरांनी विष्णुदास भावे पुरस्कारासाठी माझी निवड केली. हाच माझा गौरव'' असल्याचे प्रतिपादन, ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी सांगलीत केले. डॉ. पटेल यांना नाट्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण काकडे यांच्या हस्ते 'विष्णुदास भावे पदक' देऊन गौरविण्यात आले.

बालगंधर्व, केशवराव दोते, प्र. के. अत्रे, गदिमा यासारख्या मान्यवरांना हा पुरस्कार मिळाला असल्याने या पुरस्काराचे महत्त्व रंगभूमी क्षेत्रात अतुलनीय आहे. मी १९८५ नंतर रंगभूमीसाठी काहीही केले नसले तरी, जे केले ते अधिकृत प्रशिक्षण न घेता बाहेरून पहात नवे प्रयोग केले. पारंपरिक शिक्षणापेक्षा बाहेरच्या जगात शिकण्यासारखे खूप असते. भावेंच्या नंतर सांगलीतील नाट्य चळवळ कांहीशी तुटलेली वाटते. मात्र प्रोत्साहन देण्यात सांगलीकर आघाडीवर राहतात. कला क्षेत्रातील लोकांनी कायम प्रयोगशील राहून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगला पाहिजे. कोणत्याही घटनेचे विश्लेषण विज्ञानवादी भूमिकेतून झाले पाहिजे.

या वेळी अभिनेते, दिग्दर्शक अभिराम भडकमकर म्हणाले की, डॉ जब्बार पटेल म्हणजे सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व करतात. कारण त्यांनी आपल्या कलाकृतींतून नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न केला.

## पर्यावरण तज्ज्ञ एरिक भरुचा यांना पुरस्कार

''शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांऐवजी प्रात्यक्षिकातून पर्यावरणाचे महत्त्व सांगितले पाहिजे. त्यांना पर्यावरणाचे धडे निसर्गातून द्या,'' असा सल्ला पर्यावरणतज्ज्ञ डॉ. एरिक भरुचा यांनी दिला.

द रॉयल बँक ऑफ स्कॉटलंडचा अर्थ हिरो पुरस्कार डॉ. भरुचा यांना देण्यात आला. यानिमित्त डॉ. भरुचा म्हणाले, ''देशाचा आर्थिक विकास हा पर्यावरणावर अवलंबून असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शालेय दशेपासूनच पर्यावरणसंवर्धन संस्काराची रुजवण झाली पाहिजे.''

''शाळांमध्ये वर्गातच 'इको फ्रेंडली' जीवनपद्धतीचे महत्त्व समजावले जाते. परंतु पर्यावरणाचे धडे वर्गात शिकण्यापेक्षा मुलांना निसर्गाच्या सान्निध्यात ते देण्याची गरज आहे. त्यातून पाणी, हवा, प्राणी, पक्षी यांच्याविषयी मुलांमध्ये आपुलकी निर्माण होईल. त्याद्वारे पर्यावरण संवर्धन

होईल. मुलांमध्ये निसर्गाबद्दलचा आदर वाढविण्यासाठी निसर्ग सहली आयोजित कराव्यात. पर्यावरण जागृतीसाठी धोरणात्मक कार्यक्रम आखावा. तसेच निसर्ग पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारनेही प्रयत्न करावेत.''

## डॉ. संजीवनी केळकर यांना बाया कर्वे पुरस्कार

महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेचा यंदाचा 'बाया कर्वे पुरस्कार' डॉ. संजीवनी केळकर यांना जाहीर झाला आहे. डॉ. केळकर या सांगोला तालुक्यात गेल्या ३३ वर्षांपासून कार्यरत आहेत. 'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान' या संस्थेची स्थापना करून त्यांनी ग्रामीण महिला आणि बालकांच्या विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले आहेत. पुरस्काराचे यंदा १९वे वर्ष आहे. पुरस्कार निवडीचे काम सदा डुंबरे, रेणू गावस्कर, महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्नेहलता सहस्त्रबुद्धे यांनी केले आहे.

## संदीप कडवे यांना पेशवा पुरस्कार

दुबईतील कॅपिटल मार्केटमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल संदीप कडवे यांना अभिनेते सचिन खेडेकर यांच्याहस्ते पेशवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातील सचिन देवधर यांनी दुबईमध्ये खास मराठमोठ्या पदार्थांचे पेशवा हॉटेल सुरु केले आहे. त्यांच्यावतीने हा पुरस्कार देण्यात येतो. यंदा या पुरस्काराचे दुसरे वर्ष आहे. संदीप कडवे गेल्या वीस वर्षांपासून दुबईमध्ये वित्तीय सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. पुण्यासह, नाशिक, औरंगाबाद या ठिकाणी काम केल्यानंतर कडवे यांनी दुबई येथे वित्तीय सल्लागार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. सध्या ते दुबईतील अनेक कंपन्यांसाठी वित्तीय सल्लागार म्हणून काम करतात. एका मोठ्या जहाजबांधणी कंपनीचे व्यवस्थापक म्हणूनही ते काम करतात. पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर  सुधीर गाडगीळ यांनी कडवे आणि सचिन खेडेकर यांची प्रकट मुलाखत घेतली. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

## माधव पोतदार, श्रीराम रानडे यांना पुरस्कार

ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांच्यातर्फे आपल्या आई वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा गुरुवर्य आबासाहेब अत्रे पुरस्कार शिक्षणतज्ज्ञ व

साहित्यिक डॉ. माधव पोतदार यांना तर इंदिराबाई अत्रे पुरस्कार लक्ष्मणराव आपटे प्रशालेतील निवृत्त शिक्षक व कलावंत श्रीराम रानडे यांना जाहीर झाला आहे. आबासाहेब अत्रे व इंदिराबाई अत्रे यांनी रास्ता पेठ एज्युकेशनल सोसायटी या संस्थेसाठी आपले आयुष्य समर्पीत केले होते. हे पुरस्कार ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

## व्ही. व्ही. मजुमदार यांना नाईटहूड सन्मान

आलियान्स फ्रान्साईज डी पुना या संस्थेला ४० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त झालेल्या एका कार्यक्रमात संस्थेचे माजी अध्यक्ष आणि उद्योजक व्ही. व्ही. मुजुमदार यांना फ्रेंच नॅशनल ऑर्डर ऑफ मेरिट या सन्मानाने गौरवण्यात आले. फ्रान्सचे मुंबईतील वाणिज्य दूत जो रफायल पेथ्रन्ये यांच्याहस्ते मुजुमदार यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. आलियान्सला संकटाच्या काळी मदत करुन बाहेर काढण्याचे काम केले. ते याच संस्थेत फ्रेंच भाषा शिकले. त्यांनी संस्थेचे अध्यक्षपद दोनवेळा भुषवतानाच संस्थेच्या प्रगतीत महत्वाची भूमिका बजावली, अशा शब्दांत पेथ्रन्ये यांनी मुजुमदार यांच्या कामगिरीचे कौतुक केले. यावेळी आलियान्सचे अध्यक्ष ॲड. जयंत शाळीग्राम, उपाध्यक्ष स्वाती खेर आदी उपस्थित होते. आन मारी त्सुइए यांनी उद्‍घाटनाचे भाषण केले. प्रा. सूज्ञा आठल्ये, स्वाती जांभेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रसिध्द तबलावादक आदित्य आठल्ये आणि सहकाऱ्यांनी संगीताचा तर निशा सेशन यांनी नृत्याचा कार्यक्रम सादर केला.

## डॉ. प्रकाश आमटे यांना जय वैभवलक्ष्मी पुरस्कार

समस्यांच्या मुळाशीच त्यांचे उपायही असतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करताना उपाय शोधण्याचा प्रयत्न केल्यास जीवनात अशक्यप्राय वाटणारी ध्येये गाठणे सहजशक्य होते. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व मंदाताई आमटे यांनी आदिवासींसाठी केलेले काम व त्यांच्या आयुष्यातील रोमांचकारी घटनांची माहिती दिली. यावेळी निवेदक मिलिंद कुलकर्णी यांनी आमटे दाम्पत्याची प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीत प्रकाश आमटे व मंदाताई आमटे यांनी महाविद्यालयीन जीवन, लग्न, हेमकसातील आयुष्य, रुग्णसेवा, आदिवासींसोबतचे जीवन, नुकताच

प्रदर्शीत झालेला डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चित्रपटासंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी प्रकाश आमटे म्हणाले की, या चित्रपटाचा प्रामुख्याने महाविद्यालयीन तरुणांवर मोठा प्रभाव पडला आहे. आजची युवा पिढी भरकटलेली नसून ती योग्य दिशा शोधत असते. त्यांना नेहमीच एका चांगल्या मार्गदर्शकाची गरज असते. त्यांनी लोकबिरादरीसह आनंदवनातील बाबा आमटे यांच्या कार्याबाबत सविस्तर माहिती दिली. माजी आमदार उल्हास पवार म्हणाले की, आमटे कुटुंबियांचा अंधारातून प्रकाशाकडे नेणारा तसेच मानवता व जीवनाच अर्थ सांगणारा प्रवास सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.

## डॉ. ए. ए. नातू यांचा गौरव

जर्मनीतील डीएडी म्हणजेच जर्मन ॲकॅडमीक एक्सचेंज सर्विस या संस्थेने पुणे येथील डॉ. ए. ए. नातू यांची संस्थेचे संशोधन सदिच्छादूत म्हणून आणखी तीन वर्षांसाठी नियुक्ती केली आहे. नातू हे पुण्यातील आयसर या संस्थेचे प्राध्यापक आहेत. नातू यांनी यापुर्वीही डीएडीचे संशोधक तसेच सदिच्छादूत म्हणून काम केले आहे. शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्रात भारत व जर्मनीचे सहकार्य टिकून रहावे, यासाठी संशोधन सदिच्छादुतांची नियुक्ती करण्यात येत असते. नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात नातू यांचा डीएडीच्या संचालिका हाईक मार्क यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.





**सिंड्रेला**

**आणि इतर कथा**

लेखिका

उमा खरे

**किंमत : ६०/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

**५वी आवृत्ती**

# आयुष्याचे धडे गिरवताना

लेखक
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




आयुष्याच्या प्रवासात आपल्याला विविध प्रकारच्या व्यक्ती भेटतात, अनेक घटना-प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्यातून वेगवेगळे अनुभव येतात. त्यातले काही अनुभव चांगले असतात, काही घटना वाईट. काही सुखकारक असतात, तर काही दुःखदायक. काही व्यक्ती चमत्कारिक असतात, तर काही अनुभव मन थक्क करणारे....

हे अनुभव, या व्यक्ती आपल्याला बरेच काही शिकवून जातात. आपले आयुष्य विविध अंगांनी संपन्न करतात; परिपक्व बनवतात.

या संग्रहात सुधा मूर्ती यांनी या अनुभवांना आणि व्यक्तिरेखांना कथारूप दिले आहे. या कथा जशा सुधा मूर्ती यांच्या आहेत,


तशा त्या तुमच्या-आमच्या आहेत; विलक्षण चमत्कृतींनी भरलेल्या, गुंतागुंतीच्या जीवनाविषयीच्या आहेत.

सहजसोप्या कथनशैलीतून उलगडत जाणाऱ्या या कथा 'आयुष्याचे धडे' देतात; अंतर्मुख करतात.




# वॉरन बफे

पैशांवर जिवापाड प्रेम करूनसुद्धा पैशांची आसक्ती
अजिबात न बाळगणारा जगावेगळा माणूस




लेखक : अतुल कहाते

पृष्ठे २१६ । किंमत ₹ २२० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

# बालपण ते तरुणपण

सतराव्या शतकामध्ये जॉन बफे नावाचा एक विणकर बहुधा युरोपमधल्या धार्मिक जाचाला कंटाळून अमेरिकेमध्ये पळून आला. 'बफे' आडनावाची हीच पहिली ओळख असल्याचं मानलं जातं. यानंतर काही पिढ्या उलटून गेल्यावर बफे घराण्यामधला कंजुषपणाचा एक मजेशीर गुणधर्म अगदी ठळकपणे दाखवणारी घटना घडल्याचं दिसून येतं : सिडनी बफे नावाचा माणूस काही उद्योगधंदा जमत नसल्यामुळे आपल्या सख्ख्या आजोबांच्या शेतात मजुरी करायला गेला. पण या आजोबांना त्याचं काही विशेष असं वाटलं नाही. त्यांनी इतर मजुरांप्रमाणेच आपल्या या नातवालाही अगदी कमी पगारावर काम करायचं फर्मान सोडलं. या नातवानं म्हणजे सिडनीनं सुरुवातीला नाराजीनं हे काम करायला सुरुवात केली खरी; पण लवकरच वैतागून त्यानं हे अत्यंत कमी पगाराच्या मजुरीचं काम सोडलं. आणि तो अमेरिकेच्या नेब्रास्का राज्यामधल्या ओमाहा गावी निघून गेला. आपल्या आजोबांनी आपल्याला इतका कमी पगार द्यावा, याचं सिडनीला वाईट वाटत होतं. म्हणून आता तो आपल्या आईच्या नातेवाइकांकडे म्हणजेच आईच्या वडिलांकडे ओमाहा इथे दाखल झाला. सिडनीच्या या दुसऱ्या आजोबांचा ओमाहामध्ये एक व्यवसाय होता. अमेरिकेच्या इतिहासात गाजलेलं यादवी युद्ध नुकतंच संपल्यामुळे ओमाहा गाव रेल्वे मार्गानं इतर ठिकाणांशी जोडण्यात आलं होतं. त्यामुळे हे गाव अचानकपणे प्रकाशझोतात आलं आणि आपण या परिस्थितीचा फायदा उठवला पाहिजे, हे लक्षात घेऊन सिडनी बफेनं किराणामालाचं दुकान थाटलं. ओमाहाच्या तोपर्यंतच्या इतिहासामधलं किराणामालाचं असं हे पहिलंच दुकान! त्याचा हा निर्णय चांगलाच यशस्वी ठरला आणि सिडनीचा धंदा जोरात सुरू झाला. सिडनीनं म्हणजे आपल्या नातवानं असला वेडगळपणा केल्याबद्दल शेतमालक असलेल्या त्याच्या आजोबांना त्याची खूप काळजी वाटायची. ते वारंवार पत्रं लिहून त्याला सल्ले द्यायचे आणि तो मात्र त्या सगळ्या सल्ल्यांकडे साफ दुर्लक्ष करायचा! फक्त काही महत्त्वाचे सल्ले त्यानं मानले आणि नंतरच्या बफे मंडळींनीसुद्धा त्या सल्ल्यांनुसारच आपलं आयुष्य जगायचं असं ठरवलं असावं. ते सल्ले म्हणजे कर्ज काढू नयेत, उधारी वाढवू नये आणि आपल्या उत्पन्नात समाधान मानावं!

सिडनीनं आपल्या व्यवसायात जम बसवून त्यात यश मिळवल्यावर लग्न केलं; पण दुर्दैवानं सिडनीच्या बायकोच्या पोटी जन्मलेल्या सहा जणांपैकी फक्त अर्न्स्ट आणि फ्रँक ही दोनच मुलं मोठी होईपर्यंत जगली. सिडनीनं आपल्या दुकानाचा व्याप खूपच वाढवला, त्यामुळे त्याच्या दोन्ही मुलांनाही दुकानात काम करावं लागलं. एके दिवशी हे दोघे भाऊ आपलं दुकान सांभाळत असताना हेन्रिएटा ड्युवल नावाची एक अत्यंत सुंदर तरुणी आपल्या सावत्र आईच्या त्रासाला कंटाळून नोकरी मागायला म्हणून तिथे आली. हेन्रिएटाच्या सौंदर्यानं अर्न्स्ट आणि फ्रँक या दोन्ही भावांना बघता क्षणीच घायाळ करून सोडलं; पण त्यांच्यापैकी अर्न्स्ट जास्त देखणा असल्यानं हेन्रिएटानं १८९८ साली त्याच्याशी लग्न केलं. या घटनेनंतर नाराज झालेल्या फ्रँकनं किराणामालाचं दुसरं दुकान उघडलं आणि तो आपल्या सख्ख्या भावाशी, अर्न्स्टशी परत कधीच बोलला नाही!

अर्न्स्ट आणि हेन्रिएटा आपलं दुकान अगदी कसोशीनं चालवायचे. सगळे हिशेब चोखपणे ठेवणं, कुणाला फारशी उधारी करू न देणं, स्वत:वर कर्ज होणार नाही याची काळजी घेणं, या गोष्टींवर त्यांचा भर असे. हेन्रिएटा अत्यंत धार्मिक होती. त्या दोघा नवरा-बायकोला कसलंही व्यसन नव्हतं. तिचा स्वभाव अत्यंत कडक शिस्तीचा होता. आपल्या सगळ्या मुलांना दुकानात काम करायला लावूनसुद्धा तिनं त्यांना चांगलं शिक्षण घेण्यास भाग पाडलं होतं. तिच्या पोटी जन्मलेल्या मुलांपैकी तिसरा मुलगा हॉवर्ड म्हणजे वॉरेन बफेचा पिता! हॉवर्डला नेहमी आपल्या मोठ्या भावांनी वापरलेले कपडेच वापरावे लागत. तसंच शाळेमध्ये इतर श्रीमंत मुलांबरोबर वावरताना राहणीमानातल्या फरकांमुळे आपण साधारण कुटुंबातले आहोत, याची त्याला सतत जाणीव होत असे. ही गोष्ट त्याला सतत टोचतही असे. जन्मानं कुणी श्रेष्ठ आणि कुणी कनिष्ठ हे ठरवलं जाण्याला हॉवर्डचा असलेला विरोध तिथेच सुरू झाला. पत्रकारितेमध्ये आपलं पदवीचं शिक्षण पूर्ण करून एका स्थानिक वर्तमानपत्रामध्ये हॉवर्डनं वार्ताहराची नोकरी धरली. तिथेच लैला स्टाल नावाच्या एका समविचारी तरुणीच्या तो प्रेमात पडला. हॉवर्डप्रमाणेच लैलाचीही राजकारण आणि समाजकारण यांच्याविषयी ठाम मतं होती. तसंच समाजामधल्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये असलेल्या लोकांमध्ये सतत केल्या जाणाऱ्या फरकांची या दोघांनाही मुळापासून चीड होती. पण लैलाच्या बाबतीतली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिची आई आणि आजी या

दोघी मनोरुग्ण होत्या. एकदा लैलाची आई आपल्या तीन मुलींपैकी एका मुलीच्या मागे पेटतं लाकूड घेऊन पळत सुटली होती. त्या घटनेनंतर लैलाच्या वडिलांनी आपली नोकरी सोडून मुलींचा सांभाळ करायचं ठरवलं. तसंच लैलाच्या आजीला तर मनोरुग्णांसाठीच्या इस्पितळातच भरती करावं लागलं आणि तिथेच तिचा मृत्यू झाला होता. अशा परिस्थितीत लैलामध्ये हे दोष उतरले नसते, तरच आश्चर्याची गोष्ट ठरली असती. लैलानं खूप हालअपेष्टांमध्ये आपलं बालपण काढलं. आपल्या आईच्या विचित्र वागण्यामुळे लैलाला लहानपणापासूनच आपल्या वडिलांच्या वर्तमानपत्राच्या व्यवसायात मदत करावी लागे. त्यांचं गाव अमेरिकेमधलं असलं तरी प्रामुख्यानं जर्मन भाषिक होतं. त्यामुळे हे वर्तमानपत्र जर्मन लोकांनाही आवडेल अशाच स्वरूपाचं होतं. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीच्या विरोधातलं वातावरण वाढल्यावर साहजिकच या वर्तमानपत्राचा खप खूप घटला. त्यामुळे लैलासमोरच्या अडचणी अजूनच वाढल्या. त्यामुळे तिनं वर्तमानपत्राच्या कार्यालयात नोकरी धरायचं ठरवलं. दरम्यान हॉवर्ड बफे या वर्तमानपत्राचा संपादक झाला होता. त्यानं लैलाला कामावर घेतलं. लवकरच ते प्रेमात पडले आणि त्यांचं लग्न झालं.

काही काळानंतर हॉवर्डनं आपल्या वडिलांशी चर्चा करून आपलं उदरनिर्वाहाचं साधन बदलून विमा एजंट व्हायचं ठरवलं. हॉवर्डची विचारसरणी उजवी म्हणजेच रिपब्लिकन पक्षाच्या विचारसरणीशी जुळणारी होती. त्याच्याशी जुळवून घेत डाव्या म्हणजेच डेमोक्रॅटिक पक्षाच्या विचारसरणीच्या लैलानंही रिपब्लिकन पक्षाला पाठिंबा द्यायचं ठरवलं. शिवाय लैला आता खूप धार्मिक कामांमध्ये गुंतायची. १९२८साली त्यांच्या घरात डोरिस इलिनॉर नावाची पहिली मुलगी जन्माला आली. दुर्दैवानं काही महिन्यांमध्येच लैलाच्या बहिणीलासुद्धा आपली आई आणि आजी यांच्यासारखा मानसिक आजार जडला; पण नशिबानं लैलामध्ये अजून तरी अशी लक्षणं दिसत नव्हती.

१९२०च्या दशकात अमेरिकेमध्ये सगळीकडे धामधुमीचं वातावरण होतं. शेअरबाजार नवे उच्चांक गाठत होता. त्याच यशावर स्वार होण्यासाठी म्हणून हॉवर्ड बफेनं १९२७ साली एका बँकेमध्ये शेअरदलालाचं काम स्वीकारलं. पण त्याचे हे उत्साहाचे बुडबुडे जेमतेम दोन वर्षं टिकल्यावरच २९ ऑक्टोबर, १९२९ या Black Tuesday म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

ऐतिहासिक दिवशी शेअरबाजार कोसळला. त्यानंतर ही पडझड सुरूच राहिली. हॉवर्डवर नव्यानं काम शोधायची पाळी आली. या दरम्यान ३० ऑगस्ट, १९३० या दिवशी हॉवर्ड आणि लैला यांना वॉरन एडवर्ड नावाचं दुसरं पुत्ररत्न प्राप्त झालं. नियोजित कालावधीपेक्षा लवकर म्हणजे पाच आठवडे आधी जन्माला येऊनसुद्धा वॉरनचं वजन सहा पौंडांचं होतं. हॉवर्डनं परत एकदा आपल्या वडिलांच्या किराणा मालाच्या दुकानात काम करण्याचा प्रयत्न केला. पण ते शक्य नसल्याचं हॉवर्डला त्याच्या वडिलांनी सांगितलं. दरम्यान अमेरिकेतील बँका धडाधड बंद पडत होत्या. नंतरच्या काळात 'ग्रेट डिप्रेशन' म्हणून ओळखलं गेलेलं जागतिक महामंदीचं भीषण संकट अमेरिकेवर कोसळलं होतं. बँका बुडायच्या आधी त्यातले आपले पैसे काढून घेण्यासाठी लोक धडपडत होते. आपल्या नवऱ्याला आणि मुलांना पोटभर खायला मिळावं म्हणून कित्येकदा लैला उपाशीच राही. अशा परिस्थितीमध्ये हॉवर्ड बफे आणि त्याचे दोन सहकारी यांनी मिळून चक्क शेअर दलालीचा व्यवसाय सुरू करायचं ठरवलं. शेअरबाजारात आणि एकूणच अर्थकारणात विलक्षण मंदी सुरू असताना त्यांनी घेतलेला हा निर्णय अत्यंत धाडसी होता. पण आश्चर्य म्हणजे सगळीकडे बाजार कोसळत असताना आपल्याकडे शिल्लक असलेले थोडेफार पैसे नक्की कुठे गुंतवायचे? असा प्रश्न पडलेल्या अनेक लोकांनी हॉवर्ड बफेमार्फत सुरक्षित प्रकारची गुंतवणूक करायचा निर्णय घेतला. पहिल्याच महिन्यात हॉवर्ड बफेला ४०० डॉलर्सची कमाई झाली. यामधली एक गंमत म्हणजे ओमाहामधल्या रोटरी क्लबचा अध्यक्ष असलेला अर्न्स्ट बफे म्हणजे हॉवर्डचा पिता होता. त्यानं आपल्या क्लबमधल्या सगळ्या सदस्यांना 'माझ्या मुलाला गुंतवणुकीच्या संदर्भातलं काहीही समजत नसल्यामुळे त्याच्याकडे तुमचे पैसे गुंतवायला अजिबात देऊ नका!' असा इशारा देऊन ठेवला होता. असं असूनही हळूहळू हॉवर्ड बफेच्या व्यवसायाचं चांगलं बस्तान बसत असतानाच अचानकपणे त्याला हृदयरोग जडल्याचं निदान डॉक्टरांनी केलं. त्यामुळे हॉवर्डच्या कामकाजावर आणि हालचालींवर मर्यादा आल्या. दरम्यान वॉरन एकदम शांत मुलगा म्हणून ओळखला जायचा. चर्चमध्ये आपल्या आईबरोबर गेलेला असताना तो न कंटाळता तिथे दोन ताससुद्धा सहजपणे बसून राही. निळसर डोळ्यांचा, लालसर गालांचा वॉरन कोणाशी फारसा बोलतही नसे.

अमेरिकेवरच्या या आर्थिक महासंकटाच्या काळात फ्रँकलिन

रूझवेल्टची राष्ट्रपतिपदी निवड झाली. रूझवेल्टनं अनेक सार्वजनिक कल्याणकारी कार्यक्रम हाती घेऊन अमेरिकेमधल्या मंदीच्या आणि बेकारीच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करायचे जोरदार प्रयत्न केले. कडव्या उजव्या विचारसरणीच्या हॉवर्ड बफेला हे अजिबात आवडायचं नाही. रूझवेल्ट अमेरिकेचं खूप नुकसान करत असल्याचं त्याचं मत झालं होतं. त्याविषयी तो रागारागानं बोलत असे. त्या काळात 'गोल्ड स्टँडर्ड' नावाची संकल्पना अर्थकारणामध्ये अस्तित्वात होती. तिचा सोपा अर्थ म्हणजे सरकारला आपल्याकडे जितकं सोनं असेल तितक्याच प्रमाणात म्हणजे ठरावीकच पैसे छापायची परवानगी असे; पण १९२९ साली सुरू झालेल्या जागतिक महामंदीनंतर सगळीकडे बेकारीचं वातावरण पसरल्यामुळे रूझवेल्टनं ही पद्धत बंद करून टाकली. साहजिकच अमेरिकेला आता पूर्वीच्या तुलनेत खूप जास्त प्रमाणात डॉलर्स अर्थव्यवस्थेमध्ये आणणं शक्य झालं. यामुळे हॉवर्ड बफे खूप भडकला. रूझवेल्टनं डॉलर या चलनाच्या ताकदीची पूर्ण वाट लावली असल्याचं त्याचं पक्कं मत झालं. तसंच गरज नसताना रूझवेल्टनं अर्थव्यवस्थेमध्ये खूप डॉलर्स आणल्यामुळे डॉलरची किंमत घटणं याचाच अर्थ वस्तूंच्या किमती वाढणं आणि सगळीकडे महागाईचं थैमान सुरू होणं, या गोष्टी घडणारच याची हॉवर्ड बफेला खात्री वाटत होती. त्यामुळे त्यानं आपल्याकडचे डॉलर्स खर्चून काही वस्तू विकत घेणं, अन्नधान्याचा साठा करून ठेवणं, असे प्रकारही केले. काही दशकांनंतर डॉलरच्या घटणाऱ्या प्रभावाविषयी हॉवर्ड बफेचा मुलगा वॉरन यालासुद्धा अशाच प्रकारची काळजी वाटली होती, यात अर्थशास्त्राच्या ज्ञानाबरोबरच आनुवंशिकतेचाही संबंध असावा!

बफे कुटुंबात राजकारण, पैसा, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांवर चर्चा चाले; पण त्या सगळ्या चर्चाही प्रचंड कोरडेपणाच्या वातावरणात चालत असत. अगदी लहान मुलांशीसुद्धा प्रेमानं, लाडानं बोलायची पद्धत नसे. बाहेरून लोकांना बफे कुटुंबामधलं वातावरण एकदम चांगलं वाटत असे; पण लैलाला मात्र तिच्या मानसिक आजारांनी भंडावून सोडलं होतं. लैला आपला नवरा हॉवर्डसमोर एकदम शांत असली, तरी आपल्या मुलांवर मात्र ती मधूनच कुठलंही कारण नसताना प्रचंड भडके. त्यानंतर कित्येक तास शांत न होता, ती त्यांच्याशी जवळपास क्रूरपणे वागे. अशा परिस्थितीमध्ये आपण काय करायचं हे बिचाऱ्या वॉरनला आणि त्याच्या भावंडांना अजिबात

कळत नसे. त्यामुळे ती सगळी मुलं निमूटपणे लैलाचा त्रागा सहन करत. लैला कामही भरपूर करे. पण त्याचबरोबर ती अनपेक्षितपणे वारंवार संतापेही. तासन्‌तास मुलांची खरडपट्टी काढून, त्यांना अत्यंत अपमानास्पद भाषेमध्ये हिणवून, त्यांच्या रडण्याची पर्वा न करता ती तावातावानं बोलतच राही. मुलांच्या पूर्वीच्या चुका, त्यांनी कधीच न केलेल्या चुका, जुने तसंच कित्येकदा काल्पनिक प्रसंग या सगळ्यांचा त्यात समावेश असे. वॉरन आणि त्याची भावंडं आपल्या आईच्या या महाविचित्र वागण्यासंबंधी वडिलांशी म्हणजे हॉवर्डशी बोलत नसत. हॉवर्डला हा सगळा प्रकार माहीत असायचा. कित्येकदा हॉवर्डच आपल्या मुलांना 'तुमची आई आता युद्ध सुरू करण्याच्या बेतात आहे.' अशा शब्दांमध्ये त्याचा इशारा द्यायचा. हॉवर्ड घरी असताना मात्र लैला कधीच आपल्या मुलांवर तुटून पडत नसल्यामुळे मुलांना त्याचा खूप आधार वाटायचा. लैलाच्या पोटी जन्मलेल्या तीन अपत्यांपैकी दोन मुलींमध्ये वॉरन दुसरा होता.

आर्थिक महामंदीचा विळखा आणखी वाढत चाललेला असतानाच दुसरीकडे त्या सुमारास ओमाहामधलं हवामानही विचित्र झालं होतं. दुष्काळानं थैमान माजवलेलं असतानाच १९३४ सालच्या उन्हाळ्यात तापमान थेट ४८ अंश सेल्सियसवर गेलं! लोक आपल्या घरांमध्ये झोपूसुद्धा शकायचे नाहीत. त्यामुळे ते उघड्यावर बागांमध्ये किंवा घराबाहेरच्या जागेत झोपायचे. वॉरन आपल्या घरातल्या दुसऱ्या मजल्यावरच्या खोलीत सगळ्या बाजूंनी ओल्या केलेल्या चादरींच्यामध्ये झोपायचा निष्फळ प्रयत्न करायचा. हे कमी म्हणून की काय त्या वर्षी प्रचंड मोठी टोळधाड आली. धान्यांपासून अनेक वस्तू फस्त करणारे हे टोळ नंतर एकमेकांनाही खायचे. आणि त्यांच्या जाडसर थरामुळे रस्त्यातून जाणाऱ्या वाहनचालकाला पुढचं काही दिसेनासं होत असे. प्रचंड वेगानं वादळं यायची आणि सगळीकडे खूप धूळ पसरवूनच थंडावायची.

दरम्यान आजूबाजूची आर्थिक परिस्थिती बिकट असूनसुद्धा आपल्या शेअर दलालीच्या व्यवसायात चांगली भरारी मारून हॉवर्ड बफेनं बरीच प्रगती साधली होती. त्यानं एक नवं घर बांधलं आणि ऐटदार मोटारगाडीही घेतली. तसंच रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणातही तो हळूहळू सक्रिय होत होता. या काळात लैलाचा तरुण भाऊ अचानकपणे कर्करोगानं दगावला आणि तिच्या वडिलांना पक्षाघाताचा दुसरा भयानक झटका आला. तरीही लैलानं आपला

संसार नेटानं सुरू ठेवला. त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये चांगल्या अर्थानं बदल झाले असले, तरी लैलानं आपल्या मुलांना नेहमीच काटकसरीची सवय लावली.

बालवाडीत जाणाऱ्या वॉरनला लहानपणापासून आकड्यांविषयी प्रचंड आकर्षण होतं. वेळ मोजण्यामध्ये शक्य तितकी अचूकता यावी, म्हणून सेकंदांचाही वापर करता येतो, या संकल्पनेनं त्याला कित्येक दिवस अचंबित केलं होतं. त्यातूनच त्यानं खेळायच्या गोट्या वापरून आपल्या अंघोळीच्या टबमध्ये खेळता येण्यासारखा एक अतिशय सोपा खेळ तयार केला आणि तासन्‌तास तो त्यात रंगून जायचा. एका वेळी अनेक गोट्या पाण्याच्या दिशेनं सोडायच्या आणि त्यामधली कुठली गोटी सगळ्यात आधी पाण्याला स्पर्श करेल हे बघायचं, असा तो खेळ असायचा. वरवर हा खेळ अतिशय साधा वाटला, तरी अनेक शक्यतांपैकी नक्की कुठली शक्यता प्रत्यक्षात खरी ठरेल, याविषयीचे अंदाज बांधायची विचारसरणी नंतरच्या काळात यामधूनच आपल्याला साध्य होत गेल्याचे वॉरन सांगतो. तसंच कुठल्याही गोष्टीविषयी शक्य तितकी माहिती गोळा करून त्यामधून वेगवेगळ्या गोष्टींसंबंधीचे अंदाज बांधायची सवयही वॉरनला लागत गेली.

शाळेत जायला लागल्यावर आपल्या आईच्या भीतिदायक रागापासून आपली दिवसभर सुटका झाल्याचा वॉरनला आनंद होत असे. तिथे त्याला नवे मित्र मिळाले. आपल्या आईपासून सुटका करून घेण्यासाठी वॉरन शेजारपाजारच्या मित्रांच्या घरी जास्त वेळ राहायचा प्रयत्न करे. त्या मित्रांच्या आई-वडिलांशीही तो राजकारणापासून अनेक विषयांवर गप्पा मारे. शाळा सुटली की, एका मित्राच्या घराच्या व्हरांड्यामध्ये बसून एका वहीमध्ये ही मुलं तिथून जाणाऱ्या प्रत्येक गाडीच्या लायसेन्स प्लेटवरचा क्रमांक टिपून घ्यायची. त्यातून कुठली अक्षरं आणि कुठले आकडे सगळ्यात जास्त वेळा सापडतात अशांसारख्या गोष्टींचा वॉरन अभ्यास करत असे. त्याच्या कुटुंबीयांना त्याच्या या छंदाचं कुतूहल वाटे; पण त्यांना वॉरन आणि त्याचा मित्र यांच्या या छंदामागचं खरं रहस्य माहीतच नव्हतं. या मित्राच्या घराजवळच एक बँक होती. कधी तिच्यावर दरोडा पडला, तर कुठकुठली वाहनं त्या काळात येऊन गेली ही माहिती आपण नाट्यमयरीत्या पोलिसांना पुरवू शकू असं वॉरन आणि त्याचा मित्र यांना वाटत होतं! लवकरच वॉरनला टपालाची तिकिटं तसंच नाणी गोळा करण्याचेही छंद लागले. याशिवाय

वर्तमानपत्रांमध्ये तसंच बायबलमध्ये कुठली अक्षरं सगळ्यात जास्त वेळा आहेत, हे मोजायचा नादही त्याला लागला. तसंच शीतपेयांच्या वापरून टाकलेल्या बाटल्यांची बुचंही तो जमवत असे. रोज रात्री जेवण झाल्यावर वर्तमानपत्रांचे कागद रचून त्यावर ही बुचं वॉरन पसरायचा. त्यानंतर या बुचांची वर्गवारी करणं आणि प्रत्येक प्रकारची किती बुचं जमली आहेत, हे मोजणं हा आपला आवडता उद्योग तो करायचा. यातून कुठलं शीतपेय सगळ्यात जास्त लोकप्रिय असलं पाहिजे, याविषयीचे अंदाज तो बांधायचा. या सगळ्या कामातून त्याला खूप समाधान मिळायचं आणि शांत वाटायचं, हे सगळ्यात महत्त्वाचं होतं. काही काळानंतर वॉरनला १९३९ सालचा एक माहितीकोश मिळाला. त्याच्या वाचनामध्ये वॉरन आता तासन्तास गुंगून जाई. सगळ्या गावांची लोकसंख्या पाठ करणं, हा वॉरनचा त्यातही सगळ्यात आवडता उद्योग झाला. याच काळात काही वैद्यकीय अडचणींमुळे वॉरनचं अपेंडिक्स फुटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती; पण नशिबानं अगदी वेळेत ही गोष्ट लक्षात आल्यामुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करणं शक्य झालं आणि तो बचावला. तिथल्या नर्सला त्यानं 'मी आत्ता फारसा श्रीमंत नसलो, तरी एक दिवस प्रचंड श्रीमंत होणार आहे आणि तू माझा फोटो वर्तमानपत्रात छापून आल्यावर बघशीलच!' असं सांगून टाकलं होतं. यानंतर वॉरनच्या आजोबांनी त्याला एकदा पाऊणतास चाललेल्या बेसबॉलच्या एका सामन्याला नेलं आणि बेसबॉलच्या सामन्यांची आकडेवारी असलेलं एक पुस्तक दिलं. ते बघून वॉरन हरखूनच गेला. त्यानं त्या पुस्तकामधली सगळी आकडेवारी तोंडपाठ करून टाकली.

आपल्या वयाच्या सहाव्या वर्षी वॉरनला छोटासा व्यवसाय करून बघायचं वेड लागलं. त्यामुळे त्यानं च्युईंगगम विकून थोडीफार कमाई केली. संध्याकाळी घरोघरी जाऊन वॉरन या च्युईंगगम्स विकत असे. त्यानंतर त्यानं कोकाकोलाच्या बाटल्याही विकून पाहिल्या. याशिवाय तो वर्तमानपत्रं टाकायचं कामही करे. एकदा वॉरन आणि त्याचा एक मित्र या दोघांनी मिळून जवळच्या एका गॉल्फ कोर्सच्या बाहेर गॉल्फचे चेंडू विकायचा उद्योग सुरू केल्यावर कुणीतरी पोलिसांकडे त्यांची तक्रार केली. त्यामुळे पोलिसांनी वॉरन आणि त्याचा मित्र यांना हा उद्योग बंद करायला तर लावलाच; शिवाय वॉरनच्या पालकांनाही याविषयीची माहिती दिली. पण आपल्या मुलाच्या या उद्योगाविषयी त्यांना फारशी काळजी वाटली नाही. उलट तो इतरांपेक्षा

काहीतरी वेगळं करतो आहे म्हणून त्यांना या गोष्टीचं कौतुकच वाटलं.

काही काळ उलटून गेल्यानंतर वॉरननं आपल्या वडिलांच्या शेअर दलालीच्या व्यवसायामध्ये रस घ्यायला सुरुवात केली. तो त्यांच्या कार्यालयात जाऊन बसे. तिथे वेगवेगळ्या शेअर्सच्या किमती इलेक्ट्रॉनिक पद्धतीनं एका पट्टीवर सरकत जायच्या. तिथेच वॉरनचे दोन चुलत आजोबा यायचे; त्यांचं एकमेकांशी कितीही वैर असलं, तरी ते शेजारी बसून शेअर्सविषयीची आपली परस्परविरोधी मतं व्यक्त करत राहायचे. वॉरन हे सगळं शांतपणे ऐकून घेत असे. या आजोबांची मतं आणि शेअर्सच्या किमती यांच्यामध्ये कसलाच संबंध नसल्याचं त्याच्या लवकरच लक्षात आलं. त्यामुळे शेअर्सच्या किमती नक्की कशामुळे आणि किती प्रमाणात बदलतात याविषयी अंदाज बांधण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू झाले. यातून कसला 'पॅटर्न' हाती लागतो का, हे शोधायचं त्यानं ठरवलं. वयाच्या अकराव्या वर्षी वॉरननं 'सिटीज सर्व्हिस' या कंपनीचे तीन शेअर्स स्वत:साठी आणि तीन शेअर्स आपल्या बहिणीसाठी विकत घेतले; प्रत्येकी ३८.२५ डॉलर्सना विकत घेतलेल्या या शेअरची किंमत त्यानंतर घसरून २७ डॉलर्सवर आली. याप्रसंगी घाबरलेल्या वॉरननं हे शेअर्स न विकता त्यांची किंमत पुन्हा प्रत्येकी ४० डॉलर्सवर जाईपर्यंत वाट पाहिली आणि या किमतीवर नाममात्र नफा कमावून हे शेअर्स विकून टाकले. नंतर या शेअरची किंमत थेट २०२ डॉलर्सवर गेल्याचं वॉरनला हताशपणे बघावं लागलं. गुंतवणुकीच्या विश्वातला हा त्याला मिळालेला पहिला अनुभव होता.

यातून वॉरन तीन धडे शिकला. पहिला धडा म्हणजे, कुठलाही शेअर विकत घेण्यासाठी आपण किती पैसे खर्च केले आहेत; याकडे एका मर्यादेपलीकडे लक्ष देऊ नये. दुसरा धडा म्हणजे, थोडा नफा कमावण्याच्या नादात आपल्याकडचे चांगल्या कंपन्यांचे शेअर्स तडकाफडकी विकू नयेत. तिसरा धडा म्हणजे, इतर लोकांचे पैसे आपण गुंतवले आणि त्यात त्यांना नुकसान सोसावं लागलं, तर त्यांना हा मोठाच फटका असतो. त्यामुळे जोपर्यंत आपल्याला यशाची खात्री नसेल, तोपर्यंत आपण किमान इतरांचे पैसे तरी नक्कीच गुंतवू नयेत.

अगदी लहानपणीच वॉरननं लवकरात लवकर भरपूर पैसे कमावण्याचा ध्यास बाळगला होता. पण यामागे छानछोकीचं आयुष्य जगणं किंवा मौजमजा करणं, असे हेतू नव्हते. वॉरनला पैशांमधून आपलं स्वातंत्र्य

कमवायचं होतं. आपल्या गाठीशी एकदा पुरेसे पैसे जमा झाले की, त्यानंतर आपल्याला पैसे कमावण्यासाठी काम करावं लागणार नाही, याची जाणीव झाली होती. हे स्वातंत्र्य त्याला शक्य तितक्या लवकर हवं होतं. कुणासाठी काम करत राहणं किंवा दुसऱ्या माणसांच्या तालावर नाचणं त्याला नको होतं.

१९२९ साली सुरू झालेल्या जागतिक महामंदीनंतरच्या अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रपती फ्रँकलिन रूझवेल्ट यानं उचललेल्या पावलांमुळे अमेरिकेमधली परिस्थिती बिघडत चालली आहे, असं अनेक उजव्या विचारसरणीवाल्या लोकांचं मत होतं. त्यात अर्थातच वॉरनचा पिता हॉवर्ड बफे याचाही समावेश होता. त्यामुळे १९४२ साली अमेरिकन संसदेच्या 'हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज' या सभागृहाच्या निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षातर्फे उभं राहण्याचा निर्णय हॉवर्ड बफेनं घेतला. हे गाव डेमोक्रॅटिक विचारसरणीच्या गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांनी भरलेलं असल्यामुळे हॉवर्ड बफे जिंकणं जवळपास अशक्यच होतं. तरी हॉवर्ड बफेनं गावामधल्या जवळपास प्रत्येक मतदाराची वैयक्तिक पातळीवर भेट घेण्याची करामत करून दाखवली आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो निवडून आला. खरं म्हणजे ही अत्यंत कौतुकास्पद आणि मानाची गोष्ट असली, तरी १२ वर्षं वय असलेल्या वॉरनला आपल्या वडिलांबरोबर ओमाहा गाव सोडून वॉशिंग्टनमध्ये जायच्या कल्पनेनं कससंच झालं. त्याला काहीही करून ओमाहामध्येच राहायचं होतं. त्यासाठी त्यानं अनेक नाटकं करून बघितली. त्यानंतर काही काळातच वॉरननं आपले आजोबा अर्न्स्ट यांना पत्र लिहून ओमाहामध्ये परत यायची आपली इच्छा असल्याचं कळवलं. नशिबानं त्यांनी वॉरनचं म्हणणं ऐकून त्याला आपल्याबरोबर काही महिने राहण्यासाठी बोलावून घेतलं. शिकण्याबरोबरच वॉरननं आजोबांच्या किराणामालाच्या दुकानात काम करायला सुरुवात केली. यामागे दुसरं एक कारणसुद्धा होतं. त्या वयातल्या नैसर्गिक भावनांनुसार वॉरनला एकापाठोपाठ एक अशा दोन मुली आवडल्या होत्या. पण त्या दोन्ही मुलींनी त्याला साफ उडवून लावलं. याचं नैराश्य घालवण्यासाठी वॉरनला आपण कशात तरी बुडून जावं असं वाटत होतं. त्यासाठी पैसे कमावणं हा चांगला मार्ग आहे, असं त्याला वाटायचं. दरम्यान अमेरिकेमधली आर्थिक परिस्थिती किती बिकट आहे, ही गोष्ट वॉरनच्या मनावर ठसवण्यासाठी त्याच्या आजोबांनी त्याला मिळणाऱ्या बेताच्या पगारातून दोन सेंट्स कापून घ्यायचं ठरवलं. वॉरनला त्याचं फारसं

काही वाटलं नसलं, तरी दुकानातल्या भाज्यांच्या आणि फळांच्या वासानं त्याला नकोसं होत असे. आजोबा आपल्याला चांगलंच राबवून घेतात आणि त्याच्या मोबदल्यात आपल्याला काहीच पैसे देत नाहीत, असंही वॉरनला वाटत असे. त्यांच्या तावडीतून निसटण्यासाठी तो सतत धडपडत असे. अगदी फुटकळ कामं करावी लागत असल्यामुळे आपल्याला इथे काहीही शिकायला मिळत नाही, असंही त्याला सतत वाटत असे. तरीही वॉशिंग्टनपेक्षा हे बरं असं म्हणून तो स्वत:ची समजूत काढत असे.

वॉरन आपल्या आजोबांबरोबर राहत असताना काही मजाही घडायच्या. उदाहरणार्थ, अर्न्स्टनं त्या काळात How to Run a Grocery Store and a Few Things I Learned About Fishing या अत्यंत विचित्र नावाचं एक पुस्तक लिहायला घेतलं. ते नक्कीच 'बेस्टसेलर' ठरेल, अशी त्याला खात्री वाटायची. तसंच Gone With the Wind सारखं पुस्तक कोण वाचणार, असंही अर्न्स्टचं मत होतं. त्यामुळे आपण लिहित असलेलं पुस्तकच सगळ्यांना खूप आवडेल, अशी त्याला खात्री वाटे. दररोज रात्री दुकानात वापरून झालेल्या हिशेबाच्या वह्यांच्या मागच्या कोऱ्या बाजूवर अर्न्स्टनं सांगितलेला पुस्तकाचा पुढचा भाग लिहून घ्यायची जबाबदारी वॉरनवर असे. हे काम करताना वॉरनला गंमत वाटायची; पण काही महिने उलटल्यावर मात्र त्याला आपल्या आई-वडिलांपाशी वॉशिंग्टनला परतावं लागलं. तिथे पोहोचल्यावर वैतागून त्यानं एकदा घरातून पळून जायचाही प्रयत्न केला!

वॉशिंग्टनमध्ये मोठ्या जिद्दीनं वॉरननं वर्तमानपत्रांच्या वाटपांचा उद्योग सुरू केला. लवकरच त्याला ५०० वर्तमानपत्रं टाकण्याचं काम मिळालं. हे काम शक्य तितक्या वेगानं आणि चुका होऊ न देता व्हावं, यासाठी वॉरननं आपल्या कामात अनेक प्रकारच्या युक्त्या योजल्या. उन्हाळ्याच्या सुट्टीत आपल्या कुटुंबाबरोबर ओमाहामध्ये परत आलेला असताना त्यानं वर्तमानपत्रं वाटपाचं हे काम आपल्या एका मित्रावर सोपवलं होतं. या कामात चांगलं यश मिळाल्यामुळे वर्तमानपत्रांमध्ये त्यानं नियतकालिकांची भर टाकली. कधीकधी भाड्यानं घर घेतलेली माणसं बिल न देताच घर सोडून जायची आणि त्यामुळे वॉरनचं नुकसान व्हायचं. ते टाळण्यासाठी त्यानं वेगवेगळ्या इमारतींमध्ये लिफ्टमनचं काम करणाऱ्या मुलींना एक वर्तमानपत्र मोफत द्यायला सुरुवात केली. त्याच्या मोबदल्यात या मुली वॉरनला कोण घर सोडणार आहे, याविषयीची माहिती आधीच पुरवायच्या आणि त्याला त्या

लोकांकडून आपलं बिल वसूल करता यायचं. १९४४ साली वॉरननं आपला पहिला 'इन्कम टॅक्स रिटर्न' भरला. त्यासाठी त्यानं ७ डॉलर्सचा कर सरकारकडे भरला. त्या वेळी आपल्या व्यावसायिक खर्चामध्ये घड्याळ तसंच सायकल या गोष्टी दाखवून करात सूट मिळवली. आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत वॉरननं १००० डॉलर्स जमवून दाखवले!

एकीकडे वॉरन असं यश मिळवत असला तरी दुसरीकडे १९४४च्या सुमाराला शिक्षणात आणि इतर बाबतींमध्ये वॉरननं चांगलेच 'दिवे' लावले होते. त्याला परीक्षांमध्ये चांगले गुण तर मिळेनातच; पण काही मित्रांच्या संगतीत तो चक्क भुरट्या चोऱ्या करायला लागला होता. खेळाचं साहित्य विकणाऱ्या एका दुकानातून वॉरन आणि त्याचे काही मित्र बरेच दिवस गॉल्फ खेळासाठी लागणारं साहित्य चोरायचे. ते स्वत: गॉल्फ खेळायचेही नाहीत; तसंच ते त्याचा काही उपयोग करायचे नाहीत, पण निव्वळ मजा म्हणून हे प्रकार सुरू होते. इतकी वर्षं शहाण्या मुलासारख्या वागणाऱ्या वॉरनला काय झालं, हे त्याच्या घरच्या मंडळींना समजेना. हा सगळा प्रकार त्यांना अविश्वसनीय वाटत होता. तरीही त्यांनी त्याला पाठिंबा दिला. वॉरनच्या शिक्षकांनी मात्र हा मुलगा वाया गेला असल्याचं मत व्यक्त करून टाकलं. पण अशा वेळी आपल्या पाठीशी उभे राहणारे आई-वडील आपल्याला मिळाल्याचा आयुष्यामध्ये खूप उपयोग झाला, असं मत वॉरननं नंतर व्यक्त केलं. वॉरनमध्ये कसलीच सुधारणा न दिसल्यावर त्याच्या वडिलांनी त्याला शांतपणे आपल्या वागण्यात आणि शालेय कामगिरीमध्ये सुधारणा करायला सांगितलं. या 'पराक्रमांपोटी' वॉरन त्याच्यामधली सगळी क्षमता वाया घालवत असल्यामुळे आपल्याला निराश वाटतं, असं ते कुठलाही त्रागा न करता म्हणाले होते. त्यानंतरही वॉरनमध्ये सुधारणा झाली नाहीतर त्याचं वर्तमानपत्र वाटपाचं काम बंद करायचं असं त्यांनी ठरवलं होतं. त्यामुळे मात्र वॉरनला खूप वाईट वाटलं. आपल्या वडिलांची मान खाली जावी असं कृत्य आपल्या हातून घडलं असल्याची बोच त्याला लागली आणि त्यानं जिद्दीनं आपल्यात बदल करून दाखवायचा निर्धारच स्वत:च्या मनाशी केला.

**५वी आवृत्ती**

# बकुळा

मूळ लेखिका
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




ती आपल्या प्रत्येक पत्राच्या घडीत एक नाजूकसं बकुळीचं फूल त्याला आठवणीनं पाठवायची. तिचं पत्र आलं की, श्रीकांतच्या हृदयात एक अनामिक हुरहूर दाटून यायची. हातात ते बकुळीचं फूल घेऊन तो गोड आठवणींमधे रमून जायचा. जणू काही आत्ता श्रीमतीच आपल्या अगदी निकट येऊन उभी राहिली आहे, असा त्याला भास व्हायचा.

तिचं सौम्य वागणं, तिच्या आसपास दरवळणारा मंद सुगंध, तिच्या स्वभावातला तो साधेपणा आणि तिच्या डोळ्यांतून ओसंडून वाहणारं निर्मळ प्रेम. तिच्या व्यक्तिमत्त्वाला कुठेही अहंकाराचा स्पर्शसुद्धा नव्हता. तिच्या प्रत्येक पत्रातून येणारं एकेक फूल त्यानं जमा केलं होतं. एका छोट्याशा पिशवीत अशी कितीतरी फुलं जमा झाली होती. ती पिशवी रोज त्याच्या उशीखाली दडलेली असायची. प्रत्येक पत्र त्याच्याकरता एक नवी उमेद घेऊन यायचं. या बकुळीच्या फुलाची साथसंगत आपल्याला जन्मभर असणार आहे, ही उमेद!

सुधा मूर्ती यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीतील भावपूर्ण कलाविष्कार!




# नावीन्याच्या शोधात

कर्तबगारीच्या प्रदेशात सफरीला निघालेल्या महिलांसाठी दिशादर्शिका!




मूळ लेखिका : मार्शिया रेनॉल्ड्स

अनुवाद : सुमिता बोरसे

# प्रस्तावना

हे पुस्तक तुमच्यासारख्या सतत नव्या गोष्टींच्या शोधात असलेल्या महिलांसाठी आहे. नव्या जमान्याच्या कर्तबगार महिलांचे प्रतिनिधित्व तुम्हीच करता. पंचवीस वर्षांपूर्वी व्यवस्थापक मंडळातील पद संपादन करण्यास तुम्हीच सुरुवात केली. तुमच्याआधी आलेल्या सर्व महिलांपेक्षा तुम्ही फार वेगळ्या आहात. तुमच्याकडे अधिक आत्मविश्वास, सकारात्मकता असून तुम्ही अधिक क्रियाशील आहात. तुम्ही आपल्या टेबलामागे लपण्यापेक्षा पुढे येऊन सातत्याने तुमची योग्यता, कार्यक्षमता सिद्ध करता. तुम्ही सातत्याने पाठपुरावा, मूल्यमापन, प्रात्यक्षिक करून, कॉर्पोरेट जगतात स्वत:चे स्थान निर्माण करीत मार्गक्रमण करीत असता. तुमचे व्यवस्थापक तुम्हाला कदाचित बंडखोर आणि स्पर्धक म्हणून लेबल लावू शकतात. तुम्ही मात्र स्वत:ला जीवन जगण्याच्या ऊर्मीने परिपूर्ण समजता. तुमच्या मते, तुम्ही कार्यक्षम आहात म्हणून केवळ तुमची निवड केलेली नाही, तर तुम्हाला विश्वात बदल घडवून आणण्यासाठी संधी देण्यात आलेली आहे. तुमची ही शैली तुम्हाला पूरक ठरण्याऐवजी जर त्रासदायक ठरत असेल, तर हा त्रास अधिक काळ सहन करावा लागत नाही. कारण जेव्हा तुम्हाला जाणीव होते, की तुम्ही तुमच्या क्षेत्रात काहीही करू शकत नाही, तेव्हा तुम्ही तेथून दुसऱ्या विभागात किंवा संस्थेत जाण्याची तयारी करता. किंवा तुम्ही स्वत:चा उद्योग सुरू करून जगात जास्त चांगले परिवर्तन घडविता येईल, असा निर्णय घेऊ शकता.

वरवर पाहता ही जीवनशैली रोमांचक वाटते. तुम्ही सुरू करीत असलेले प्रत्येक नवीन काम, नवीन नोकरी काहीतरी भव्यदिव्य करण्याच्या दृष्टीने सुरू करता. नंतर मात्र वास्तवाशी सामना होतो आणि नोकरीतून वा त्या विशिष्ट कार्यातून पदरी निराशाच येते. बहुधा तुम्हाला खुराड्यासारखी जागा दिली जाते, तुमच्या क्षमतेचा पुरेपूर वापर केला जात नाही, तुमच्यावर करडी नजर ठेवली जाते आणि तुम्हाला जरा धीर धरायला सांगितले जाते. तुमच्या करिअरमधील संभाव्य शक्यता बघण्यापेक्षा तेथून बाहेर पडण्याच्या योजना बनविण्यातच तुमचा वेळ खर्ची पडतो. उत्साही वृत्तीची जागा उपहासात्मक वृत्ती घेते. तुम्ही जेवढ्या जास्त प्रमाणात शोधक होता, तेवढ्या प्रमाणात तुम्ही तुमच्या जीवनध्येयाच्या जाणिवेपासून दूर जाता आणि स्वत:पासूनही दूर जाता.

एकोणचाळीस वर्षांची केली मला म्हणाली, ''माझ्याकडे आता पर्यायच शिल्लक नाहीत. मी खूप उत्साहाने आणि अपेक्षेने एखादे काम सुरू करते, नोकरीवर रुजू होते. पटपट बढत्या मिळविते आणि हे सर्व घडत असताना मध्येच कधीतरी मला 'हे सारे आता संपले, आता येथे काहीही करावेसे वाटत नाही', असे वाटायला लागते. काम अर्थहीन वाटायला लागते. मला जे हवं आहे ते देऊ शकत नसल्यामुळे माझा बॉस मला टाळण्यास सुरुवात करतो. तेव्हाच मी नोकरी सोडण्याची तयारी करते.'' मी केलीला विचारले, की स्वत:ला बदलण्यापेक्षा कधीतरी तिने ती काम करीत असलेली उद्योगसंस्था बदलण्याचा प्रयत्न केला आहे का? ती उत्तरली, ''मला ती लढाई नको आहे.''

गेली अनेक वर्षे मी उच्चपदस्थ महिलांना प्रशिक्षण देत आहे. माझ्या असे निदर्शनास आले आहे, की कर्तबगार महिला आणि जगभरातील माझ्या प्रशिक्षणवर्गात येणाऱ्या महिलांमधील वर्तणुकीत फार परिवर्तन झाले आहे. दरवर्षी माझ्यासोबत काम करीत असलेल्या महिला आधीच्या वर्षापेक्षा अधिक निर्भीड आणि आशावादी झालेल्या दिसून आल्या आहेत. त्याचबरोबर या महिला त्यांच्या भविष्याविषयी अधिकाधिक गोंधळलेल्या आणि चिंताग्रस्त असल्याचे दिसून आले आहे. माझ्या प्रशिक्षणार्थी महिलांना स्वत:ला समजून घेण्यासाठी आणि त्यांच्यासमोरील पर्याय समजून घेण्यासाठी मदत करू शकेल, असे काही आहे का, हे पाहण्यास मी सुरुवात केली; पण मला असे काहीही मिळाले नाही. व्यवस्थापकीय प्रशिक्षण कार्यक्रम आणि महिला विकसन कार्यक्रमांना अजूनही हा बदल पूर्णत: लक्षात आलेला नाही. प्रशिक्षण कार्यक्रम आणि स्व-उन्नतीची पुस्तके अजूनही महिलांनी कार्यालय आणि घर यांमध्ये समतोल कसा राखावा, आपले म्हणणे सर्वांसमोर कसे मांडावे आणि उद्योगसंस्थेतील उच्चपदापर्यंत कसे पोचावे, यांवरच केंद्रित आहेत. वर्तमानकाळातील माझ्या प्रशिक्षणार्थी महिलांना आपला आवाज कसा ऐकवायचा, हे शिकविण्याची गरज नाही. या सिंहिणींना गर्जना कशी करायची ते माहीत आहे. आयुष्यात समतोल कसा राखायचा, हे त्यांना नको आहे; सर्व कामाच्या धामधुमीत मन:शांती कशी मिळवायची, हा त्यांचा प्रश्न आहे. संस्थांतर्गत चालणाऱ्या राजकारणाशी त्यांना काहीही देणेघेणे नाही. त्यांना राबविता येतील असे अर्थपूर्ण प्रकल्प हवे आहेत किंवा चालविता येईल, असा उद्योग त्यांना हवा आहे. इतर काही

नाही; त्यांना केवळ इतकीच माहिती हवी आहे, की आयुष्याच्या शेवटी एकाकी न वाटता, बेजार न होता त्यांना आयुष्यात अशी कोणती अर्थपूर्ण कामगिरी करता येऊ शकेल?

हे परिवर्तन इतके जबरदस्त आहे की, याला क्रांती म्हणता येईल. मात्र अजूनही जे घडत आहे त्याला कोणीही नाव दिलेले नाही. तुम्हाला कल्पनाही नसेल, की हजारो महिला तुमच्यासारख्याच परिस्थितीतून जात आहेत, त्यांच्यासमोरही ज्वलंत प्रश्न आणि त्यांनाही इच्छा आहेत. तुम्हाला तुमच्या आयुष्यात जसे समाधान आणि मार्गदर्शन हवे आहे, तसेच त्यांनाही हवे आहे. त्यांच्यासारखीच आव्हाने इतर अनेक महिलांसमोरही आहेत, हे समजल्यावर माझ्या प्रशिक्षणार्थींना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांच्यासारख्याच अनेक जणी आहेत हे जाणून त्यांना खूप बरे वाटले. तुम्ही सर्व जणी मिळून ही क्रांती जगासमोर आणू शकता. याबाबतची जाणीव वृद्धिंगत व्हावी आणि ही प्रवृत्ती समजावी म्हणून मी पीएच.डी.साठी केलेल्या माझ्या संशोधनाचा उपयोग करणार आहे. आजच्या कर्तबगार महिला कार्यालयात काय करीत आहेत, ज्यामुळे त्या अत्युच्च कार्यकारी पदावर पोचू शकत नाहीत, या विषयावर मी संशोधन केले आहे. यामध्ये मी अमेरिकेतील माझ्या 'कर्तबगार महिला' या व्याख्येत बसणाऱ्या, वय वर्षे एकोणतीस ते बावन्न दरम्यानच्या शंभर महिलांच्या मुलाखती घेतल्या आहेत आणि सहजगत्या निवडून आणखी दहा महिलांच्या मुलाखती घेतल्या. यांपैकी निम्म्याहून अधिक महिला विवाहित होत्या आणि त्यांतील बहुसंख्य महिलांना मुले होती. थोडक्यात, मी अभ्यास केलेल्या महिलांमध्ये कुटुंबासहित राहत असलेल्या आणि एकट्याच राहणाऱ्या महिलांच्या संख्येत समतोल साधलेला आहे.

माझ्या सर्वेक्षणात आणि मुलाखतीमधून मला असे आढळून आले, की आजच्या महिलांना व्यवस्थापन मंडळात प्रभाव पाडण्यापेक्षाही उद्योगसंस्थेच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य करण्याची आंतरिक इच्छा पूर्ण करणे जास्त महत्त्वाचे वाटते. जरी त्यांनी कार्पोरेट जगतातील एक एक शिखर पादाक्रांत करावे, अशी त्यांची स्वत:ची आणि त्यांच्या हितचिंतकांची त्यांच्याकडून अपेक्षा असली, तरी त्यांना जीवनात हवी असलेली सार्थकतेची जाणीव व कार्पोरेट जगतातील यशाच्या पायऱ्या चढण्याच्या क्रियेची गती यांचा ताळमेळ बसत नाही. बऱ्याच वेळा त्या स्वत:च वरच्या पदासाठीच्या

शर्यतीतून अंग काढून घेतात. कारण आयुष्यात 'अधिक काही' करता येऊ शकते का, याचा त्यांना सातत्याने शोध घेण्याची गरज भासते.

महिलांच्या अस्वस्थतेतून त्या त्यांच्या करिअरबद्दलचे निर्णय घेत असतात आणि त्याबद्दल त्यांना आत्मविश्वास वाटत असतो, हीच खरी पंचाईत आहे. त्यांची 'अंतरात्म्याची चळवळ' त्यांच्याकडून खूप मोठमोठी कामे करवून घेते; मात्र न्यूनत्वाची बोच ठेवून जाते. त्या सातत्याने स्वत:च्या कामाचे मूल्य काय, त्यांच्या जीवनोद्देशाची व्याख्या काय, त्यांच्या स्वत्वाची खात्री काय आणि पत्नी, आई आणि बहीण म्हणून त्यांची भूमिका त्या योग्य रीतीने पार पाडत आहेत का, असे स्वत:लाच विचारीत असतात. तरीही त्या त्यांचे आयुष्य गतिमान ठेवण्याचे समर्थन करतात. हे पुस्तक लिहायला घेईपर्यंत या अशा महिलांच्या गटातील महिलांना मी 'भटक्या महिला' असे संबोधते आहे, हे माझ्या लक्षात आले नव्हते. त्यांना शारीरिकदृष्ट्या शक्य नसेल, तर मानसिकदृष्ट्या तरी गतिशील राहायचे असते. अशा रीतीने सतत गतिमान राहणे, ही त्यांची आंतरिक गरज असते. भौगोलिकदृष्ट्या त्या स्थलांतर करू शकत नसतील, तर त्या घरी अथवा कार्यालयात काही नवे प्रकल्प राबवितात आणि व्यापक विविधतेने स्वयंसेवक म्हणून जबाबदाऱ्या स्वीकारून आयुष्यात काहीतरी बदल घडवून आणू पाहतात. सातत्याने त्या परिपूर्णतेच्या शोधात असल्या, तरीही समाधान आणि मन:शांती काही त्यांना मिळत नाही. हे संशोधन पूर्ण केल्यानंतर माझ्या डोक्यात आलेला सर्वांत पहिला प्रश्न हा होता, की 'केवळ स्वत:चा बायोडेटा अधिक चांगल्या प्रकारे कसा सादर करायचा, यापेक्षा यश आणि आनंद दोन्ही गोष्टी मिळविता येण्यासाठी या महिलांना मी कशा प्रकारे मदत करू शकते?' या प्रश्नाचे उत्तर शोधणे हेच माझे पहिले काम होते.

तुम्हाला मार्गदर्शन आणि आधार मिळावा म्हणूनच मी हे पुस्तक लिहीत आहे. जगभरातील कर्तबगार महिलांसोबत वापरून ज्या पद्धतीची चाचणी करून झालेली आहे, अशी पद्धत मी तुमच्यासाठी आणि तुमच्यासारख्याच सामर्थ्यवान, हुशार आणि जीवन जगण्याच्या ऊर्मीने भरपूर असलेल्या भगिनींसाठी आणली आहे. माझ्या या व्यापक संशोधनासोबतच मला प्रत्येक महिलेला स्वतंत्रपणे प्रशिक्षण देण्याचा दशकांचा अनुभव आहे, तसेच बहुराष्ट्रीय उद्योगसंस्थांमध्ये नेतृत्वविकासाचे वर्ग घेण्याचादेखील अनुभव आहे. मी महिलांच्या परिषदांमध्येसुद्धा मार्गदर्शन करते, ब्लॉग आणि

टेलीसेमिनारमार्फतदेखील महिलांसोबत संवाद साधते. मला माझ्या संशोधनामुळे आणि अनुभवामुळे अधिक चांगली तंत्रे तुमच्यासमोर मांडणे शक्य झाले आहे. यासोबतच या पुस्तकातील उदाहरणांचा उपयोग करून तुम्ही ही तंत्रे उपयोगात आणू शकता.

मला आयुष्यात एक नेता, कर्मचारी, कर्तबगार महिला, कुटुंबातील सदस्य आणि इतरांनी लादलेल्या अपेक्षा व प्रमाणपद्धतींच्या विरोधात जिने एके काळी बंड पुकारले होते, अशी किशोरवयीन तरुणी म्हणून जे अनुभव मिळाले, त्यामुळे या पुस्तकातील स्वाध्याय आणि तंत्रे आधुनिक बनली आहेत. माझ्या आयुष्यातील या काळ्या कालखंडात मी जे धडे शिकले, त्यांनी मला आयुष्य पुन्हा नव्याने उभे करणे म्हणजे काय असते, त्याबद्दल एक आंतरिक समज दिली. माझ्या आयुष्यात मी स्वत:ची जी फसवणूक केली, तिचा सामना केल्याशिवाय मी जे संशोधन केले आहे, जी विद्वत्ता मिळविली आहे, जो अनुभव मिळविला आहे, त्यास महत्त्व प्राप्त होणार नाही. म्हणून या पुस्तकात माझीच गोष्ट तुमच्यासमोर मांडली आहे. तुम्ही स्वत:ची अशीच कठोर परीक्षा घ्यावी, अशी माझी अपेक्षा आहे. म्हणूनच मी माझा प्रवास तुमच्यासमोर ठेवणे मला अत्यंत महत्त्वाचे वाटते आहे. यशस्वी होण्यासाठी साध्या, सोप्या पायऱ्या सांगणाऱ्या पुस्तकानुसार तुम्ही जसे वागाल, त्यापेक्षा अधिक तीव्रपणे स्वत:च्या परिवर्तनाचा प्रवास करण्यास तुम्ही सज्ज व्हायला हवे. तुम्हाला यातून मिळणारे परिणाम अधिक काळ टिकणारे आणि समाधानकारक असतील, याची मी हमी देते.

माझे ते विशीतील ‘काळे दिवस’ संपल्यानंतर मी काही पदव्या, अनुभव आणि काही प्रमाणपत्रे मिळविली. त्यांच्या आधारे आणि माझ्या प्रशिक्षकाच्या अत्यंत अर्थपूर्ण अनुभवातून या पुस्तकातील बराचसा भाग आलेला आहे. कार्पोरेट जगतात माझी जागा प्रशिक्षक आणि संस्थात्मक विकासाच्या विभागात असायची. कर्मचारी वर्ग मोठ्या उत्साहाने प्रशिक्षण वर्गात सहभागी व्हायचा. हाच कर्मचारी वर्ग प्रशिक्षण संपवून नियमित काम करताना तेथे शिकलेली तंत्रे अत्यंत कमी प्रमाणात अमलात आणायचा, हे पाहून मी निराश होत असे. सन १९९५मध्ये नवीन तंत्रांचा शोध घेण्याकरिता मी स्वत: एका प्रशिक्षण वर्गात नाव नोंदविले. त्यामध्ये माझ्या एकदम लक्षात आले, की बाह्य वर्तणुकीत बदल घडून येण्यासाठी विचारसरणीत बदल घडून येणे अत्यंत गरजेचे असते. प्रशिक्षण देण्याच्या ध्यासापोटीच

'इंटरनॅशनल कोच फेडरेशन' (जागतिक प्रशिक्षक संघटना)ची स्थापना झाली. मी सन २०००मध्ये 'इंटरनॅशनल कोच फेडरेशन'च्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतली. यानंतर जगात 'मास्टर प्रशिक्षक' म्हणून प्रावीण्य मिळविणाऱ्या पहिल्या शंभर लोकांपैकी मी एक झाले. या संपूर्ण पुस्तकात मी तुम्हाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि परिवर्तन घडवून आणण्यासाठी तुम्ही प्रतिबद्ध राहावे, म्हणून अत्यंत प्रभावी प्रशिक्षण प्रश्न आणि तंत्रे गुंफली आहेत.

डॅनिअल गोलमॅन यांचे 'इमोशनल इंटेलिजन्स' हे पुस्तक १९९०च्या दशकाच्या शेवटी प्रसिद्ध झाले. या पुस्तकामुळे नवीन माहितीवर आपला मेंदू कशा प्रकारे प्रक्रिया करतो, यावरील संशोधनाकडे मी आकर्षित झाले. मला वाटले की, लोकांच्या बाह्य वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठी मी अत्यंत महत्त्वाची पायरी शोधली आहे. अधिक जाणून घेण्याची माझी तहान शांत करण्यासाठी मी औद्योगिक मानसशास्त्रात पीएच.डी. करण्याचे ठरविले. मी लिहिलेल्या प्रत्येक संशोधनात्मक लेखाने आयुष्यात निवडलेल्या पर्यायांबद्दल आणि माझ्या अन्य प्रशिक्षक असलेल्या प्रशिक्षणार्थी महिला सामोऱ्या जात असलेल्या अडचणींबद्दल मला अधिकाधिक खोलवर ज्ञान झाले, समज मिळाली. कर्तबगार महिला अनुभवत असलेले 'महानतेचे ओझे' समजून त्याची व्याख्या करण्यास माझ्या संशोधनात्मक अभ्यासाचा मला उपयोग झाला. त्यासोबतच गुणग्राहक संवादाच्या (प्रकरण ५ पहा.) पायऱ्या काय असाव्यात, हे ठरविण्यासाठी-देखील या अभ्यासाचा उपयोग झाला. या गुणग्राहक संवादाच्या मदतीने या महिला त्यांच्या आयुष्यात असलेल्या उत्तम गोष्टींचा, बाबींचा उपयोग करून त्यांच्यासमोरील अडचणी सोडवू शकतात. या पुस्तकाच्या ओघातील या अत्यंत निर्णायक पायऱ्या आहेत. माझ्या प्रबंधामुळे आजच्या कर्तबगार महिलांच्या गरजा काय आहेत, हे निश्चित करता आले. या पुस्तकात माझ्या संशोधनांतर्गत मला अनुभवायला मिळालेल्या सर्वांत दिव्यदृष्टी देणाऱ्या गोष्टी, विधाने आणि विषय मी तुमच्यासमोर ठेवल्या आहेत.

मार्गरिट व्हिटले यांच्या 'लीडरशिप अ‍ॅन्ड द न्यू सायन्स' या पुस्तकाचा शेवट पुन्हा एकदा वाचल्यावर मी ठरविले, की मला आलेला संशोधनाबद्दलचा अनुभव माझ्या प्रशिक्षणार्थी महिलांसमोर ठेवण्यापलीकडेदेखील काही करण्याची गरज आहे. व्हिटले यांनी समाजाच्या

आधाराच्या गरजेचे वर्णन केले आहे. त्या म्हणतात, ''आपल्याला हवे असलेले जग निर्माण करण्यासाठी आणि शोधण्यासाठी आपण एकमेकींसाठी सर्वोत्तम आशेचा किरण ठरू शकतो.'' बऱ्याचशा प्रशिक्षक प्रशिक्षणार्थी महिला या एकट्यानेच काम करीत असतात. क्वचितच त्या त्यांच्या संस्थेतील इतर महिलांना भेटतात. एखाद्या औपचारिक कामानिमित्त इतर महिलांना त्यांनी भेटणे अनिवार्य असेल, तरच त्या भेटतात. व्हिटले यांना वाटते, की तुम्ही केवळ एकत्र यायचे इतकेच नाही, तर तुम्ही एकमेकींशी संवाद साधावा, एकमेकींच्या कल्पना आणि काही प्रयोग केले असल्यास एकमेकींना सांगावेत, आपापले अनुभव आपापसात वाटून घ्यावेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नैराश्य वाटल्यास एकमेकींना प्रोत्साहित करावे. ''आता आपल्याला एकमेकींची वेगळ्या पद्धतीने गरज आहे. आपण आपल्याच सीमारेषांच्या मागे लपून राहू शकत नाही किंवा मी एकटीच सारे निभावून नेऊ शकते, या दुराग्रहाला चिटकून राहू शकत नाही.'' व्हिटले यांच्या या शब्दांनी मला कर्तबगार महिलांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे सुचले. या व्यासपीठाचा उपयोग करून या महिला एकत्रित शिकून स्वत:चा विकास करू शकतात. मला आशा आहे, की बऱ्याचशा महिला गटागटांनी या पुस्तकाचा अभ्यास करतील; मग हे गट इंटरनेटवरील असोत अथवा प्रत्यक्ष भेटून तयार झालेले असोत. कर्तबगार भगिनींचे सामर्थ्य आणि विद्वत्ता एकत्र आल्यावर यांपैकी कोणीही आपले ईप्सित साध्य करण्याच्या मार्गावरून ढळणार नाही, अशी माझी खात्री आहे.

## या पुस्तकात तुम्हाला काय मिळेल?

तुम्ही नव्या गोष्टी शोधत असताना सतत स्वत:ला काही प्रश्न विचारीत असता. अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यास तुम्हाला मदत करणे, हा या पुस्तकाचा हेतू आहे. तुम्ही वेगळ्या पद्धतीने वर्तणूक करावी, म्हणून मी तुम्हाला प्रवृत्त करीत नाही. उलटपक्षी, तुमच्या आजूबाजूला असलेल्या जगात तुमच्यासाठी काय शक्यता उपलब्ध आहेत, याची जाणीव करून देणे, नेहमीच्या दृष्टिकोनाहून भिन्न दृष्टिकोनातून तुम्हाला पाहता यावं, यासाठी तुमच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावण्याची माझी इच्छा आहे. तुम्ही पुस्तक वाचायचे, त्यातील संकल्पनांची चर्चा करायची आणि तुम्ही या सर्वांशी सहमत आहात की नाही हे ठरवायचे, केवळ इतकेच करणे अपेक्षित

नाही. पुस्तक वाचताना तुम्ही वेळ काढून त्यामध्ये सांगितलेल्या बाबींवर चिंतन करावे, यामधील स्वाध्याय सोडविण्यास सवड काढावी, त्यानंतर जे काही शिकलात त्यासंबंधी एखाद्या मित्रासोबत अथवा प्रशिक्षकासोबत चर्चा करावी. इतकेच नाही तर तुमच्या सवयींच्या विपरीत वर्तन करण्याचे धाडस करावे. त्यानंतरच मी जे काही तुमच्यासमोर मांडले आहे, त्यावर तुम्ही सहमत आहात की नाही, ते ठरवू शकता. तुम्ही तयार असाल, तर 'मला कधीतरी प्रत्येक क्षणात शांतीचा अनुभव येईल का? मी केलेले काम बऱ्यापैकी चांगले झाले आहे, असे मला कधीतरी वाटेल का? पृथ्वीतलावर मला ज्या उद्देशाने पाठविले आहे, तेच काम मी पूर्ण करीत आहे की नाही, हे मला कसे कळेल?' तुमच्या या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळू शकतील. एकदा का तुम्हाला या सर्वांची जाणीव झाली, की ती जाणीव कायम तुमच्याजवळच राहते, ती जाणीव परत अज्ञानात रूपांतरित होत नाही. या पुस्तकाचा उद्देश तुम्हाला काही शिकविणे हा नसून, तुमच्यात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे हा आहे.

या पुस्तकाच्या पहिल्या भागातील प्रकरण एकमध्ये तुम्हाला तुमच्या गरजा आणि इच्छा-आकांक्षा स्पष्टपणे कळाव्यात म्हणून तुम्ही तुमच्या आधी येऊन गेलेल्या महिलांपेक्षा कशा वेगळ्या आहात, याचा शोध घेतला आहे. याच प्रकरणाच्या शेवटी तुमच्यामध्ये सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या वर्तणूक प्रकारांची चांगली आणि काळी बाजू यांचे वर्णन दिले आहे. हे वर्णन अधिक व्यवस्थितपणे कळावे, या हेतूने मी सत्य घटना आणि उदाहरणे दिली आहेत. तिथे एक पडताळ्याची सूचीसुद्धा दिलेली आहे. या सूचीचा उपयोग करून तुम्ही तुमच्या रक्तात कर्तबगार व शोधक महिला किती प्रमाणात भिनली आहे, हे शोधू शकता. प्रकरण दोनमध्ये 'महानतेचे ओझे' म्हणजे काय, हे दिले आहे. तुम्ही नवनवीन आव्हानांच्या मागे सातत्याने धावत असता, यामुळे या अस्वस्थतेने तुम्हाला नेहमीच करण्यासारख्या बऱ्याच गोष्टी शिल्लक आहेत असे वाटत राहते, हीच खरंतर या नवनवीन आव्हानांचा शोध घेण्याची काळी बाजू आहे. तुमच्या अपेक्षांच्या पलीकडे असलेले ध्येय तुम्ही साध्य केले आणि लगेच स्वत:ला विचारले, की 'आता पुढे काय?' माझ्या आयुष्यातील या 'पुढे काय?' संदर्भातील व्यक्तिगत अनुभवांचा शोध मी येथे घेतला आहे; याच गोष्टीमुळे मी माझ्या आयुष्यातील काळोख्या कालखंडात कसे पोचले, हेदेखील सांगितले आहे. भविष्यात महानतेचे ओझे

बाळगण्यापासून स्वत:चे रक्षण करण्याकरिता स्वत:ला नियमितपणे विचारण्याच्या प्रश्नांचा संचसुद्धा मी दिलेला आहे. जर तुम्हाला शोधक होण्यास काय भाग पाडते हे समजले, तर तुम्ही तुमच्या या वृत्तीसहितदेखील गुण्यागोविंदाने नांदू शकता. अगदी या वृत्तीचा उपयोग करून सुंदर भविष्य घडवू शकता.

दुसऱ्या भागात वर्तमान स्थितीत तुम्हाला हेतुपूर्वक परिवर्तन करण्यास मदत व्हावी म्हणून प्रशिक्षण प्रश्नसंच आणि स्वाध्याय दिले आहेत. प्रकरण तीन तुम्हाला 'स्वत:च्या स्वरूपांचा परीघ' कसा ओळखायचा ते सांगते. यामुळे तुम्ही स्वत:ला खऱ्या अर्थाने ओळखू शकाल. तुमच्या कोणत्या स्वरूपांनी तुमचे आजचे व्यक्तित्व तयार झाले आहे आणि उद्याचे व्यक्तित्व काय असू शकते, याचा परामर्श घेतला आहे. प्रकरण चारमध्ये आपण तुमच्या मनाचे अधिक खोलवर निरीक्षण करणार आहोत, जेथे सर्वकाही परिपूर्णच असले पाहिजे, याचा आग्रह धरणारी तीन गृहीतके ठाण मांडून बसली आहेत. तुम्ही करू इच्छित असलेले बदल फार काळ टिकून राहावेत, असे जर तुम्हाला वाटत असेल तर या तीन गृहीतकांचे सर्व पैलू तुम्ही समजून घ्यायला हवेत. या गृहीतकांमुळे होणारा फायदा, तसेच नुकसान तुम्ही व्यवस्थित समजून घ्यायला हवेत. याच प्रकरणात तुम्ही दूरदृष्टी चित्राचे तंत्र शिकाल. तुमचा मानसिक, बौद्धिक कार्यक्रम रोजच्या रोज कसा नव्याने पुन:क्षेपित करायचा हेदेखील शिकाल. प्रकरण पाचमध्ये कोणत्याही प्रकारच्या भावनिक प्रसंगानंतर 'संधीच्या खिडकी'चा उपयोग कसा करायचा, हे समजून घ्याल. यामुळे त्या भावभावनांच्या चौकटीतून बाहेर पडून गुणग्राहक संवाद आणि लेखनाने परिवर्तनाची प्रक्रिया अधिक सुकर होऊ शकते, हे समजेल. या सर्व क्षणांमधून तुम्ही जे काही शिकता, त्याने तुमची दैनंदिन दूरदृष्टीसत्र अधिक समृद्ध होत जाते. शेवटी प्रकरण सहा तुम्हाला तुमचा जीवनोद्देश शोधण्यास मदत करते. तुमच्या मानसन्मान प्राप्त करण्याच्या अनिवार इच्छेहून वेगळा असा जीवनोद्देश कसा शोधायचा, याबद्दल येथे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. जेव्हा तुम्ही जीवन जगण्याच्या ऊर्मीने भारावलेल्या असता आणि तुमची जीवनोद्देशाची जाणीव अगदी मजबूत असते, तेव्हा लोक तुमचे कसे मूल्यमापन करतात आणि कितीही संकटे आली तरीदेखील तुमच्यासाठी अधिक महत्त्वाचे काय आहे हे, तुमच्या स्मरणात ठेवण्यासाठी तुमचा जीवनोद्देश तुम्हाला मदत करतो. जेव्हा

तुम्ही या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दिलेले स्वाध्याय सोडवाल, प्रश्नांची उत्तरे द्याल आणि तेथे सांगितल्याप्रमाणे गोष्टी आचरणात आणाल, तेव्हा तुम्हाला हवे असलेले समाधान आणि दिशा प्राप्त होईल.

तिसऱ्या विभागात तुम्ही आतापर्यंत जे काही शिकलात, त्याची आयुष्यात व्यापक दृष्टीने अंमलबजावणी कशी करायची, ते सांगून परिवर्तनप्रक्रिया अधिक व्यापक केली आहे. थोडक्यात काय, तर तुमचा नावीन्याचा शोध हे तुमचे धोरण बनली पाहिजे. ती केवळ एकामागोमाग घडणाऱ्या अनियोजित घटना ठरू नयेत. सर्वप्रथम दुसऱ्या भागात सुरू केलेल्या हेतुपूर्वक परिवर्तनावर तुम्ही टिकून राहिले पाहिजे. 'हे परिवर्तन वगैरे करण्यापेक्षा दुसरे काहीतरी केलेले बरे,' असे तुम्हाला वारंवार वाटते. या तुमच्या वृत्तीशी सामना करण्यासाठी प्रकरण सातमध्ये तुम्हाला चार साधने उपलब्ध करून दिली आहेत. तुम्हाला या साधनांचा उपयोग करता येईल. प्रकरण आठमध्ये तीन वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये या पुस्तकात शिकविलेली तंत्रे उपयोगात आणून तीन महिलांनी आपल्याला हवे ते कसे साध्य केले, ते सांगितले आहे. यामध्ये एकीने कॉर्पोरेट जगतातील उच्चपदप्राप्ती, व्यवस्थापनाच्या मधल्या फळीत राहूनदेखील चांगले प्रकल्प आणि मानमरातब, तसेच एकीने संपूर्ण नवीन सुरुवात कशी केली, ते दिलेले आहे. तुम्हाला तुमच्या भविष्यात काय हवे आहे, याचे स्पष्ट चित्र डोळ्यासमोर ठेवून तुम्ही पुढे जावे, असे मला वाटते. मग त्यासाठी तुम्ही कोणतेही धोरण वापरले तरी चालेल, या आशेने तुम्हाला मी या गोष्टी सांगितल्या आहेत. प्रकरण नऊमध्ये तुम्हाला जर तुमच्या संस्थेतील नेतृत्वाला प्रभावित करायचे असेल आणि कर्तबगार महिलांना कशा प्रकारे आपल्या संस्थेत अधिक काळ टिकविता येईल, यासाठी तुमच्या नेतृत्वाची मदत करायची असेल, तर त्यासाठी कल्पना सुचविल्या आहेत. तसेच साधनसामग्रीबद्दल मार्गदर्शन केले आहे. संस्थांना भरपूर ऊर्जेची आणि सर्जनशीलतेची ही फौज कशी जोपासायची हे जर समजले, तर संस्था अधिक स्पर्धात्मक होईल.

माझे या पुस्तकावरच काम सुरू होते आणि मी डल्लास, टेक्सास येथे जाण्यासाठी विमानाने प्रवास करीत होते. त्या वेळी माझ्यासोबत एक तिशीची महिला तिच्या चार मुलांसहित प्रवास करीत होती, ती माझ्याशेजारीच बसली होती आणि तिची मुलं मागच्या-पुढच्या तीन ओळींत बसली होती. एका दुर्मीळ क्षणी जेव्हा ती तिच्या मुलांकडे लक्ष देत नव्हती, तेव्हा तिने माझ्या

खांद्यावरून डोकावून पाहिले आणि मी काय लिहीत आहे, ते विचारले. ती माझी लक्ष्यश्रोती नसेलच असे गृहीत धरून मी नाइलाजाने काय करते आहे, ते सांगितले. तेव्हा मी असे गृहीत धरले म्हणून आजही मला माझीच लाज वाटते आहे. लागलीच तिने तिची कर्मकहाणी सांगायला सुरुवात केली. ती तिच्या नवऱ्यासोबत जो उद्योग करीत होती, त्यातील अडचणी सांगितल्या. ती घेत असलेली जोखीम योग्यच होती, मात्र त्याबाबत कोणीच मोठी व्यक्ती तिला समजून घेत नव्हती. केवळ तिची मुलेच तिला समजून घेत होती. त्यांना माहीत होते, की त्यांची आई जेव्हा एखादा निर्णय घेते किंवा नवीन मार्ग निवडते, तेव्हा एका रांगेत तिच्यामागे उभे राहायचे असते. ती म्हणाली, ''ओह्! मी एक भटकी महिला आहे. तुला खरेच असे वाटते का, ही एक प्रकारची जमात आहे की भविष्यातील महिलांचे लक्षण आहे? शेवटी आपण जिथे जशा आहोत किंवा ज्या आहोत तशाच व्यक्त होऊ शकू.'' मला हा प्रश्न सुचविणाऱ्या या महिलेचे देव भले करो! मी पुस्तकाच्या शेवटी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

या संभाषणाच्या आधारे प्रकरण दहामध्ये या महिलेने विचारलेल्या प्रश्नाला धरून चिंतन केलेले आहे. एकदा तुम्ही या पुस्तकाचा अनुभव घेतला, म्हणजे त्यातील सरावप्रश्न सोडविले, संशोधनाचा अभ्यास केला, की मग मी तुम्हाला एक प्रश्न विचारेन. तुम्हाला काय वाटते, भटकी महिला ही एक व्यक्तित्वाची शैली आहे की सर्वच महिलांमध्ये ही वृत्ती असते आणि जसजसा आपला विकास होतो, तसतसा या वृत्तीचा प्रभाव दिसून येतो? तुम्ही स्वत:कडे कसे पाहता, तुमच्या इच्छा-आकांक्षाकडे कसे पाहता, तुमची दूरदृष्टी आणि तुमची जीवन जगण्याची ऊर्मी यांसाठी या प्रश्नाचे उत्तर महत्त्वाचे आहे. तुम्ही जर तुमच्यापेक्षा अधिक मोठ्या कशाचातरी भाग असाल, तर तुमच्या भटक्या भगिनींनासुद्धा यशस्वी होता यावे, म्हणून तुमची मदत मागितली जाऊ शकते. आपण सर्वांनी एकत्रित विकास करायचा ठरविला तर आपण सर्वांचेच हित साधले जाईल, असा भरीव बदल घडवून आणू शकतो.

हे सखे, हे पुस्तक तुझ्यासाठी आहे. लहरी वाऱ्याचा झोत तुला तुझ्या दुसऱ्या साहसाकडे घेऊन जाण्याआधी तू जरा घरी ये आणि तुझ्या पावलांना विश्रांती दे. मी तुझ्यासमोर मांडत असलेले प्रश्न, स्वाध्याय आणि कल्पना तुला रुचतील, अशी मला आशा आहे. तुला हवा तितका वेळ घे, तुझ्या

मनाची कवाडे उघडी ठेव, या प्रक्रियेमधून तुझ्यासोबत जाण्यासाठी एखादी दुसरी महिला शोध आणि तिच्यासोबत तुझे यश साजरे कर. तुला या परिवर्तनाच्या प्रक्रियेत मौज वाटावी, तसेच त्याबद्दलची तुझी संकल्पना स्पष्ट असावी, अशी मी देवाजवळ प्रार्थना करते.

– मार्शिया रेनॉल्ड्स
फोनिक्स, डिसेंबर २००९


**७वी आवृत्ती**

# घालमेल

लेखक
शंकर पाटील

**किंमत : ११०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




शंकर पाटील यांच्या लेखनातून कथारूपाने आपल्या डोळ्यांपुढे येणारे अनुभव खेड्यांतील स्त्री-पुरुषांचे आहेत व त्या दृष्टीने त्यांना त्यांचे असे खास धर्म प्राप्त झालेले आहेत. हे त्यांचे विशेष धर्म नेमके लक्षात घेऊन त्यांना शब्दरूप देण्याची शक्ती लेखकाच्या ठिकाणी आहे. एखाद्या अनुभवाची नेमकी प्रकृती लक्षात घेणे व ती प्रगट होईल असे शब्दरूप त्याला देणे ही गोष्ट सोपी नव्हे.
पाटील यांच्या कथांमधून खेड्यांतील स्त्री-पुरुषांचे हे अर्थपूर्ण अनुभव त्यांच्या विशेष धर्मासह विलक्षण प्रत्ययकारकपणे व्यक्त होतात व त्या अनुभवांना त्यांचे असे अनन्यसाधारणत्व लाभते. खेड्यातील सुखदु:खात्मक अनुभवसृष्टीला या कथांमध्ये एक आगळाच रूपगंध येतो.

– वा. ल. कुलकर्णी

# फ्रँकफर्ट बुकफेअर
# कल्पनाविश्वाची राजधानी

पुस्तकवेड्या माणसाला काय हवं असतं. पुस्तकांच्या शेल्फनी भरलेल्या भिंती आणि रिकामा वेळ. नजर जावी तिथपर्यंत फक्त पुस्तकांनी व्यापलेला अवकाश. पुस्तकांच्या कल्पनाविश्वाची धुंदीच अशी न्यारी. तिच्यात एकदा रमलं की परतीचा रस्ताच नाही. कल्पनाविश्वाची ही नशा म्हणजे खरं तर वेडेपणाच समजला जातो. पण हे वेडही त्याचा सोहळा साजरा करावा इतकं साजरं. असाच एक सोहळा म्हणजे फ्रँकफर्ट पुस्तक मेळावा. ऑक्टोबर महिन्यात यंदाचा फ्रँकफर्ट मेळावा झाला. मेळाव्याच्या गेस्ट ऑफ ऑनरचा मान यावर्षी न्यूझीलंडला मिळाला. कल्पनाविश्वात रमणारे, त्या विश्वाला शब्दांच्या कोंदणात गुंफणारे आणि ते शब्द चाहत्यांपर्यंत पोचवणारे विक्रेते या सोहळ्याचे साक्षीदार झाले.

फ्रँकफर्ट मेळावा ही तर प्रत्यक्ष अनुभवण्याचीच गोष्ट. एकाच छताखाली शेकडो प्रकाशकांची दालनं, विविध विषयांवरील तज्ज्ञांच्या चर्चांचे फड, यंदा ७ हजार प्रदर्शनकर्ते, २ लाख ७० हजार प्रकाशक व पुस्तक विक्रेते तर ९ हजार पत्रकार व माध्यम प्रतिनिधींनी या सोहळ्याला हजेरी लावली. तब्बल ७० विषयांवर १५० मान्यवरांच्या इथे चर्चा रंगल्या. प्रकाशन उद्योगासाठी आवश्यक तंत्रज्ञानातील १०० हून अधिक गुंतवणूकदार उपस्थित होते.


फ्रँकफर्ट म्हणजे खरं तर जगभरातील विवेकवाद्यांचं व्यासपीठंच. येथील चर्चांमध्ये समाजभानाचे गहिरे सूर दिसून येत असतात. यावेळी उग्रतेकडे झुकू लागलेलं जागतिक राजकारण फ्रँकफर्टच्या व्यासपीठावर

8-12 October 2014
FRANKFURTER
BUCHMESSE
Guest of Honour Finland




चर्चेला आलं. या चर्चेत १७ देशांमधील २० साहित्यकर्मींनी सहभाग घेतला. डॅनिश लेखिका जेन टेलर यांनी या चर्चेचं संचलन केलं. बंद दरवाजांच्या मागील ही चर्चा माध्यमांमधून फारशी प्रकाशात येत नाही. परंतु जेन टेलर यांनी सांगितलं की, माणसात फक्त १० टक्के विवेक आणि ९० टक्के फक्त भावना आणि अंत:प्रेरणा असतात. लेखकाचा व्यवहार हा भावनांशी जोडला गेलेला असतो. लेखक माणसाचं मन आणि आत्म्याचा अभ्यास करतो. फ्रँकफर्टमध्ये राजकीय दृष्टि कोनातूनही मानवी भावनांबाबत चर्चा झाली. जागतिक राजकारणाच्या उग्रतेवर चर्चा करताना माणसाचं माणूसपणच अधोरेखित करण्यात आलं.

फ्रँकफर्टचा स्टोरी ड्राईव्ह म्हणजे गोष्टी सांगण्याचं नवं तंत्र म्हणता येईल. ७ देशांमधील २० माध्यमतज्ज्ञांनी स्टोरी ड्राईव्हमध्ये त्यांना गवसलेलं गोष्टीचं तंत्र मांडलं. आधुनिक संपर्कमाध्यमे आणि स्टोरी टेलिंगच्या बदलत्या स्वरुपाबाबत दीर्घ चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना स्वीडिश सायबर फिलॉसॉफर अलेक्झांडर बार्ड यांनी नवी संपर्क माध्यमे व्यक्तिवादाला शह देत असून एकत्रित काम करणं ही काळाची गरज असल्याचं सांगितलं. अमेरिकन लेखक राल्फ लार्सन यांनी सोशल मिडियावरील स्टोरी टेलिंगही जुन्या काळातील कथाकथनाप्रमाणेच असल्याचं मत मांडलं. हॉलिवूडमधील चित्रपट निर्माते हेंड्रीक विडमन आणि लिंडा ऑब्सट यांनी स्टोरी टेलिंगची कसरत आणि चित्रपट यांची सांगड घातली.



फ्रँकफर्ट मेळाव्याचं आणखी एक वैशिष्ट्य ठरलं ते म्हणजे युरोपियन अँड इंटरनॅशनल बुकसेलर्स फेडरेशनच्या अध्यक्षांची निवड. मेळाव्यानं मावळते अध्यक्ष जॉन मिनेम यांना निरोप दिला. तीन दिग्गजांना रिक्त आसनांवर विराजमान केलं. जर्मनीच्या एम.डी. रिटेल बुकसेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कॅरा ड्रेहेर, नेदरलँडसच्या बोएकहँडलचे सीईओ फॅबिया पागमन आणि सिंडीकेट डिस्ट्रिब्यूटर्सचे अध्यक्ष जीन ल्यूक ट्यूनेने या तिघांना महासंघाच्या संयुक्त अध्यक्षपदाचा मान मिळाला. प्रकाशन व्यवसायासाठी मक्तेदारी घातक असून व्यवसायाच्या वाढीसाठी संघटीत एकत्रित प्रयत्न करण्याची गरज यावेळी डॉ. कॅरा ड्रेहेर यांनी व्यक्त केली.

फ्रँकफर्ट सोहळा साहित्याच्या प्रत्येक अंगावर प्रकाश टाकतो. यामध्ये माध्यमांमधून पोहचणाऱ्या साहित्याचाही उल्लेख करावा लागेल. पुस्तकांच्या पानातून सिनेमाच्या पडद्यावर अवतरणाऱ्या कलाकृतींचा विशेष सन्मान या मेळाव्यात केला जात असतो. या वर्षी हा मान अँटन कॉर्बीन या डच दिग्दर्शकाने मिळवला. जॉन ली कॅटे यांच्या अ मोस्ट वाँटेड मॅन या कादंबरीवर बेतलेल्या त्याच नावाच्या चित्रपटाचा विशेष सन्मान करण्यात आला. साहित्यकृतीवर आधारित सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा दुसरा मान लेबेनीज दिग्दर्शक झियाद दोरी यांच्या द अॅटॅक या चित्रपटास मिळाला. यासिन खद्रा यांच्या कादंबरीवर हा चित्रपट आधारित आहे. आत्मघातकी बॉम्ब हल्ल्यात जीव गमावणाऱ्यांचि  कथा हा चित्रपट मांडतो. दहशतवादाच्या छायेत वावरणाऱ्या जगाची हेलावून सोडणारी कथा यासिन खद्रा यांनी गुंफली आहे. दोन सर्वोत्कृष्ट साहित्यकृतींच्या चित्रपटविश्वाने केलेल्या सन्मानाची जणू परतफेडच फ्रँकफर्ट पुस्तक मेळाव्याने केली.




पुस्तकांच्या जागतिक बाजारपेठेत सेल्फ पब्लिशिंगचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. ई बुक्सची बाजारपेठ सेल्फ पब्लिशिंगसाठी अधिक पूरक आहे. फ्रँकफर्ट मेळाव्याने सेल्फ पब्लिशिंगच्या विविध परिणामकारक घटकांवर प्रकाश टाकला. अमेरिकेत सेल्फ पब्लिशिंगच्या बाजारात ७९ टक्क्यांनी वाढझाली. त्या अनुषंगाने प्रकाशन व्यवसायापुढील आव्हानांवरही चर्चा झाली. फ्रँकफर्ट अकादमीच्या शिष्यवृत्त्या आणि शैक्षणिक उपक्रमांची उजळणीही मेळाव्यात झाली. अनेक पुस्तकांच्या हक्कांच्या देवाणघेवाणीची ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. इथं प्रकाशन व्यवसायातील नवीन प्रवाहांचं दर्शन घडतं. मुद्रीत पुस्तकांपासून किंडल, टॅबच्या मार्केटपर्यंतची सर्व दालने या ठिकाणी पहावयास मिळतात.

फ्रँकफर्ट मॅगझीनच्या नव्या आवृत्तीची झलक सादर करण्यात आली. न्युझीलंडच्या ७० लेखक आणि १०० कलाकारांनी आपल्या सादरीकरणातून कला व साहित्याचं नातं उलगडून दाखवलं. नृत्य, वादन, छायाचित्र अशा विविध माध्यमांची सरमिसळ या निमित्ताने अनुभवता आली. लहान मुलांसाठी वाचन उपक्रम, तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे नवीन आविष्कार, साहित्यातील नवीन प्रवाहांची चर्चा अशा उपक्रमांमुळे फ्रँकफर्ट जगातील सर्वोत्तम पुस्तक मेळावा ठरला.

योजना यादव

**२८वी आवृत्ती**




# पार्टनर

लेखक
व.पु. काळे

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

तुला मी हाक कशी मारू?
पार्टनर ह्याच नावाने.
आपल्याला खरं तर नावच नसतं.
बारशाला नाव ठेवतात ते देहाचं.

पोरगी म्हणजे झुळूक.
अंगावरून जाते.
अमाप सुख देऊन जाते.
पण धरून ठेवता येत नाही.

आपल्याला हवा तेव्हा.
तिसरा माणूस न जाणे.
हाच नरक!

लक्षात ठेव दोस्त,
तुला मी हवा आहे
म्हणून मला तू हवा आहेस.







# Eat Spray Love

## Book Review

If you are a cat-lover, this is one book you shouldn't miss. On second thoughts, if you are *not* a cat-lover, then this is one book you *definitely* shouldn't miss! 'Eat, Spray & Love' is a pictorial (auto)biography written by Blossom, a cute and curious tabby-cat who, on her own accord, 'cannot type on a computer' and has thus resorted to pictures (accompanied by intermittent text) to narrate the story of her awesome life. Joan Sauers, Blossom's human flatmate, has graciously helped her effort by making Blossom's story more loquacious in words that we human readers will understand.

'Eat, Spray & Love' is a unique book indeed. A pictorial (auto)biography of a pet cat named Blossom, it seeks to explain to the world about the daily life of the feline species when they become someone's favourite pet. Blossom tells us how her life within the confined of her cosy home is just so interesting and comfortable, that she feels no need to roam the world in search of adventures. Every adventure she needs

manifests itself in the different nooks and crannies of her home. “Why go to Italy or India or even out of your front door when the truth and beauty of the universe lies within?” she queries.

Blossom’s question finds validating answers in her life-story as she tells us how refreshing it is to get fresh water in stone-bowls served ready instead of having to search for water all over town. She talks about the joys of killing

moths and house-flies for fun instead of chasing paltry rats in search of every night’s dinner. Dinner for her comes lovingly served by her flatmate, which ensures that Blossom remains free for her own pursuits! She admits to missing feline company some times, but such moments are rare and fleeting; because soon she is reminded of the comfort in sitting of her flatmate’s lap as she entertains her human friends. Blossom finds loads of amusement is watching varied human species – some of who coo over her and others who look at her as if she’s a scary alien. Blossom goes onto telling us about her favourite pastimes such as playing with strings lying around the house; trying her hand at her flatmate’s laptop keys; or simply curling up on a cosy cushion.

On the surface, it may not sound like a book for adults/non-children. But in fact, it is a wonderful way for people of all ages to go on the other side of the fence and see what a pet animal’s life is, from his/her own perspective. Blossom’s (auto)biography achieves this aim perfectly. In a fun way, it gives us an idea about what it would be like to have a cat as a pet – at the end of the book, the reader will be more tempted than put off with the idea of having this much-doubted-animal as a pet. Interspersed with beautifully clicked sepia-toned pictures of Blossom, in candid mode, the monologue receives apt pictorial credence at every juncture. The book makes for an anytime quick read or even a quick browse to let a smile play on your lips in the midst of a hectic day.

**– RESHMA S KULKARNI**



# श्रद्धांजली

## सदाशिव अमरापूरकर



विशिष्ट प्रकारची संवादशैली आणि कसदार अभिनयाच्या जोरावर गेली तीन दशके हिंदी चित्रपटसृष्टीत आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ अभिनेते सदाशिव अमरापूरकर यांचे मुंबईत खासगी रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन कन्या, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. अमरापूरकर यांच्या निधनाने सामाजिक भान असलेला कलाकार हरपला अशी भावना मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत व्यक्त करण्यात येत आहे.

या नाटकातील त्यांची भूमिका पाहून गोविंद निहलानी यांनी त्यांची ‘अर्धसत्य’ चित्रपटातील भूमिकेसाठी निवड केली. या चित्रपटातील त्यांची भूमिका खूप गाजली आणि अमरापूरकर यांची बॉलिवूडला ओळख झाली. ‘सडक’ या हिंदी चित्रपटात त्यांनी साकारलेली तृतीयपंथीयाची भूमिका विशेष गाजली होती. या भूमिकेसाठी त्यांना ‘सर्वोत्कृष्ट खलनायक’ म्हणून गौरविण्यात आले होते. हिंदी चित्रपटात त्यांनी खलनायकी आणि विनोदी अशा दोन्ही भूमिका समर्थपणे साकार केल्या होत्या. सामाजिक भान असलेला कलाकार अशीही अमरापूकर यांची ओळख होती. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्या चळवळीतही ते सहभागी झाले होते.

## सुमन बेहेरे

मेनका प्रकाशनच्या संस्थापक सुमन बेहेरे (वय ८८) यांचे ३१ ऑक्टोबरला निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

सुमनताईंचे बालपण मुंबईत गेले, त्यांचे शिक्षणही तेथेच झाले. त्यांनी लग्नानंतर पती पु. वि. बेहेरे यांच्यासोबत प्रकाशन व्यवसाय सुरू केला. त्यांनी 'मेनका' 'माहेर' ही कौटुंबिक आणि 'जत्रा' हे विनोदी नियतकालिक सुरू केले. मुंबई-पुणे असा प्रवास करत, अत्यंत कष्टाने त्यांनी मेनका प्रकाशनची आर्थिक बाजू भक्कम केली. आपल्या प्रचंड लोकसंग्रहाचा उपयोग त्यांनी प्रकाशन संस्थेसाठी केला. प्रकाशन संस्थेच्या जाहिरात विभागाची तसेच पु.वि. बेहेरे यांच्या निधनानंतर त्यांनी प्रकाशन संस्थेची पूर्ण धुरा सांभाळली. साहित्यप्रेमी भगिनी मंडळासाठीही त्यांनी काम केले. या मंडळाच्या त्या काही काळ अध्यक्षाही होत्या.

## ज्येष्ठ क्रीडा पत्रकार चंद्रशेखर संत



मराठी क्रीडा पत्रकारितेत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवणारे आणि क्रिकेटसह देशी खेळांच्या प्रचार आणि प्रसारासाठी सदैव झटणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार व समीक्षक चंद्रशेखर प्रभाकर संत यांचे निधन झाले. ते ६१वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी सुजाता आणि दोन मुले (चैतन्य आणि प्रसन्न) असा त्यांचा परिवार आहे.

सुरुवातीला अभ्युदय बँकेत नोकरी केल्यानंतर त्यांनी पत्रकारितेची वाट धरली. १९७८च्या सुमारास ते महाराष्ट्र टाइम्स दैनिकात रुजू झाले. जवळपास तीन दशके क्रीडा पत्रकार म्हणून कार्यरत असणाऱ्या संत यांनी 'स्पोर्ट्स वीक' या साप्ताहिकात काम केले होते. देशी खेळाबरोबर क्रिकेटचे समालोचनही करताना त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या माध्यमातून घराघरात स्थान मिळवले होते.

कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने १९८३मध्ये इंग्लंडमध्ये जाऊन विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला होता. चंद्रशेखर संत यांनी त्या स्पर्धेचे वृत्तांकन केले होते.

स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर त्यांनी विपुल लेखन केले.

देशी खेळांनाही त्यांनी न्याय दिला. मदतीसाठी सदैव तत्पर असलेल्या संत यांनी वरिष्ठांसह नव्या दमाच्या पत्रकारांनाही नेहमीच मार्गदर्शन केले.

## अभिनेते अतुल अभ्यंकर



'झी मराठी' वाहिनीवरील 'जय मल्हार' या लोकप्रिय मालिकेत हेगडी प्रधानाची भूमिका साकारणारे अभिनेते अतुल अभ्यंकर (वय ४२) यांचे १२ नोव्हेंबरला हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व आई आहे.

'जय मल्हार'मध्ये त्यांनी साकारलेल्या प्रधानाच्या भूमिकेची दखल झी-मराठी अॅवॉर्ड सोहळ्यात घेण्यात आली होती. त्यांना पुरुष व्यक्तिरेखेचा पुरस्कार मिळाला होता. अभ्यंकर यांना अखेरचा निरोप देण्यासाठी 'जय मल्हार' मालिकेतील कलाकारांसह अनेक रसिक उपस्थित होते.

## प्रा. मंदाकिनी खांडेकर

प्रा. मंदाकिनी खांडेकर यांचे प्रदीर्घ आजारानंतर वयाच्या ७७ व्या वर्षी कोल्हापूर येथील त्यांच्या निवासस्थानी दि. २३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. प्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या त्या कन्या होत. राजारामपुरी येथील पाचव्या गल्लीतील त्यांच्या नंदादीप या निवासस्थानी अनेक दिवसांपासून उपचार सुरू होते.

मंदाकिनी यांचा जन्म १९३७ साली झाला होता. त्यांचे शिक्षण एम.ए.एम.एड. पर्यंत झाले होते. त्यांनी न्यू कॉलेज, आंतरभारती, महावीर कॉलेज येथे मराठी तसेच शिक्षणशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका म्हणून सेवा केली होती. पुढे त्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे स्वेच्छानिवृत्ती घ्यावी लागली. पित्याप्रमाणेच त्यांच्याकडेही साहित्यदृष्टी होती. त्यांनी  खांडेकर यांच्या अस्थी, यज्ञकुंड, घरटं आदी पुस्तकांचे संपादन केले होते. त्यांनी अमृतवेल या पुस्तकावर आधारित दूरचित्रवाणी मालिकाही तयार केली होती. दुर्दम्य इच्छाशक्ती आणि सहनशीलतेच्या बळावर त्यांनी आजाराशी १७ वर्षे झुंज दिली.

मंदाकिनी खांडेकर यांच्या पश्चात दोन बहिणी, एक भाऊ असा परिवार आहे. पंचगंगा स्मशानभूमीत मंदाकिनी खांडेकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मनोगत

दिनांक : २६/१०/२०१४

मा. श्री. अनिल मेहता यांना,
स. न. वि. वि.

आपण पुस्तक व्यवसायाच्या ५० व्या वर्षांत पदार्पण केले आहे.

हार्दिक अभिनंदन!

आपल्या प्रकाशनाचा सुवर्ण महोत्सव चालू आहे. नुसते बुकसेलर्स नव्हे, तर प्रकाशक म्हणून आपली ओळख भारतीयांना झाली आहे. क्रमिक पुस्तकांच्या प्रकाशनापासून प्रथितयश लेखक वि. स. खांडेकर, रणजित देसाई, शान्ता शेळके, द. मा. मिरासदार आदि मान्यवर लेखकांची पुस्तके आपण प्रकाशित केलेली आहेत. तसेच अन्य भाषांतील दर्जेदार लेखकांची पुस्तके अनुवादित करून  मराठीत आणली आहेत.

ई–बुक्स, ॲप्स, इंटरनेट आदि आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाचन संस्कृती धोक्यात आलेली आहे. पुस्तके वाचनाची (विकत घेऊन वाचण्याची) आवड कमी झालेली आहे, अशी तक्रार आहे. परंतु पट्टीचा वाचक पुस्तके खरेदी करतो असा आपला अनुभव आहे.

आपली मुलाखत महाराष्ट्र टाइम्सने छापली आहे. त्यामध्ये प्रकाशकांसाठी आपले मौलिक विचार मांडले आहेत व मार्गदर्शनही केले आहे. आपली समग्र मुलाखत वाचनीय आहे. आपले विशेष अभिनंदन!

वसंत सांगलीकर
अंबा प्रकाशन, कोल्हापूर.




# गोष्टी पानोपानी

## भोपळ्याचा वेल

राजा धर्मसेन खूप चांगला होता. तो प्रजेची खूप काळजी घ्यायचा. त्यामुळे त्याचं राज्य समृद्ध बनलं होतं.

तो बऱ्याचदा वेष पालटून राज्यात फिरायचा. त्यावेळी त्याला प्रजेचं जीवन जवळून पाहायला मिळायचं. त्यांच्या बोलण्याचा उपयोग त्याला राज्यकारभार करताना व्हायचा.

एके दिवशी तो असाच किल्ल्यातून बाहेर पडला. तो घोड्यावरून खूप लांब गेला. जवळ जवळ त्याच्या राज्याच्या सीमेपर्यंत.

रात्र झाली. अंधार पडला. त्याला एक झोपडी दिसली. तो थांबला. आतून एक माणूस बाहेर आला. तो गरीब लाकूडतोड्या होता. त्याच्या बरोबर त्याची छोटी मुलगी होती. तिचं नाव होतं आशा. राजानं त्याला रात्रीपुरता आसरा मागितला.

लाकूडतोड्यानं राजाला ओळखलं नाही. तो गरीब असला तरी स्वभावानं चांगला होता. त्यानं राजाला आसरा दिला. जेवू घातलं. जेवताना त्यानं राजाला विचारलं, ''तुम्ही मोठ्या घरातले दिसता?''

''नाही. मी राजाच्या सैन्यात आहे.''

''बरं झालं. देवाची कृपा. मी जंगलात लाकूड तोडताना तिथल्या सैनिकांचं बोलणं ऐकलं. शेजारचा राजा सैन्याची जमवाजमव करतोय. आपल्यावर स्वारी करणार आहे.''

''अस्सं? बरं झालं तू सांगितलंस. मी महाराजांना सांगतो,'' राजा म्हणाला.



थोड्या वेळानं सगळे झोपी गेले.

सकाळी उठल्यावर राजानं अंगणात पाहिलं. शेतकऱ्याच्या मुलीनं भोपळ्याचा वेल लावला होता. त्याची एक फांदी ती माठात घालत होती.

"हे काय आशा?" राजानं विचारलं.

"ही माझी गंमत आहे. वाढलेला लाल भोपळा माठात घालता येणार नाही. पण आत्ताच त्याची फांदी आत घातली तर तो भोपळा माठाच्या आत वाढेल, मोठा होईल."

राजाला तिच्या गमतीचं आश्चर्य वाटलं. त्याला हसू आलं, पण मग तो गंभीर झाला. कशामुळे?...

तो निघाला. त्याआधी त्यानं आशाला घोड्यावरून चक्कर मारली. त्या शेतकऱ्याचे आभार मानले. त्याला सुवर्णमुद्रा दिल्या. शेतकरी आनंदला. परत जाताना राजा काहीतरी विचार करत होता.

नंतर आठवडाभर तो रोज वेष पालटून त्याच्या मोठ्या किल्ल्यात फिरत होता.

मग एके दिवशी ...

दरबार भरला होता. राजानं अचानक हुकूम सोडला, "सेनापती, सरदार इंद्रजित आणि सरदार विरुपाक्ष यांना कैद करा."

दरबारात खूप गडबड उडाली.

मग महाराज म्हणाले, "शेजारचा राजा आपल्यावर स्वारी करणार आहे. त्याचा समाचार आपण घेऊच. पण आपले हे सरदार!...

हल्ल्याच्या वेळी त्याला व त्याच्या सैन्याला किल्ल्याचं दार उघडून आत घेणार होते.''

दोन्ही सरदार शेजारच्या राजाला फितूर झालेले होते. धर्मसेनाच्या सावधतेमुळे त्याला ही गोष्ट कळली होती. त्या सरदारांना त्यांची चूक कळली. त्यांनी महाराजांच्या पायावर लोळण घेतली.

महाराज म्हणाले, ''ही फंदफितुरी आत्ता रोखली नाही, तर पुढे त्याचे गंभीर परिणाम होतील. माठाच्या आत वाढलेला भोपळा घालता येणार नाही. पण माठाच्या आत भोपळ्याची फांदी घालून ठेवली तर? तर त्या फांदीला आलेला भोपळा माठाच्या आत वाढू शकेल.''



दरबाऱ्यांना हे बोलणं कळलं नाही. मग महाराजांनी समजावून सांगितलं.

''त्या भोपळ्यासारखंच, आपल्या बळकट किल्ल्यात शत्रू शिरू शकणार नाही. आपल्या किल्ल्याला खिंडार पाडू शकणार नाही. पण त्याच्या शिरण्याची व्यवस्था आतमध्ये, आधीच करून ठेवली तर? तर किल्ला भेदणं शक्य आहे. शेजारच्या राजानं तेच केलं. त्यानं या दोघांना फितवलं. हा फितुरीच्या भोपळ्याचा वेल वेळीच उपटला पाहिजे.''

महाराजांनी त्या सरदारांची गय केली नाही. त्यांना तुरुंगात टाकण्याची आज्ञा केली.

दरबाऱ्यांनी महाराजांचा जयजयकार केला. राजाला मात्र आशाची आठवण आली. तिच्या छोट्याशा गमतीदार कृतीनं राज्यावरचं मोठं संकट टळलं होतं.

ऑनलाइन वाचकांसाठी सुवर्णसंधी

# मेहता मराठी ग्रंथजगत

## Digital Edition

DIGITAL EDITION

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा अंक
आता डिजीटल स्वरूपात

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस ॲप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.

| आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| | २५% | ३०% |


वर्गणी ३ वर्षांची वर्गणी ₹३०० | ५ वर्षांची वर्गणी ₹४००

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**


**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
License to Post Without Prepayment of Postage WPP-92
Regd.No.:PCW/086/2012-2014/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 December. 2014 Posting Date : 11 December. 2014


# आमची नवीन पुस्तके








BOOK POST
Printed Matter

## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.